96



# आश्रमकन्यका

लेखिका


**वारूबाई शेवडे, जी. ए.**

सेवानिवृत्त आजन्मसेविका, अनाथबालिकाश्रम, हिंगणें



IRBK00558

IRBK00558



केशव भिकाजी ढवळे

श्री समर्थ-सदनः २

गिरगाव मुंबई २

* ४४ *

मूल्य २॥ रुपये

प्रथमावृत्ति : १९४६

सर्वाधिकार सुरक्षित

मुद्रक
विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

प्रकाशक
केशव भिकाजी ढवळे,
श्री समर्थ-सदनः २
गिरगांव, मुंबई ४
चिराबाजार, मुंबई २

हिंगणें स्त्री-शिक्षण संस्था
( अनाथबालिकाश्रम मंडळी )
हिंगणें बुद्रुक, पुणें ४
या संस्थेच्या सुवर्णमहोत्सवप्रसंगीं
प्रसिद्ध झालेला लघुकथासंग्रह

# निवेदन

अनाथ व निराधार विधवांना शिक्षण देऊन स्वावलंबी करावें या उद्देशानें महर्षी धोंडो केशव कर्वे यांनीं पन्नास वर्षांपूर्वी हिंगणें येथें अनाथबालिकाश्रमाची स्थापना केली. गेल्या पन्नास वर्षांच्या या कालावधींत शेंकडों निराधार विधवा, कुमारिका आणि सुवासिनी स्त्रियांनीं या संस्थेच्या आश्रयानें विद्या संपादन केली, आणि त्या स्वावलंबी झाल्या. कांहींनीं संसारांत पडून आपलें जीवन सुखी केलें, तर कांहींनी सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रांत कार्य करून नांव मिळविलें.

आश्रमाच्या पहिल्या पंधरावीस वर्षांच्या कालावधींत तरी केवळ शिक्षण देण्याच्या हौशीखातर आपल्या मुलींना आश्रमांत पाठविणारे पालक थोडेच होते. अडचणीच्या परिस्थितींत सांपडलेल्या, दुःखानें गांजलेल्या आणि घरीं नकोशा झालेल्या, अशाच अनाथ मुली विशेषतः आश्रमांत येत असत. त्यांना संस्थेचा आश्रय मिळाला नसता तर त्यांचें आयुष्य मातीमोल ठरलें असतें.

अशा मुलींपैकीं ज्यांची परिस्थिति विशेष अनुकंपनीय होती, ज्यांच्यावर गुदरलेले प्रसंग हृदयस्पर्शी होते, आणि ज्यांना समाजाकडून अनन्वित छळ सोसावा लागला, त्यांच्या जीवनकथा, उद्बोधक वाटतील अशा समजुतीनें, या पुस्तकांत सांगितल्या आहेत. या कथांतील व्यक्तींचीं आणि स्थलांचीं नांवें काल्पनिक असलीं तरी, मुख्य व्यक्ति व प्रसंग खरे आहेत. आश्रमांत येणाऱ्या कित्येक विद्यार्थिनींच्या जीवनकथांत इतके अद्भुतरम्य प्रसंग असतात कीं, त्यांच्या कादंबऱ्या अगर पटकथा होऊं शकतील.

संस्थेच्या खऱ्या कार्याची कल्पना तिच्या वार्षिक अहवालांवरून अगर संस्था प्रत्यक्ष पाहूनही होऊं शकत नाहीं. संस्थेंत आलेल्या विद्यार्थिनींच्या आयुष्याच्या स्थित्यंतरांचे चित्रपट पाहिले तरच संस्थेच्या कार्याचें खरें महत्त्व कळून येईल. तेव्हां आतांपर्यंत आमच्या संस्थेनें जें समाजकार्य केलें आहे, त्याचें यथार्थ दर्शन व्हावें म्हणून संस्थेच्या सुवर्णमहोत्सवाच्या प्रसंगीं प्रसिद्ध करण्यासाठीं या कथा लिहिल्या आहेत. त्यांत लघुकथांचें तंत्र तितकेसें साधलेलें नाहीं याची जाणीव मला आहे. तथापि या गोष्टी वाचून वरील हेतु साध्य झाल्यास माझ्या श्रमांचें चीज होईल.

विजयादशमी,
५ आक्टोबर १९४६

चारूबाई शेवडे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | परिवर्तन | १ |
| २ | सवत ती सवत ! | ८ |
| ३ | परित्यक्ता ! | २० |
| ४ | क्रान्ति | ३३ |
| ५ | सावित्री शिक्षिका झाली ! | ४४ |
| ६ | तापी आणि नर्मदा | ५३ |
| ७ | पुनर्मीलन | ६६ |
| ८ | अनपेक्षित भाग्य | ८२ |
| ९ | "आतां काय तूं शिकणार !" | ९२ |
| १० | अनशी | १०५ |
| ११ | पण आतां काय उपयोग ? | ११५ |
| १२ | कायापालट | १२४ |
| १३ | बिचारी शरयू | १३३ |

अ. क्र.
विभाग
ता. नों.
५५५८
कथा

१

# परिवर्तन

" वहिनी, ताईला कर्व्यांच्या आश्रमांत ठेवूं या शिकायला ? "

" कर्व्यांच्या आश्रमांत ? लोक काय म्हणतील ? आपल्या कुळांत आजपर्यंत जें कोणीं केलं नाहीं, तें कसं करायचं ? "

" लोकांशीं आपल्याला काय करायचं ? पोरीचं कल्याण पाहायचं. तुझी हरकत नाहीं ना ? "

" माझी कसली हरकत ? तुम्ही पोरीचं कल्याणच कराल; माझा पूर्ण भरंवसा आहे तुमच्यावर. "

चाळीस - वर्षांपूर्वीचा काळ. त्या काळीं वैधव्यासारखा प्रसंग एखाद्या अल्पवयी गरीब मुलीवर ओढवणें, म्हणजे खरोखरच तिच्यावर दुःखाचा पर्वत कोसळल्याप्रमाणें वाटत असे. अशा स्थितींत दुसऱ्याच्या घरीं भाकरी

बडवण्यापलीकडे तिला दुसरी गतिच नसे. दुर्दैवानें असाच प्रसंग वयाच्या सतराव्या वर्षी माझ्यावर ओढवला. सासरचें दुसरें कोणी नात्याचें नाहीं; दांतावर मारायलाही जवळ एक पैसा नाहीं; इतकेंच नाहीं, तर चारपांचशें रुपयांचें कर्जच डोक्यावर! डागदागिने विकून तें फेडूं म्हटलें, तर तेंही शक्य नव्हतें, कारण त्यांची अगोदरच सावकाराच्या तिजोरीकडे रवानगी झालेली होती. अशा परिस्थितींत माहेरीं जाण्यापलीकडे मला गतिच नव्हती.

पतिनिधनानंतर तिसऱ्या चवथ्या दिवशींच माझे काका आले आणि माझी एक नणंद आणि मानलेल्या सासूबाई घरांत होत्या, त्यांच्या स्वाधीन आमचें बिऱ्हाड करून ते मला घेऊन गेले. त्यांनीं बिऱ्हाडांतल्या सामान-सुमानाची, भांड्याकुंड्यांची कीं कपड्यालत्त्यांची, कसलीच चौकशी केली नाहीं. माझ्या नणंदांनीं आणि सासूबाईंनीं बिऱ्हाडाची काय ती वाट लावली, एवढेंच माझ्या कानावर आलें. मला त्यांतलें कांहींच मिळालें नाहीं. मी चार लुगड्यांनिशीं बाहेर पडलें, ती माहेरीं आलें. अशा वेळीं स्वाभिमानी मुलीला वैधव्याच्या दुःखापेक्षां परावलंबनाच्या विचारानें होणाऱ्या वेदनाच अधिक तीव्रतेनें जाणवतात. तीच गत माझी झाली. सगळें जग मला शून्य दिसूं लागलें. "काय करूं? कुठें जाऊं?" या अष्टाक्षरी मंत्रानें मन भांबावून गेलें! रडतां भुई थोडी झाली! पतिनिधनाच्या दुःखापेक्षां मागून होणाऱ्या विटंबनेचें दुःख अनंतपटीनें जास्त वाटतें. सोंवळेपणामुळें माझ्या रूपाचें होणारें बेरूप माझ्या डोळ्यांपुढें सारखें उभें राही आणि पोटांत भीतीचा गोळा उठे. रात्रींच्या वेळीं जरा डोळा लागला, तरी तें तांबडें लुगडें आणि तो दुष्ट प्राणी माझ्या डोळ्यांपुढें दिसून मी जागी होई. कोण काय कुजबुजतें, इकडेच माझे कान लागलेले असत.

आमचें घराणें जुनें; आमच्या घराण्यांत कोणी विधवा सोंवळी

आल्याशिवाय राहिलेली नव्हती. माझी एक बालविधवा आत्या होती, तिचा नवरा तिच्या वयाच्या दहाव्या वर्षी वारला, तरी ती सकेशा राहूं शकली नाहीं. मग मी तर सतरा वर्षांची होतें; तेव्हां हा प्रसंग आपल्यावर यायचाच! तो टाळण्याचें माझ्या हातीं नव्हतें, प्रतिकार करण्याचें माझ्यांत सामर्थ्य नव्हतें. आमचे वडील वारल्यापासून माझी आई, बहीण, भाऊ आणि मी, यांच्या पालनपोषणाचा भार काकांच्यावरच पडला होता. माझ्या लग्नानें ते जरा कुठें मोकळे होतात, तों मी पुन्हां घरीं आलें! तेव्हां त्यांना दुखवायचें, त्यांचें मन मोडायचें, आणि मी सकेशा राहण्याचा अट्टाहास धरायचा, हें माझ्या स्वभावाला जमण्यासारखें नव्हतें. तेव्हां येईल त्या प्रसंगाला तोंड देणेंच भाग होतें मला.

विचार करून करून माझें डोकें भणाणून गेलें. आपण जगायचें तरी कशाला? आपल्या मरणानें काकांच्यावरचा एका माणसाचा भार तरी कमी होईल, असें माझ्या मनांत आलें. ते प्लेगचे दिवस असल्यामुळें आम्ही दादरला झोंपडींत रहात होतों. परसांत विहीर होती. जवळच आगगाडीचें स्टेशन होतें. यांपैकीं विहिरीचा किंवा आगगाडीच्या रुळांचा आश्रय घ्यावा म्हणजे काम भागेल, असा विचार मीं मनाशीं ठरवला! सातवा दिवस गेला; आठवा दिवस गेला; नववा दिवस उजाडला! उद्यां दहावा दिवस!! माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर दहाव्या दिवशींच आईला सोवळी केल्याचें मला आठवलें. दुःखातिशयानें वेडी होऊन तिनें नवव्या दिवशीं रात्रीं विहिरींत उडी टाकली! पण तिच्या दुर्दैवानें म्हणा, किंवा आम्हां मुलांच्या सुदैवानें म्हणा, तिचा प्राण गेला नाहीं. विहिरींत पाणी अगदीं थोडें होतें, आणि आवाज ऐकतांच आमच्या घरची पुरुषमंडळी जागी झाली ती विहिरीकडेच धांवली. त्यांनीं आईला वर काढली. आई शरमिंदी झाली. आणि "माझा डाव हुकला," असें म्हणून कपाळावर हात मारून घेऊन रडूं

लागली. हा सगळा देखावा माझ्या डोळ्यापुढें उभा राहिला. ‘ माझें तसें झालें तर ! ’ असा विचार मनांत येऊन माझा जीव कासावीस झाला. ‘ विहीर कीं रेलवे स्टेशन ? ’ हेच शब्द मीं सारखे मनांतल्या मनांत हजार वेळां उच्चारले असतील त्या दिवशीं !

तो सारा दिवस मीं रडूनच काढला. जेवलें नाहीं, खाल्लें नाहीं, डोकें वर केलें नाहीं, आंथरुणांतून उठलें सुद्धां नाहीं; पोट दुखतें असें सांगून निजून राहिलें. रात्रीं नेहमींप्रमाणें सगळ्यांची निजानीज झाली. आई माझ्याजवळच निजे. तिला न कळत कसें उठून जावें या विचारांत मी होतें. मला झोंप नव्हतीच. मनाचा निश्चय केला, तरी मरणाच्या भीतीनें हातापायांना कांपरें सुटलें होतें. रुळावर पडायला धीर होईल कीं नाहीं असें मनांत येत होतें. सगळ्या अंगाला दरदरून घाम सुटला होता. मध्यरात्र होईपर्यंत मी सारखी तळमळत होतें. ऊठबस करीत होतें. आई जागीच होती.

“ असं काय करतेस ताई तूं आज ? काय होतं आहे तुला ? ” असें म्हणत तिनें माझ्या अंगाला हात लावून पाहिला. माझें अंग घामानें चिंब झालें असल्याचें तिला समजलें. तिनें चटकन् दिवा लावला; आणि माझा भेदरलेला पांढरा फटफटित पडलेला चेहरा पाहून, “ काय ? विचार काय आहे तुझा ? ” असें ती घाबरून म्हणाली. मी तिच्या कुशींत डोकें खुपसून हुंदके देऊं लागलें. मला कांहींच बोलवेना. तिनें माझें अनेक प्रकारानें शांतवन करून आल्या प्रसंगाला धैर्यानें तोंड देण्याचा उपदेश केला. माझा मरण्याचा विचार जागच्या जागीं थिजला ! अकरावा दिवस उजाडला. परंतु माझी भीति निराधार ठरली. तसें कांहींच घडलें नाहीं.

एक संकट निवारण झालें तरी ‘ पुढें काय ? ’ हा प्रश्न मला भेडसावीतच होता. सगळा जन्म जायचा कसा ? आईनें आपलें आतांपर्यंतचें आयुष्य परावलंबनांत काढलें होतें, तरी आम्हां मुलांकडे पाहून हें परावलंबन तिला

राजी झालें होतें. पण मी कसें करणार ? आपला मुलगा शिकेल सवरेल मिळवता होईल, या आशेवर ती दिवस काढीत होती, पण मला कशाचीच आशा दिसत नव्हती. सगळाच अंधार ! विचार करून करून मन दमलें कीं कोंडी बसू ! असेच माझे दिवस चालले होते. महिना लोटला असेल. एक दिवस रात्रीचें सगळें काम आटपून मी माझ्या अंथरुणावर पडलें असतांना आईशीं चाललेलें संभाषण माझ्या कानांवर आलें.

माझे काका माझ्याविषयींच माझ्या आईजवळ बोलत होते. हें संभाषण ऐकल्याबरोबर निराशेच्या काळ्या ढगांत आशेचे किरण चमकले. थिजलेल्या नि मेलेल्या विचारांना एकदम चालना मिळाली. 'कसें करूं काय करूं' ? या प्रश्नाचें उत्तर सांपडल्यासारखें वाटलें. त्या दिवशीं रात्रीं पहिल्यानेंच मला स्वस्थ झोंप लागली. मी जी एकदां आयुष्याचें पुढचें चित्र डोळ्यापुढें रेखाटीत डोळे मिटून पडलें ती झोपलें केव्हां, तें माझें मलाच समजलें नाहीं. इतके दिवस जरा कांहीं खुट्ट झालें कीं जागी होणारी मी ! पण त्या दिवशीं रात्रीं इतकी गाढ झोपलें कीं मोठें उजाडलें तेव्हां मला हांक मारून उठवावी लागली.

आईच्या संमतीनें थोडयाच दिवसांनीं एक दिवस रात्रीच्या गाडीनें गुपचूप कर्वे ह्यांच्या पुण्यांतल्या आश्रमांत माझी रवानगी झाली; व माझ्या नवीन जीवनक्रमाला सुरुवात झाली.

मला पुण्यांत शिकायला ठेवल्याचा सुगावा हळू हळू माझ्या इतर नातेवाइकांना लागला. त्यांची काकांकडे येऊन पूसतपास सुरू झाली. माझ्या मामांनीं काकांना पत्र लिहून कळविलें कीं, " तुम्हांला तुमची पुतणी पोसवत नव्हती, तर माझ्या हॉटेलांत तिला लावून घेतली असती." माझ्या दुसऱ्या मोठ्या चुलत्यांनींही मला शिकायला पाठवल्याबद्दल असाच दोष देऊन, " वहिनीनें तरी कसें तुला असें करूं दिलें ? " असें विचारलें होतें. आमच्या

कोंकणांतल्या लोकांनीं तर, मी बाटलें, कोणाचा तरी हात धरून गेलें, असेंही उठवायला कमी केलें नाहीं. या सगळ्यांच्या वर ताण माझ्या एका नणंदेनें केली. तिनें पुण्यांतल्या वेश्यांच्या वस्तींत गुप्त रीतीनें माझा तपास करण्यासाठीं एका माणसाची योजना केली !

परंतु मला कशाचीच दाद नव्हती. माझें शिक्षण व्यवस्थित चालू होतें. काकाकाकू कोंकणांत गेलीं, तेव्हां त्यांना सर्वांनीं प्रश्न विचारून भंडावून सोडलें. सगळ्यांची समजूत घालतां घालतां त्यांच्या नाकीं नव आले. शेवटीं चिडून ते उत्तर द्यायचे, "होय पाठवली मीं तिला शिकायला, मग काय म्हणतां तुम्ही ?"

आश्रमाच्या मदतीनेंच माझें अथपासून इतिपर्यंतचें शिक्षण झालें. शिक्षण सुरू असतांना मी फारशी कोंकणांत गेलेंच नाहीं, परंतु मॅट्रिक झाल्यावर जेव्हां प्रथम मी तिकडे गेलें, तेव्हां माझ्या राहणींत, पोशाखांत, खाण्यापिण्यांत, बोलण्याबसण्यांत कांहींच फरक पडलेला नाहीं, असें बघून सगळ्यांना नवल वाटलें. माझ्या बरोबरीच्या शेजारच्या घरांतल्या विधवा मुलींना तर माझा हेवाच वाटूं लागला. व त्या तसें बोलूनही दाखवूं लागल्या. त्या म्हणत, "तूं काय बाई, आतां पुरुषांसारखी पैसे मिळवूं लागणार, स्वतंत्र होणार ! आम्ही मात्र जन्मभर सैंपाकच करीत राहणार !"

माझ्या हातून बी. ए. पर्यंतचा शिक्षणक्रम पुरा होईल, असें माझ्या काकांना वाटलें नव्हतें. ही सरासरी मराठी सातवी पास होईल, आणि मग आपण हिला मुंबईच्या एखाद्या मुलींच्या प्राथमिक शाळेंत चिकटवून देऊं, असा त्यांचा बेत होता. म्हणून मी मॅट्रिक झाल्यावरच त्यांना धन्यता वाटली; आणि कॉलेजचें शिक्षण घेण्याकरतां मीं मुंबईस त्यांच्याजवळच राहावें असें त्यांनीं मला सुचविलें. परंतु मला त्यांचा तो बेत पसंत पडला नाहीं. मीं तसें केलें असतें, तर माझें शिक्षण संपल्यावर त्यांच्या सल्ल्यानेंच,

ते गुजरातील ती नोकरी करण्याचा मोह मला झाला असता. एखाद्या मुलींच्या सरकारी हायस्कुलांत मोठ्या पगाराची नि मोठ्या हुद्द्याची नौकरी मला मिळवून देण्याइतकें त्यांचें शिक्षणखात्यांत वजन होतें. तसें त्यांनीं मला बोलूनहि दाखविलें होतें. परंतु मी मॅट्रिकच्या वर्गांत असतांनाच आपलें शिक्षण संपल्यावर कर्वे सांगतील तेथें स्त्री-शिक्षणप्रचाराचें कार्य करण्याचें वचन दिलेलें असल्यामुळें मी त्यांच्या सूचनेला नकार दिला. काकांनींहि मला आडकाठी केली नाहीं.

माझा सगळा शिक्षणक्रम पुरा झाल्यावर स्त्रीशिक्षणाकरतां झटणाऱ्या एखाद्या संस्थेंतच कार्य करण्याचें मीं ठरविलें. माझ्या आईला किती धन्यता वाटली असती हें माझें यश पाहून ! आईच्या कौतुकांतला आणि शाबासकींतला आनंद अवर्णनीय असतो ! त्या आनंदाला मी तिच्या मृत्यूनें पारखी झालें होतें. तरी पण काकाकाकूंनीं ती उणीव भरून काढली.

आपल्या आयुष्याचा कसा तरी अंत करून घ्यावा, असा विचार करणारी चाळीस वर्षांपूर्वीची 'मी', आणि हरप्रयत्नांनीं आपलें आयुष्य वाढवावें ह्या चिंतेत असणारी हल्लींची 'मी'! किती मोठें परिवर्तन हें ! आश्रमाच्या पुण्याईनेंच मला हे दिवस दिसले.

स्वर्गस्थ देवांनीं पापी समजल्या जाणाऱ्या त्रिशंकूला मृत्युलोकांत ढकलून दिल्यावर विश्वामित्र मुनींनीं जशी त्याच्यासाठीं स्वतंत्र निराळी सृष्टि निर्माण केली, तशी महर्षि कर्वे ह्यांनीं आश्रमाची प्राणप्रतिष्ठा करून समाजांत हीन व पापी गणल्या गेलेल्या विधवांसाठीं नवी सृष्टिच निर्माण केली नाहीं तर काय !

२

# सवत ती सवत !

हिंगण्याच्या अध्यापिकाशाळेंतील शिक्षणक्रम संपवून बाहेर पडल्यापासून गेलीं बारा वर्षें मालतीबाई ठाण्याच्या एका खाजगी प्राथमिक शाळेंत शिक्षिकेचें काम करीत आहेत. या बारा वर्षांत त्यांच्या शाळेंत चार पांच वेळां जुन्या हेडमिस्ट्रेस बदलून नव्या आल्या; पण मालतीबाईंची मात्र कुठेंच बदली झाली नाहीं. त्या शाळेंत रुजू झाल्यापासून तों आजपर्यंत शाळेंतील बालवर्गच त्यांच्याकडे दिलेला आहे. आणि नवलाची गोष्ट ही कीं, पहिल्या वर्षांच्या उत्साहाइतक्याच उत्साहानें नि उल्हासानें तो त्या शिकवीत असतात. कुठचाहि विषय त्या शिकवीत असोत, मालतीबाई तो शिकवीत असतांना इतक्या तन्मय होत असतात, कीं कित्येक वेळां त्यांच्या हेडमिस्ट्रेस हळूंच येऊन वर्गांत बसतात, तें त्यांच्या आणि मुलांच्या लक्षांतहि येत नाहीं. खेळ आणि गाणीं शिकवितांना तर त्या मुलांमध्यें इतक्या रंगतात

की विचारता सोय नाहीं. मुलांबरोबर मुलगी होऊन नाचत बागडत असतात. या त्यांच्या गुणांमुळें मुलांमुलींना त्या फार प्रिय होऊन राहिल्या आहेत.

मालतीबाई शाळेंत मुलांना जशा प्रिय वाटतात, तशाच त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाहि त्या आवडतात. कारण त्यांचें काम चोख असतें. किती काम दिलें तरी कधीं तक्रार करणें त्यांना माहीत नाहीं. रजा घेणें त्यांना माहीत नाहीं. बारा वर्षांत बारा दिवसहि त्यांनीं रजा घेतलेली नाहीं.

हिंगण्याच्या अध्यापिकाशाळेला सरकारी मान्यता मिळालेली नव्हती तेव्हांचें सर्टिफिकेट असल्यानें त्यांना २५ रुपयांऐवजीं २० रुपये वेतनावरच नेमण्यांत आलें होतें. तेव्हांपासून आतां कुठें बारा वर्षांनीं दोन रुपये वाढ त्यांना देण्यांत आली आहे, तीही त्यांच्याविषयीं त्यांच्या हेडमिस्ट्रेसनीं शिफारस केली म्हणून. न्याय्य असूनहि, कमी वेतनाविषयीं कधीं जोराची तक्रार मालतीबाईनीं केलेली नाहीं. पगार कांहींहि मिळो, काय वाटेल तें झालें तरी आपण आपलें काम जन्मभर प्रामाणिकपणानें करीत राहायचें, असा जणूं काय निश्चयच त्यांनीं केला आहे.

मालतीबाईचा रोजचा कार्यक्रम रेखीव ठशाचा दिसतो. त्या घरच्या जरी एकट्या असल्या तरी त्यांनीं भावाबहिणींचीं लहान लहान मुलें आपल्याकडे, शिक्षणाकरितां म्हणा किंवा थोडासा स्वतःला विरंगुळा म्हणून म्हणा, आणलेलीं आहेत. त्यांचें सगळें काम वेळच्यावेळीं त्यांनाच करावें लागतें. म्हणून त्या सकाळीं झुंजूमुंजूं होतांच उठून कामाला लागतात. घरांतलें जेवणखाण, स्वैंपाकपाणी वगैरे सगळीं कामें एकट्यानेंच उरकावयाचीं असल्यामुळें सकाळचा त्यांचा सगळा वेळ त्यांना त्यांतच घालवावा लागतो. नंतर अकरा ते सहापर्यंतचा वेळ शाळेंत, नि शाळेनंतरचा एक तास शिकवणी करून त्या सात साडेसात वाजतां बिऱ्हाडीं येतात. पुन्हां रात्रींचा स्वैंपाक, मुलांचा अभ्यास हीं कामें असतातच. इतकीं सगळीं कामें नि दगदग केली

तरी त्यांच्या चेहऱ्यावर कुणाला कधीं त्रासिकपणा, चिडखोरपणा दिसत नाहीं. सदा हंसतमुखानें समाजांत वावरणें हेंच त्यांच्या स्वभावाचें वैशिष्टय दिसून येतें. त्यांच्या बरोबरच्या इतर शिक्षिका गप्पागोष्टी करतां करतां एकमेकींजवळ आपआपल्या घरच्या गोष्टी सहज बोलून जातात. पण मालतीबाई त्यांच्या संभाषणांत क्वचितच भाग घेत असतात. आपण एकट्या कां राहातों, आपले यजमान कुठें असतात नि काय करतात, सासरचीं माणसें कुठें असतात, तीं कधीं आपणांकडे कां येत नाहींत, याविषयीं कोणीं मैत्रिणींनीं कांहीं विचारलें किंवा बोलणें काढलें तर त्या लागलीच गंभीर होतात, विषय बदलतात, बोलायची टाळाटाळ करतात आणि तिथून निघून जातात. या त्यांच्या चमत्कारिक वागण्यामुळें त्यांच्या मैत्रिणींना मोठा अचंबा वाटतो. आणि त्या म्हणतात, "मालतीबाई म्हणजे एक कोडेंच आहे."

आपलीं सुखदुःखें बरोबरीच्या मैत्रिणींजवळ सांगून मन हलकें होतें, हें खरें. पण 'सुख सांगावें जनांत, आणि दुःख ठेवावें मनांत' याच वृत्तीच्या मालती-बाई दिसतात. कारण त्या आपल्या प्रौढ विद्यार्थिनींशीं बोलतांना असाच उपदेश त्यांना करीत असतात. 'आपलीं दुःखें वेशीवर टांगून लोकांकडून उसनी सहानुभूति कधीं मिळवूं नये,' असेंच त्या पुष्कळ वेळां प्रतिपादन करतात. आणि तें खरेंच आहे. आपलीं दुःखें आपल्याला; लोकांना काय त्यांची कल्पना ? तीं ऐकून 'अरेरे ! वाईट झालं.' किंवा 'बिचारी, तिला सुख नाहीं हो !' असे उद्गार काढून ते स्वस्थ बसतील. दुसरें काय ? त्यांच्या दुःखपरिहारार्थ खटपट करतें कां कोणी ? मग उगीच कशाला आपल्या दुःखद परिस्थितीचें लोकांपुढें प्रदर्शन करायचें ? असें करणें हें मानसिक दौर्बल्य वाटतें मालतीबाईंना. म्हणून त्या स्वतःची परिस्थिति कधींच कोणापाशीं सांगत नाहींत.

ज. क्र
विभाग

मालतीबाईंनीं आपली खरी परिस्थिति इतरांपासून लपवून ठेविली असली, तरी मनांतून ती नाहींशी होणें शक्य नाहीं. त्यांनीं आपलें मन कामांत गुंतवून पूर्वस्मृति विसरण्याचा यत्न केला, तरी रात्रीच्या निवांत वेळीं त्या सगळीं कामें आटपून बिछान्यावर पडतात, त्या वेळीं त्यांच्या गत आयुष्यांतल्या अनेक घटनांचा चित्रपट त्यांच्या डोळ्यांपुढें उभा राहतो, आणि त्यांना बेचैन करून सोडतो. अशा वेळीं त्या रात्रीच्या रात्री अश्रू गाळण्यात घालवितात.

‘ आपण दीडदोन वर्षांच्या असतांना आपली आई मृत्युमुखीं पडल्यामुळें आपल्या वडिलांनीं आपणांस आजोळीं पोंचविली. दहा वर्षें आपण आजोबा आजीच्या सान्निध्यांत राहिलों. आईवेगळी मुलगी म्हणून सगळ्यांनीं आपले अतिशय लाड केले; आपले निरनिराळे हट्ट पुरविले. वडिलांनीं आपला दुसरा संसार उभा केला. त्यामुळें आपल्याला ते विसरून गेले. परंतु आपण बारा वर्षांच्या झाल्यावर लग्नासाठीं म्हणून ते आपल्याला घरीं घेऊन जाण्यासाठीं आले. त्यांच्याबरोबर जायला आपण नाखूष होतों. तरी आजोबांनीं आपल्याला त्यांच्याबरोबर पाठविलें, म्हणून आपल्याला किती वाईट वाटलें.

‘ वर्ष दीड वर्ष आपल्याला सावत्र आईच्या हाताखालीं मोठ्या कष्टानें काढावें लागलें. आपलें लग्न ठरल्याचें वडलांनीं माईला सांगितलें तेव्हां, बरें झालें माईच्या जाचांतून सुटलों, असें वाटून आपल्याला आनंद झाला. लग्न होऊन सासरीं गेल्यावर आपल्या सासूबाई, जावा, नणंदा, आपलें कितीतरी कोडकौतुक करीत, त्यामुळें आपण कशा खुषींत होतों, ’ वगैरे घटना त्यांच्या मनापुढून भरभर सरकून जातात.

त्यांच्या विचारांची मालिका येथपर्यंत येते तेव्हां त्या एकदम अंथरुणावरून उठून दिवा लावून वाचीत बसतात. आणि ‘करायचं काय आतां मागल्या आठवणी काढून,’ असें आपल्याशींच पुटपुटतात. परंतु वाचनाकडे लक्ष

कुठचें लागायला ? कोणत्याहि गोष्टीचें असेंच असतें. एखादी स्मृति आपल्याला होऊंच नये म्हणून आपण ती विसरण्याचा यत्न करावा, तों ती आपल्या मनापुढें अधिकच स्पष्टपणानें उभी राहावी, तसेंच मालतीबाईंचें होतें. पुष्कळ वेळां त्यांच्या व पतीच्या होणाऱ्या पहिल्या ओळखीच्या वेळचा प्रसंग डोळ्यांपुढें दिसतो. किती उत्सुकतेनें आपले पति आपल्याला भेटायला आले होते ? पण त्यांची किती दारुण निराशा झाली ! ते चमत्कारिक नजरेनें एखाद्या माथेफिरू माणसासारखे आपल्याकडे पाहूं लागले. आपण किती भ्यालों होतों ? काय करावें, कुठें जावें, तें सुचेनासें झालें. आणि शेवटीं आपण ओक्साबोक्सी रडूं लागलों. तें पाहून ते शुद्धीवर आल्यासारखे दिसले, नि त्यांनीं आपल्याला आंथरुणावर जाऊन निजायला सांगितलें. आपण निजलों. पण ते मात्र सगळी रात्र खोलींत येरझारा घालीत एखाद्या वेडयासारखे हिंडत होते. त्या वेळचा त्यांचा तो भेसूर पांढरा फटफटीत चेहरा मालतीबाईंना आठवला म्हणजे त्यांना परमावधीचें दुःख होतें.

मालतीबाई त्या वेळीं लहान असल्यामुळें आपणांमध्यें असलेल्या नैसर्गिक वैगुण्यामुळें आपण जन्माच्या दुःखीच राहूं, याची जाणीव त्यांना तितक्या तीव्रतेनें होत नव्हती. पण त्या जसजशा मोठ्या होऊं लागल्या, तसतशी त्यांना आपल्या भावी आयुष्यक्रमाची कल्पना स्पष्टपणें येऊं लागली. कारण त्यांच्या सासूबाई, जावा, नणंदा, वगैरेंकडून त्यांना मिळणाऱ्या वागणुकींतहि हळू हळू फरक पडूं लागला. बापानें फसवून असली मुलगी आपल्या मुलाच्या गळ्यांत बांधली, असें सासूबाईंना वाटूं लागलें आणि 'आतां माझ्या बापूचा संसार कसा होणार ?' या विचारानें त्यांना चैन पडेनासें झालें. "लग्नाला तीन वर्षें होत आलीं, तरी अजून नातवाची तयारी कशी नाहीं सूनबाई करीत ?" असें शेजारणी विचारूं लागल्या. मालतीबाईंच्या पतीनें

मात्र या वैगुण्याबद्दल त्यांना दूर लोटायचें नाहीं, असें ठरविलें होतें. ते त्यांच्याशीं प्रेमळपणानें वागत.

आपणांस पतीचें सुख लाभावें, मुलेंबाळें व्हावीं, सुखाचा संसार करावा, असें कोणत्या स्त्रीला वाटत नाहीं ? मालतीबाईंना त्यांच्या पतीचें प्रेम मिळत होतें. घरदार होतें. पैसाअडका कमी नव्हता. पण पत्नीच्या नात्यानें त्यांना आपल्या पतीशीं वागतां येत नव्हतें. त्यांच्यामधील असलेलें नैसर्गिक वैगुण्य दूर होऊन त्यांना मुलें व्हावींत, ह्यासाठीं नामवंत डॉक्टरवर्गाकडून उपाययोजना करण्यांत त्यांच्या पतीनें पुष्कळ पैसा खर्च केला. परंतु शेवटीं सगळे प्रयत्न निष्फळ ठरले.

'आतां पुढें काय ?' हा प्रश्न बापूंच्या पुढें पडला. त्यांना चैन पडेना; काम सुचेना. मालतीबाईंची केविलवाणी मुद्रा डोळ्यांनीं पाहवेना. त्यांच्या आईनें दुसरें लग्न करण्याबद्दलचें टुमणेंहि कांहीं दिवसांनीं त्यांच्यामागें लावलें. अशा मनस्थितींत असतांना त्यांच्या एका मित्रानें मालतीबाईंना शिक्षण द्यावें, तिला सेवासदन किंवा आश्रमासारख्या संस्थेंत पाठवावी, असें बापूंना सुचविलें. त्यांनाहि ती कल्पना पटली. एक दिवस ते मालतीबाईंना म्हणाले, " तूं शाळेंत जाशील कां ? माझ्या मनांत तुला शिकवायची आहे. "

" हो, आनंदानं शिकेन. नाहीं तरी माझा तुम्हांला उपयोग नाहींच. तुम्हांला दुसरं लग्न करायला हरकत नाहीं. मग तुम्ही तरी सुखी व्हा. " मालतीबाईंनीं उत्तर दिलें.

हें उत्तर ऐकून बापूंना वाईट वाटलें. ते म्हणाले, " तुझी ब्याद टाळावी म्हणून मी तुला दूर ठेवतों असें कां तुला वाटतें ? तर मग आपला बेत रद्द, तुला शिकवण्याचा. "

" तुम्हांला राग यावा म्हणून नाहीं असं बोललें. मला खरंच मनापासून वाटतं, मीं शिकून माझ्यापुरतं पोटाला मिळवावं आणि तुम्हांला तुमच्या जबाबदारींतून मोकळं करावं. तुम्हीं तरी माझ्यासाठीं आपल्या सुखाचा होम कां करावा ? आणि मीं तरी माझ्यावर असलेल्या तुमच्या प्रेमाचा असा गैरफायदा कां घ्यावा ? माझ्या दैवांत जें सुख ईश्वरानं लिहिलं नाहीं, तसलं सुख तुम्हांलाही मिळूं नये, अशी मीं कां इच्छा करावी ? सासूबाई म्हणतात तेंच खरं आहे. तुम्ही दुसरं लग्न करून सुखानं संसार करा. मला त्यांत आनंद वाटेल. मी तुमची सेवा करीन, मुलांचं कोडकौतुक करीन. सवती-जवळ बहीण म्हणून राहीन हवी तर. तुम्ही नको म्हणेपर्यंत राहीन. मग पाठवणार ना मला शिकायला ? "

शिकायला कुठें जावें, कोणता शिक्षणक्रम घ्यावा, मॅट्रिक व्हावें किंवा ट्रेनिंग कॉलेजचा शिक्षणक्रम पुरा करावा नि नंतर घरीं अभ्यास करून कर्वे मॅट्रिकला बसावें, ह्या गोष्टींचा खल होऊन शेवटीं हिंगण्यास जाऊन अध्यापिकाशाळेचा अभ्यासक्रम पुरा करण्याचें दोघांमध्यें ठरलें. आणि त्याप्रमाणें मालतीबाईची रवानगी तिकडे झाली.

बापू स्वतः मालतीबाईंना घेऊन गेले. सगळी चौकशी करून तिथल्या नियमांप्रमाणें सगळी व्यवस्था केली. आणि दर आठवड्याला खुशाली कळवण्यास तिला सांगून ते परत मुंबईस गेले. मालतीबाईच्या विद्यार्जनाला सुरुवात झाली. केवळ शिक्षणाची हौस म्हणून आपल्या पतींनीं आपणांस येथें पाठविलें, असें त्या बोर्डिंगांतल्या मुलींना सांगत. तेव्हां त्यांना त्यांच्या यजमानांचें कौतुक वाटे. त्या म्हणत, " किती हौशी आहेत मालतीचे यजमान ! "

आश्रमांत मालतीबाईचें शिक्षण व्यवस्थित रीतीनें चालू होतें. त्यांचे यजमान त्यांना भेटण्यासाठीं महिन्यांतून एखादी खेप पुण्याला टाकीत.

त्यांना हव्या असलेल्या वस्तु पुरवीत. दर सुट्टीला त्यांना मुंबईस घेऊन जात. अशा रीतीनें चार वर्षें लोटलीं. आतां दोन वर्षांनीं त्यांचें शिक्षण संपणार होतें. त्या शिक्षिका होणार होत्या. आतां आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सुटला आहे, यजमानांच्या पैशावरच सर्वस्वीं अवलंबून राहावें लागणार नाहीं, असा आत्मविश्वास त्यांच्या मनांत उत्पन्न झाला होता. आपल्याला यजमान अंतर देणार नाहीत, याची त्यांना खात्री होती. पण त्यांनीं पुढें मागें लग्न केलेंच तर त्यांच्याजवळ राहणें आपणांस कितपत जुळेल ? सवतीला तें कितपत आवडेल ? हा प्रश्न त्यांच्यापुढें होताच. त्या दृष्टीनें त्या विचार करीत, तेव्हां त्यांना वाटे, आपण चार पैसे मिळवून संसारांत भरच टाकूं. तेव्हां तिला माझें राहणें न आवडायला काय झालें ? उलट तिला माझी मदतच होईल. तिचीं मुलें तीं आपलींच मुलें, आपला संसार तो तिचाच संसार, या भावनेनें आपण वागूं आणि सवती सवती बहिणीबहिणींप्रमाणें नांदून दाखवूं, अशी महत्त्वाकांक्षा त्यांनीं बाळगली होती.

इकडे बापूंच्या मागें त्यांच्या आईनें लग्नाचें टुमणें लावलेंच होतें. बापूंची मित्रमंडळीहि त्यांना आतां लग्नाचा आग्रह करूं लागली. ते म्हणत "बायकोला शिकवलीस, तिच्यासाठीं इतके पैसे खर्च केलेस. आतां लग्न केलेंस तर तिला तुला दोष लावायला तोंड नाहीं." चोहोंकडून त्यांना लग्नाचाच उपदेश होऊं लागला. मालतीबाईहि तेंच म्हणूं लागल्या. तेव्हां त्यांच्याहि मनांत अलीकडे लग्नाचे विचार घोळूं लागले. पण तें कसें जमायचें ? प्रथम पत्नी जिवंत असतां दुसरी पत्नी करायला निघालें, तर मुलगी देणार कोण ? दुसरें लग्न करण्याचें कारण सांगायचें, तर तें ढोंग वाटायचें लोकांना ! दुसरें, हें कारण बाहेर लोकांत पसरलें तर मालतीच्या मनावर काय परिणाम होईल ? आणखी असेंहि त्यांना वाटे कीं, मालतीविषयींचें आपल्याला वाटणारें प्रेम लग्न झाल्यावर तितक्या उत्कटपणानें व्यक्त करणें शक्य होणार

नाहीं. आणि मग तिचें मन दुखेल. आपण तिच्याशीं चांगले वागलों तरी तिची सवत तशी वागेलच असें कसें सांगतां येईल ? तसें वागण्याची जबरदस्ती कशी करायची तिच्यावर ?

ह्या विचारांच्या आंदोलनांत जवळ जवळ वर्ष गेलें. शेवटीं नाहीं होय करतां करतां बापूंनीं लग्न करण्याचें कबूल केलें. मालतीबाईच्याच वर्गात शिकत असलेल्या कमल नांवाच्या एका साताऱ्च्या मुलीशीं त्यांनीं लग्न केलें. कमल मालतीबाईची मैत्रीणच होती. ती सुस्वभावी मुलगी होती. ती एकदां मुंबई पहायला म्हणून सुटींत मालतीबाईच्याच बरोबर गेली होती, ती चार दिवस तिथें राहिली. तिला मालतीबाईची खरी हकीगत माहिती होती. तिनें ती आपल्या मामांना सांगून आपण बापूंशीं लग्न करायला तयार असल्याचेंहि सांगितलें. लग्न झाल्यावरहि आपण बहिणीं-प्रमाणें प्रेमानें वागावयाचें अशा दोघींच्या आणाशपथा झाल्या आणि दोघी मैत्रिणी, सवतीसवती झाल्या. कमलनें लग्न झाल्यावर शिक्षण सोडलें. मालतीबाईनीं मात्र आपला अभ्यासक्रम पुरा केला, अणि त्या घरीं राहायला गेल्या.

मुंबईच्याच एखाद्या शाळेंत नोकरी करावी असें सगळ्यांचेंच म्हणणें पडलें म्हणून मालतीबाईनीं तशी खटपट केली. परंतु वर्ष सहा महिने तरी ती मिळण्याचा संभव नाहीं, असें त्यांना समजलें. वर्षभर घरांत रिकामा वेळ काढण्यापेक्षां दुसरीकडे कुठें गेलेलें काय वाईट, असा विचार करून त्यांनीं ठाण्याच्या लोकलबोर्डाच्या एका शाळेंत तात्पुरती शिक्षिकेची जागा रिकामी होती, तेथें जाण्याचें पत्करलें आणि आठ दिवसांनीं जरूरीपुरतें बिऱ्हाडाला लागणारें सामान घेऊन त्या ठाण्याला गेल्या. त्यांच्या बरोबर कमल नि बापूहि गेले. त्यांनीं बिऱ्हाडाची सगळी व्यवस्था लावून दिली. आणि मग तीं घरीं गेलीं. मालतीबाईचें काम सुरू झालें. शनिवारीं

रविवारीं बापू किंवा कमल भेटायला येत किंवा त्या मुंबईला जात. अशा प्रकारें चार सहा महिने गेले. बापूंचा संसार खेळीमेळीनें चालला होता. बापूंचें सुख बघून कमलपेक्षां मालतीबाई अधिक खूष होत्या नि तें तसेंच राहावें म्हणून त्या कमलवर पाठच्या बहिणीप्रमाणें माया करीत.

दोन कोंबड्या झुंजवून त्यांच्या भांडणांत आपलें मन रमवणारीं कित्येक माणसें असतात. तसेंच एखाद्या सुखी कुटुंबांतल्या दोन माणसांत वैमनस्य निर्माण करून गंमत पाहण्याची खोड पुष्कळ लोकांना असते. बापूंच्या कौटुंबिक सुखी जीवनांत माती कालवणारीं माणसें होतींच. त्यांनीं त्यांच्या कुटुंबांत कलहाचें बीज पेरायला सुरुवात केली. त्यांनीं मालतीबाईविषयीं अनेक प्रकारच्या कंडया उठवून कमलचें मन कलुषित करण्याचे यत्न चालविले.

ऑफिसच्या कामाकरितां बापू कधीं कधीं गांवाला जात, अगर रात्रपाळी असली म्हणजे ते रात्रीं ऑफिसमध्यें जात. पण शेजारच्या बायकांनीं बोलतां बोलतां एकीमेकींजवळ म्हणावें, “ बापूंची कचेरी ठाण्याला जाते रात्रीची. मग नको का त्यांना तिकडे रात्रपाळी करायला जायला ? ” हे शब्द कमलच्या कानांवर पडावे अशा व्यवस्थेनें उच्चारले जायचे. साहजिकच बापू घरीं आल्यावर कमल त्यांना खोदून खोदून विचारी. पण पहिल्या पहिल्यानें बापूंच्या लक्षांत तिच्या विचारण्यांतील खोंच येत नसे. बापूंच्या आईला देखील तिच्या मैत्रिणी देवळांत भेटत, तेव्हां मालतीबाईविषयीं अनेक खोटयानाटया गोष्टी सांगत. ‘ तिनं अनेक मित्र केले आहेत ठाण्यास. तिची अब्रू चवाठयावर यायची भीति नाहीं कांहीं नाहीं. म्हणून हिंडते आहे पुरुषांबरोबर. आज याच्याबरोबर, तर उद्यां त्याच्याबरोबर. तुमच्या मुलानं तिला शिकवून स्वतंत्र केलं, त्या उपकारांची फेड छान करते आहे ! ’

मनुष्य किती विचारी आणि खंबीर मनाचा असला, तरीहि त्याच्याजवळ एखाद्या व्यक्तीविषयीं सारखें वाईटच बोलत राहिलें, तर त्याचें मन संशयी बनतें. बापूंचें तसेंच होऊं लागलें. त्यांना मालतीबाईविषयीं जरी पूर्ण खात्री होती, तरी अशा प्रकारच्या कंड्या कानांवर येऊं लागल्यावर त्यांची वृत्ति हळूं हळूं बदलली. त्यांची आई आणि कमल ह्यांच्याकडूनहि मालती-बाईंच्या अशाच गोष्टी सांगितल्या जात.

एकदां कमल बरीच आजारी होती. डॉक्टरांनीं तिची बरीच काळजी घ्यायला हवी असें सागितलें होतें. हें मालतीबाईना समजल्यावर त्या शाळेंतून रजा घेऊन घरीं जाऊन राहिल्या. त्यांनीं कमलची अगदीं मनोभावें शुश्रूषा केली. कमलला बरें वाटूं लागलें. डॉक्टरनीं मालतीबाईना शाबासकी दिली. मालतीबाईंना वाटलें आतां तरी कमलचें मन साफ होईल. पण एकदां बिनसलेली मनाची घडी पुन्हां साफ झाली नाहीं, असाच त्यांना अनुभव आला.

मालतीबाईनीं मुंबईस नोकरीची खटपट करावी असें बापूंना वाटतच होतें. त्याप्रमाणें त्यांनीं त्यांना सांगितल्यावरून त्या खटपट करूं लागल्या. कारण त्यानांहि एकटें राहणें आवडत नव्हतेंच, पण कमलला तें मुळींच पसंत नव्हतेंसें दिसलें. बापूंचा हा बेत तिला समजल्यापासून तिची सारखी धुसफूस सुरू झाली. तिला वाटे बापूंचा ओढा मालतीबाईंकडे अधिक आहे. त्यांनीं कांहींतरी मोहिनी घातली त्यांच्यावर, म्हणूनच त्यांचें आपल्यावरचें प्रेम उडालें. शेवटीं तिनें बापूंना स्पष्टच सांगितलें कीं, “ मालतीबाई घरांत राहणार असल्या तर आपण माहेरीं जाणार ! ” बापू हतबुद्ध झाले !

इतक्यांत मालतीबाई तिथें येऊन म्हणाल्या, “ मीं उद्यां ठाण्याला जाऊन तिथेंच कायम व्हायचें ठरवलें आहे. ” हें ऐकून कमल एकदम चपापली.

आपलें बोलणें मालतीबाईनीं ऐकलें वाटतें, अशा अभिप्रायानें तिनें बापूंकडे पाहिलें. परंतु कोणींच कांहीं बोललें नाहीं. बापू मात्र खिन्न नि सुन्न मनानें तिथेंच किती वेळ बसून होते.

मालतीबाई बरोबरच दुसऱ्या दिवशीं सगळ्यांचा निरोप घेऊन ठाण्यास आपल्या बिऱ्हाडीं निघून गेल्या. त्या पुन्हां मुंबईच्या बिऱ्हाडाची पायरीहि चढल्या नाहींत.

कमलचे शब्द त्यांना फार लागले होते. 'एका म्यानांत दोन तरवारी रहात नाहींत, हेंच खरें. मग त्यांतली एक तरवार बोथट असली तरी ती तरवारच!' असेंच त्या मनाशीं म्हणत असतात. कित्येक रात्री त्यांच्या झोपेशिवाय जातात. पण सकाळीं उठल्यावर पुन्हां आपल्या रोजच्या कार्यक्रमाला सुरुवात करायला त्या चुकत नाहींत. लोकांना त्या सदाच आनंदी दिसतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नोंदणी क्र.
१८५२२
अ. क्र.
विभाग क था
क्रमांक ४३३
नों. दि.

# ३

## परित्यक्ता !

नवऱ्यानें टाकलेली म्हणून हिंगण्याच्या आश्रमांत फुकट प्रवेश मिळवावा, ही गणपतरावांची कल्पना सरस्वतीला मुळींच पटत नव्हती. परंतु गणपतरावांनीं अलिकडे तिच्यामागें सारखें टुमणें लावलें होतें. “ तूं आश्रमांत शिकायला जा, तूं विद्या शिकून आपल्या पायावर उभी राहावीस अशी माझी इच्छा आहे. पण तिथें खर्च देऊन तुला शिकायला ठेवीन म्हटलं तर मी हा असा भणंग भिकारी ! त्यांतून देशसेवेचें व्रत घेऊन सरकारी नोकरींतून बाहेर पडलेला ! विधवा किंवा नवऱ्यानं टाकलेली मुलगी असली तरच तिला अनाथबालिकाश्रमांत प्रवेश मिळतो. मग काय करायचं ? म्हणूनच मीं अशी युक्ति योजली आहे. नवऱ्यानें टाकलेली म्हणून मी तुला तिथं गुदरणार. ” हा गणपतरावांचा निश्चय ऐकून सरस्वती मोठ्या पेंचांत पडल्यासारखी झाली होती. तिचीहि शिकण्याची तीव्र इच्छा होती, परंतु असलें खोटेंनाटें सांगून तेथें प्रवेश मिळवून घेणें तिला पाप वाटत होतें.

गणपतराव राजापुरांतील एक विद्वान् पण विक्षिप्त व्यक्ति म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनीं एकदा एखादी कल्पना डोक्यांत घेतली कीं, ती तिथें कायमची मूळ धरून बसायची. मग कोणीं किती सांगितलें तरी त्यांचा ठरलेला विचार बदलायचा नाहीं. असल्याच कल्पनांपैकीं आपल्या सौभाग्यवतीस शिक्षण घेऊन स्वावलंबी बनविण्याची ही कल्पना गेल्या चार सहा महिन्यांपासून — विशेषतः त्यांनीं कॉंग्रेसला वाहून घेतल्यापासून त्यांच्या मनांत ठाम होऊन राहिली होती. ते कॉंग्रेसचे कट्टे अभिमानी असून खादीभक्त होते. त्यांनीं देशसेवेचें व्रत घेऊन कॉंग्रेसच्या प्रचारकार्याकरितां गांवोगांवीं हिंडण्याचें कबूल केलें होतें. या कामाचा मोबदला म्हणून त्यांना केवळ एकट्याचा खर्च भागेल इतकेंच वेतन मिळणार होतें. तेव्हां सरस्वतीची कांहीं तरी सोय करणें त्यांना भाग होतें. म्हणून तिला आश्रमांत अडकविण्याची त्यांनीं ही युक्ति योजली. आपण आपलें सर्वस्व देशकार्यासाठीं वेचणार आहोंत. मग तें करण्याच्या मार्गांतल्या अडचणी दूर करण्याकरितां खोटें बोलणें हें पाप नसून उलट तें राजकारण आहे. ‘पुष्कळांचें पुष्कळ सुख साधत असेल तर खोटें बोलणें पाप नाहीं’ असें गीतेंतहि वचन आहे. मग ही गीतेची शिकवण व्यवहारांत कां आणूं नये ? अशी त्यांची प्रामाणिक समजूत असल्यामुळेंच त्यांनीं आपल्या बायकोला टाकलेली स्त्री म्हणून आश्रमांत ठेवण्याचें ठरविलें होतें.

सरस्वती गणपतरावांचा तऱ्हेवाईक नि करारी स्वभाव पूर्णपणें ओळखून होती. त्यांचें न ऐकलें तर ते खरोखरच आपल्याला सोडून जातील, ही धास्ती तिच्या पोटांत असल्यामुळें तिनें नाइलाजानें त्यांच्या म्हणण्याला अखेर रुकार दिला. परंतु ‘शेजाऱ्या-पाजाऱ्यांना हें कळलें तर ते काय म्हणतील ? आईला काय कळवायचें ? कुठें, किती दिवस नि कशासाठीं जाणार म्हणून सांगायचें तिला ? माहेरच्यांना तरी नको का सांगायला ?’

असल्या विचारांनीं तिचें मन बेचैन झालें होतें. ती भांबावून गेली होती. राजापूर सोडण्यापूर्वी आईला तरी भेटून आलेंच पाहिजे असा हट्ट तिनें धरला आणि गणपतरावांची संमति घेऊन ती मुटाटास गेली.

गणपतरावांचा बेत आईला सांगण्याचें तिच्या अगदी जिवावर आलें होतें. पण आपलें दुःख सांगून मन हलकें करायला आईशिवाय दुसरें कोण मायेचें होतें तिला ? सरस्वतीची आई मोठ्या धीराची बायको होती. " अग नवऱ्याच्या मतानं वागणंच बायकोच्या जातीचं कर्तव्य आहे. खरा पतिव्रता-धर्म हाच आहे. त्यांनीं खरीखुरी नाहीं ना तुला टाकली ? मग म्हणेनात का नवऱ्यानं टाकलेली म्हणून लोक ! " असा उपदेश करून तिचें समाधान तिनें केलें.

शाळेची घंटा झाली होती. प्रार्थना संपवून मुली आपापल्या वर्गांत गेल्या होत्या. वसतिगृहाच्या व्यवस्थापिका ( मेट्रन – त्यांना सगळ्या मुली ' माई ' म्हणत ) सैंपाघरांतलें देखरेखीचें काम आटपून मुलींच्या खोल्यांची पाहणी करीत करीत आपल्या खोलींत येऊन नुकत्याच पलंगावर लवंडल्या होत्या. इतक्यांत कचेरींतून मोठ्या बाईंचें त्यांना बोलावणें आलें, म्हणून त्या तिकडे गेल्या. कचेरीच्या दाराशींच असलेल्या बांकावर एक २०–२२ वर्षांची मुलगी व तीस बत्तीस वर्षांचा एक मध्यम वयाचा पुरुष बसलेला दिसला. त्यांच्या चर्येवरून तीं अगदीं थकलेलीं दिसत होतीं. त्यांच्याजवळ सामान सुमान कांहीं दिसत नव्हतें, कीं बाहेर टांगागाडीही नव्हती. तीं दोघें पुण्याच्या स्टेशनवरून हिंगण्यापर्यंत पायींच आलेलीं असावींत. गणपतरावांनीं मुख्य बाईंजवळ आपल्या येण्याचें कारण सांगून सरस्वतीची बनावट हकीगत सांगितली होती. " हिचा नवरा, लहानपणचा माझा मित्र,

भंगीभंगी असून हिला छळीत असे. तरी ही इतके दिवस त्याचा छळ सोसून त्याच्याजवळ राहिली होती, परंतु एक दिवस त्यानें हिला घरांतून हांकून दिली. ही माझ्याकडे आली नि आतां काय करूं, म्हणून विचारूं लागली. तेव्हां मी आपल्या संस्थेचं नांव सांगून तिथें राहशील का, असं विचारलं. ती कबूल झाली, म्हणून आज तिला घेऊन आलों आहें. घरची गरिबी नि त्यांत नात्यागोत्याचं कोणी नाहीं; अशा परिस्थितींत आपण तिला आश्रय द्यावा अशी विनंती आहे. कुठें तरी मोलमजुरी करायची ती आपल्या संस्थेंत काम करील. आणि चार अक्षरं शिकेल."

माई कचेरींत आल्यावर, मुख्य बाईनीं सरस्वतीची हकीगत त्यांना सांगून, "आपल्याला सैंपाकघरांत काम करण्यासाठीं एकादी मुलगी असली तर हवी आहे ना?" असें विचारलें. दोघींचा विचारविनिमय होऊन अखेर त्यांनीं तिला ठेवून घेण्याचें ठरविलें. गणपतरावांनीं तिचें पालकत्व पतकरून कपड्या-लत्त्यांचा वगैरे वरखर्च करायची तयारी दाखविली. माईच्या सांगण्यावरून त्यांनीं तिला लहानशी ट्रंक, आंथरूण-पांघरूण, आरसा-फणी, वगैरे जरुरीचें सामान आणून दिलें. आपण वर्ध्याला राहणार असल्याचें सांगून, तेथील पत्ता देऊन, दुसरे दिवशीं ते निघून गेले.

अशा चमत्कारिक परिस्थितीमुळें सरस्वती हिंगण्याच्या अगदीं नवीन नि अपरिचित वातावरणांत येऊन पडली होती, त्यामुळें तिचें मन अगदीं कावरें-बावरें झालें होतें. तेथील त्या ठराविक ठशाच्या रोजच्या कार्यक्रमाप्रमाणें सकाळीं उठल्यावर चहापाणी करणें, सैंपाकणींना शिधासामुग्री काढून देणें, चटण्या-कोशिंबिरी, दूधदुभतें वगैरेकडेहि मधून मधून पाहणें, इत्यादि कामें तिला करावीं लागत. ती इतर मुलींप्रमाणें दुपारीं शाळेंतहि जाऊं लागली होती. परंतु एकाद्या निर्जीव यंत्राप्रमाणें तिच्या या क्रिया चालल्या होत्या.

तिला आश्रमांत येऊन महिना दीड महिना होऊन गेला तरी तिच्या चेहेऱ्यावरचें औदासीन्य आणि काळजी कमी झालीं नव्हतीं.

तिच्याच परिस्थितींतल्या, म्हणजे नवऱ्यानें टाकलेल्या दोन मुली तिच्या खोलींत राहत होत्या. त्या मराठी तिसरी चौथीच्या प्रौढ वर्गांत शिकत होत्या. त्यांनीं तिच्याशीं बरीच मैत्री केली. वसतिगृहांत आलेली नवी मुलगी कांहीं विशिष्ट परिस्थितींतील आहे, अशी कुणकुण कानावर आली कीं, तिची हकीगत जाणून घेण्याची भयंकर उत्सुकता कांहीं मुलींमध्यें असते. त्याच वर्गांतल्या ह्या दोन परित्यक्ता होत्या. महिना पंधरा दिवसांतच त्यांनीं सरस्वतीशीं बरीच दाट गट्टी जमविली. त्या तिला तिचें पाळीचें काम करूं लागत; अभ्यासांत मदत करीत. वेळ असे त्यावेळीं तिच्याबरोबर फिरायलाही जात. संध्याकाळच्या शिळोप्याच्या गप्पा मारतां मारतां त्यांनीं आपापल्या हकीगती सरस्वतीला सांगून टाकल्या होत्या. एकीच्या नवऱ्यानें बायको आवडत नाहीं, कारण ती शिकलेली नाहीं, म्हणून तिला टाकली होती, आणि तो इंग्लंडला निघून गेला होता. तो तीन वर्षांनीं परत येणार होता. तितक्या अवधींत ती मराठी नि विशेषतः इंग्रजी फाड फाड बोलायला शिकली, तर तो तिच्याशीं संसार करणार होता. म्हणून तिच्या भावानें तिला खर्च देऊन शिकायला ठेवली होती आणि वर एक खास शिकवणीहि इंग्रजी शिकविण्याकरितां ठेवली होती. तीहि जिवाचें रान करून इंग्रजीचा अभ्यास करीत होती. दुसरीच्या नवऱ्यानें ती वाईट चालीची आहे असा तिच्यावर आरोप करून तिला माहेरीं पोंचती केली होती. तिला नवरा बाळगील अशी कधींच आशा नसल्यानें ती शिकून नोकरी करावी या हेतूनें शक्य तितक्या लवकर अभ्यासक्रम संपविण्याकरितां धडपडत होती.

सरस्वतीनें मात्र आपली हकीगत कोणालाच सांगितली नाहीं. गणपत-

रावांनीं आश्रमांत आलेल्या दिवशीं जी काय हकीगत मुख्य बाईंना सांगितली होती तेवढीच. तिच्या मैत्रिणी वेळोवेळीं तिच्याकडून तिची हकीगत काढून घेण्याचा प्रयत्न करीत. पण त्यांत त्यांना यश आलें नव्हतें. एक दिवस तर त्या तिला जरा रागानेंच म्हणाल्या कीं, "आम्ही तेवढं तुझ्याशीं मनमोकळेपणानं वागतों पण तूं मात्र आमच्याशीं अजून परक्यापरक्या सारखीच वागतेस."

"आम्हीं तुला आमचं गुपित सांगितलं, पण तूं मात्र आपल्या गुपिताचा मागमूसही लागूं देत नाहींस अं !"

"ए, क्षमा करा हं, तेवढं मात्र मला विचारूं नका, बाकी काय हवं तें मी तुमच्यासाठीं करीन." इतक्याच उत्तरानें सरस्वती तो विषय टाळीत असे.

आश्रमांत येऊन सरस्वतीला सहा महिने झाले. आतां तिचें मन अभ्यासाकडे लागूं लागलें होतें. ती आश्रमांत आली, त्यावेळीं तिला नुसती अक्षरओळखच झालेली असल्यामुळें 'र, ट, फ,' करीत वाचायला येत होतें. पण गेल्या सहा महिन्यांत ती कोणतेंही मराठी पुस्तक घडाघड वाचूं लागली. तिला गोष्टी वाचण्याचा नाद लागला. तिचे इतर विषयहि मराठी तिसरीपर्यंत तयार झाले. ती आश्रमांत आली तेव्हां पहिल्यापहिल्यानें चैन पडत नसे, म्हणून तिचा रिकामा वेळ गप्पागोष्टींतच ती घालवी. पण आतां तिला अभ्यासाची आंच लागली असल्यामुळें काम करून उरलेल्या रिकाम्या वेळांतलीं दहापांच मिनिटेंहि ती फुकट घालवीनाशी झाली.

गणपतरावांचें खुशालीचें कार्ड केव्हांतरी एखादें येई, कारण फार पत्रें लिहिल्यानें उगीच लोकांना संशयाला कारण व्हावयाचें. त्यांतहि मामुली मजकुरापलीकडे ते काय लिहिणार ? एका कार्डांत ते मुदतीच्या तापानें

आजारी असून औषधोपचार सुरू असल्याचें त्यांनीं लिहिलें होतें. मनांतल्या मनांत ती झुरत होती, पण उघडपणें काळजी व्यक्त करण्याची चोरी. पाकीट लिहावें म्हटलें तरी चोरी, कारण तें नियमांप्रमाणें तपासूनच पुढें पाठविलें जायचें. तिनें कार्ड लिहूनच मनाचें समाधान करून घेतलें. तिनें लिहिलें होतें, 'आपलें पत्र पोंचलें. आपण आजारी असल्याचें वाचून काळजी वाटते. मुदतीच्या तापांत शुश्रूषा करावयास आपलें मनुष्य जवळ असलेलें बरें नाहीं का ? मग आपण आपल्या बायकोला कां नाहीं बोलावून घेत ? नवरा आजारी असतांना तिला दूर राहून कसें चैन पडेल ? पत्रोत्तर यावें.'

पंधरा वीस दिवसांनीं सरस्वतीच्या पत्राचें उत्तर आलें. त्यांत गणपत-रावांनीं लिहिलें, 'माझा ताप थांबला असून प्रकृति हळूहळू सुधारत आहे. तुझ्या सूचनेबद्दल मी आभारी आहें. परंतु सौ० ला आमच्या आश्रमांत आणावयाला परवानगी नाहीं, हें तुला माहीत आहे ना ! शिवाय, येथील माझे आश्रमबंधु माझी इतकी सेवाचाकरी करीत होते, कीं तितकी सौ० नें देखील केली नसती. असो. आतां तिला काळजी करण्याचें कारणच नाहीं.'

वर्ष दीड वर्ष वर्ध्यास काढल्यावर कॉंग्रेसचें प्रचारकार्य करण्याकरितां गणपतरावांना दक्षिण हिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरलें, आणि त्याप्रमाणें ते वर्ध्याहून निघून पुण्याला आले. तिथें एक दिवस राहून ते मद्रासला जाणार होते. जाण्यापूर्वी सरस्वतीला भेटून यावें म्हणून ते हिंगण्यास गेले. तिच्या प्रकृतीची आणि अभ्यासाची विचारपूस केल्यावर त्यांनीं तिला आपण दक्षिण हिंदुस्थानांत दौरा काढणार असल्याचें सांगून तिकडून दोन वर्षें

तरी परत येतां येणार नाहीं, असें ते म्हणाले. हें ऐकून ती अधीरतेनें म्हणाली, "हें काय ? मी किती दिवस इथें काढायचे असे आतां ?"

"अग हळू बोल, ऐकेल ना कुणी !" गणपतरावांनीं तिला दाबलें.

जवळपास कोणी नाहीं असें पाहून ती म्हणाली, "नुसती खुशाली का होईना, पण आठ दिवसांनीं कळवा, नाहीं तर माझें मन अभ्यासाकडे लागणार नाहीं."

इतक्यांत समोरून एक शिक्षक येत असल्याचें पाहून ती तिऱ्हाइताप्रमाणें म्हणाली, "तर मग आतां येणार नसाल पुण्यांत लवकर ? पत्र पाठवालच नेहमींप्रमाणें."

तीन वर्षांत सरस्वतीचें मराठी सातवीपर्यंतचें शिक्षण झालें. ती सातवीच्या परीक्षेला बसणार होती. शिवणाच्या खास वर्गातहि ती जात होती. तेंहि तिचें शिक्षण चालू होतें. तिला अभ्यासाला वेळ सांपडावा म्हणून आतां तिचें सैंपाकघरांतलें काम कमी करून त्याऐवजीं लहान मुलींच्या अभ्यासावर देखरेख करण्याचें काम तिला देण्यांत आलें होतें. तेंहि ती मन लावून करी. लहान मुलींचीं मनें आकर्षण करून घेण्याची हातोटी तिला चांगली साधली होती. ती त्यांच्याकडून अभ्यास, व्यायाम व इतर कामें हंसत खेळत करून घेत असे. तिचें काम माईंना पसंत होतें.

"तुझी सातवीची परीक्षा झाली म्हणजे तूं इथेंच रहा. हेंच लहान मुलींचं काम देऊं तुला." असें माई तिला एकदां म्हणाल्या.

"पाहूं, पुढचं पुढें," तिनें उत्तर दिलें.

"तुला काय? कुठें तरी राहायचं नि काम करायचं. मग पाहायचं काय त्यांत? पगार भरपूर दिला म्हणजे झालं ना?"

"त्यांचा विचार नको का घ्यायला?" असे शब्द सरस्वतीच्या तोंडून नकळत बाहेर पडले आणि ती चपापली.

माईंचें तिच्याकडे लक्ष नव्हतें म्हणून बरें झालें. त्या म्हणाल्या, "कोणाचा? यजमानांचा? त्यांचा तर पत्ता नाहीं म्हणत होतीस इतके दिवस! त्यांतून ते व्यसनी; तीन वर्षांत त्यांनीं वास्तपुस्त तरी केली का तुझी?"

"हो, तेंही खरंच." असें उत्तर देऊन तिनें वेळ मारून नेली.

❦ ❦ ❦ ❦

तीन वर्षांनंतर गणपतराव पुण्यास आले. कॉंग्रेसश्रेष्ठींच्या आज्ञेप्रमाणें आतां ते पुण्यांत राहूनच काम करणार होते. म्हणून त्यांनीं तेथें जागा घेतली आणि बिऱ्हाड केलें.

आतां ते वरचेवर सरस्वतीला भेटावयास येऊं लागले. कधीं पेढे बर्फी तर कधीं फळें वगैरे, अशा कांहीं तरी नवीन वस्तु दर वेळीं आणून देणें, सुरू झालें. पूर्वींपेक्षां त्यांच्या भेटी लांबूं लागल्या. कित्येक वेळां तर भेटण्याची वेळ संपण्याची घंटा झाल्याची सूचनाहि त्यांना द्यावी लागे, तेव्हां ते भानावर येत, आणि घाईघाईनें सरस्वतीचा निरोप घेऊन चालूं लागत. एक दोनदां त्यांनीं मुख्य बाईची परवानगी काढून, कापड वगैरे घेऊन देण्याच्या निमित्तानें तिला गांवांतहि नेली होती.

दिवसेंदिवस गणपतराव नि सरस्वती यांच्यामधील परिचय वाजवीपेक्षां फाजील वाढत असल्याचें माईंच्या ध्यानांत येऊं लागलें. त्या तिच्यावर बारकाईनें लक्ष ठेवूं लागल्या. त्यांचें बोलणें चालणें आणि वागणें यांतील निराळेपणा नजरेंत भरण्याइतका वाढत चालला होता.

' एवढें काय बाई या दोघांचं अगदीं मोघम मोघम संभाषण चाललेलं असतं ? ' अशी इतर मुलींमध्यें चालू असलेली कुजबूजही त्यांच्या कानावर आली होती. एक दोनदां त्यांनीं तिला आडून आडून छेडलीही. पण तिच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं, असें पाहून तिला आपल्या खोलींत बोलावून त्यांनीं चांगली तंबी दिली. त्या म्हणाल्या " एवढीं कसलीं गुप्त खलबतं नि राजकारणं चाललेलीं असतात हल्लीं तुमचीं ? मला नव्हतं वाटलं तूं अशी वागूं लागशील असं ! आतां मला हें तुझं वागणं बाईंच्या कानांवर घालावं लागणार, नि तें मी घालणार, समजलीस ? "

सरस्वती कांहींच बोलली नाहीं. माईंनीं आपल्याला आलेला तिच्याविषयींचा संशय खरोखरच मुख्य बाईंच्या कानांवर घालून ठेवला होता; तेव्हां त्यांचेंही लक्ष आतां तिच्या हालचालींवर जाऊं लागलें.

गणपतराव आतां पुण्यांत स्थायिक होणार होते. सरस्वतीनें देखील काँग्रेसला वाहून घ्यावें आणि दोघांनीं मिळून काँग्रेसचें काम करावें असें त्यांच्या मनांत होतें. काँग्रेसला स्त्रीप्रचारिका हव्या होत्याच. तेव्हां त्या बाबतींत ते सरस्वतीशीं गेल्या दोन तीन भेटींत बोलले होते. आपल्याला आश्रमांतच काम करण्याचा आग्रह माई करीत होत्या, नि आपणहि त्यांना तसें कां कबूल करीत होतों, वगैरेबद्दल सरस्वतीहि त्यांच्याशीं बोलली. तेव्हां आश्रम सोडण्यापूर्वीं आपल्याला आपल्या गौप्याचा स्फोट करून

आपलें खरे नातें संस्थाचालकांना पटवून दिलें पाहिजे, ही जाणीव गणपतरावांना झाली व तें कसें करावें याचा ते विचार करूं लागले. गणपतराव नेहमींप्रमाणें रविवारीं सरस्वतीला भेटावयाला आले होते. ते जरा लवकरच आले असल्यामुळें भेटण्याच्या खोलींत त्यावेळीं दुसरें कोणीच नव्हतें. सरस्वती भेटायला गेली. तिच्या मागोमाग तिला नकळत मुख्य बाईहि निघाल्या, नि शेजारच्या वाचनालयांत जाऊन बसल्या. बराच वेळ चाललेली त्यांची कुजबूज बाईच्या कानांवर पडत होती, परंतु अर्थबोध होण्यासारखा एकहि शब्द स्पष्टपणें त्यांना ऐकूं येत नव्हता. त्यांचें कांहीं तरी कारस्थान चालू असलें पाहिजे इतकी मात्र त्यांची खात्री झाली. त्यांनीं गणपतरावांना भेटून स्पष्टच विचारण्याचा बेत केला, आणि त्या बाहेर पडल्या. त्यांचीं पावलें कचेरीकडे वळणार इतक्यांत त्यांची नजर दोघांकडे गेली. नि एक अनपेक्षित प्रकार त्यांच्या दृष्टीस पडला आणि लगेच "इश्श ! हें काय ?" असे घाबऱ्या घाबऱ्या उच्चारलेले सरस्वतीचे शब्दहि कानीं पडले.

बाईची खात्री झाली. दोघांचाहि त्यांना संताप आला. त्या कचेरींत गेल्या आणि शिपायाला पाठवून गणपतरावांना कचेरींत येऊन जा, असें त्यांनीं कळविलें. बाईचा निरोप ऐकून दोघेंहि घाबरलीं. गणपतराव जायला निघाले. "बेंड बाहेर येणार. आतांच सगळं खरं सांगा." सरस्वती पुटपुटली.

गणपतराव कचेरींत गेले. बाईचा चेहेरा रागानें लाल झाला होता. ते खुर्चीवर बसतांच त्या म्हणाल्या, "सरस्वती म्हणजे कोण समजतां तुम्ही ! तिच्या नादान, चंगी, भंगी, व्यसनी, नवऱ्यापासून सोडवून आणून तिची इथें व्यवस्था लावून दिलीत ती एवढ्यासाठींच का ? तिच्यावर केलेल्या उपकाराचा मोबदला इतका जबर घेण्याच्या विचारांत आहांत कीं काय ?

आणि तोही तिचा नवरा हयात असतांना ? या सवयाला सरस्वतीची तयारी आहे ? बोला."

"होय आहे. पण एका अटीवर." कचेरीच्या दारांतून येतां येत सरस्वती म्हणाली.

हे अनपेक्षित शब्द ऐकतांच बाईंच्या आश्चर्याला सीमा उरली नाहीं ! डोळे वटारून त्या क्षणभर तिच्याकडे पाहतच राहिल्या. इतक्यांत सरस्वती गणपतरावांना म्हणाली, "आधीं यांच्या पायां पडा नि खोटं सांगून त्यांची फसवणूक केल्याबद्दल क्षमा मागा. आपलं खरं नातं पटवून द्या."

"खरंच, मी तुमचा शतशः अपराधी आहें. तुमच्यासारख्या सज्जन मंडळींची फसवणूक करणें घोर अपराध आहे." असें म्हणून खरोखरच त्यांनीं बाईंचे पाय धरले. "क्षमा केली असं म्हटल्याशिवाय हे पाय सोडणार नाहीं मी."

गोंधळलेल्या मनस्थितींतच बाईनीं त्यांना उठायला सांगितलें नि ते पुढें काय सांगतात तें ऐकायला त्या जरा सरसावून बसल्या. नंतर गणपतरावांनीं आपली पहिल्यापासूनची सगळी हकीगत सांगितली. "खर्च देऊन तिला शिक्षण देण्याची तर माझी परिस्थिति नव्हती. याचमुळें मला बनावट हकीगत सांगणें भाग पडलें" असें त्यांनीं सांगितलें.

ही सर्व हकीगत ऐकत असतां बाईचें मन गोंधळून गेलें होतें. ही सारी हकीगत खरी असेल कीं नाहीं याविषयीं त्यांच्या मनांत अजून संशय आहे, असें वाटून गणपतरावांनीं आपली हकीगत खरी असल्याबद्दल खात्री पटवणारीं पत्रें दाखविण्याचेंहि वचन बाईंना दिलें.

गणपतरावांनीं अगोदरच सरस्वतीच्या चुलत भावाला पत्र लिहून तिच्या आईकडून खऱ्या हकीगतीचें पत्र संस्थेला धाडविण्याविषयीं विनंती केली होती. परंतु तसें पत्र येण्यापूर्वीच त्यांच्यावर गौप्यस्फोट करण्याची वेळ आली. म्हणून ते तसें पत्र मागाहून दाखवूं असें वचन देऊन गांवांत गेले. ते गेल्यावर दोन चार दिवसांनीं संस्थेकडे सरस्वतीच्या आईचें पत्र आलेंच. त्यावरून गणपतरावांनीं सांगितलेली हकीगत खरी असल्याची खात्री पटली. सरस्वतीच्या चुलतभावाचें गणपतरावांनाहि पुण्यास पत्र आलें. त्यांत त्यांनीं हिंगण्यास पत्र धाडल्याचा उल्लेख केला होता. गणपतरावांनींहि चालकांना पत्र लिहून क्षमेची याचना केली.

गणपतराव नि सरस्वती हीं पतिपत्नी असल्याची आश्रमचालकांची आतां खात्री झाली. त्यांनीं गणपतरावांना क्षमा केली आणि सरस्वतीला त्यांच्या स्वाधीन केली. ठरल्याप्रमाणें आतां तीं दोघें पुण्यांत काँग्रेसचें काम करूं लागलीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अ. क्र. १२५२२
विभाग कथा
क्रमांक ४३३
नों. दि.

# ४

# क्रान्ति

किती सुखानें नि मजेंत चालला आहे गीताबाईचा संसार! श्रीमान् नि सज्जन पति, हुषार नि कर्तृत्ववान् मुलें नि सुना, आणि खेळकर नि बंडखोर नातवंडें, यांच्या सहवासांत त्यांचा दिवस केव्हां निघून जातो तें समजतहि नाहीं त्यांना! त्या सर्वांच्या सुखासाठीं त्या रात्रंदिवस झटत असतात, इतकेंच नाहीं तर कुटुंबांतील या माणसांच्या सुखांतच गीताबाईचें सुख सामावलेलें दिसतें. आपण सुखाच्या परमोच्च शिखरावर आहोंत, असेंच त्यांना वाटतें. हे वैभवसंपन्न सुखाचे दिवस आपल्याला दिसतील असें स्वप्नांत सुद्धां गीताबाईंना वाटलें नव्हतें त्यावेळीं.

चाळीस वर्षांपूर्वीच्या त्यांच्या आयुष्याकडे पाहिलें तर तें एक सामाजिक आणि धार्मिक क्रान्तीचा नमुनाच आहे, असें वाटेल आपल्याला. कुठें त्यावेळची ती सामाजिक व धार्मिक रूढीला बळी पडलेली अनाथ बालविधवा

गीता ! आणि कुठें त्या जुलमी रूढींना झुगारून देऊन पुन्हां संसाराचा सारीपाट खेळण्यांत यशस्वी झालेल्या आजच्या गीताबाई ! ही अघटित घटनाचा नव्हे तर काय ?

चाळीस वर्षांपूर्वींच्या या गीतेच्या लग्नाला वर्ष दीड वर्ष लोटलें होतें. तिची नि तिच्या पतीची अजून पुरती ओळख देखील झाली नव्हती, तोंच तिच्यावर वैधव्याचा घाला पडला ! पंधरा सोळा वर्षांची पोर, पण पतिनिधनानंतर तिला एकदम थोरपण प्राप्त झालें ! वडील, आई, भाऊ, बहिणी, हीं सगळीं मायेचीं माणसें असूनहि तिला तीं दूरदूरचीं वाटूं लागलीं; कारण तींच तिच्या केशवपनास कारणीभूत झालीं होतीं. त्यांच्या भोंवतीं जखडलेल्या रूढीच्या बंधनांपुढें वात्सल्यप्रेमाचीं बंधनें शिथिल पडलीं. गीतेला सोंवळी केली.

पतिनिधनाच्या दुःखापेक्षां या सोंवळेपणाचें दुःखच तिला अधिक जाणवत होतें. तिच्या बरोबरीच्या तिच्या मैत्रिणी मंगलागौरी, महालक्ष्मी, चैत्रगौरीचें हळदीकुंकू, लग्नकार्य, इत्यादि मंगल प्रसंगांचा आनंद लुटीत होत्या; तर गीता मात्र या आनंदाला पारखी होऊन कोपऱ्यांत तोंड घालून मनमुराद रडत बसली होती. उभा जन्म तिला आतां संन्यासिनी म्हणून काढावयाचा होता. सोंवळें, ओंवळें, पूजा अर्चा, जपजाप्य, व्रतें वैकल्यें, उपासतापास हीं सगळीं झेंगटें आतां तिच्या पेशाप्रमाणें तिच्यामागें लागणार होतीं, त्यामुळें ती एकदम सोळा वर्षांच्या किशोरावस्थेंतून साठ वर्षांच्या वृद्धावस्थेला पोंचणार होती.

गीतेचा नवीन आयुष्यक्रम तिला असह्य होत होता. सगळें आयुष्य असें कसें काढावयाचें ? हा प्रश्न तिच्या मनांत सारखा घोळत होता. वडिलांच्या मतानें तिनें आपला जन्म देवधर्मकारणीं लावावा. ती कामसू

असल्यामुळें सासरींमाहेरीं हवीहवीशी होती. खायलाप्यायला तिला कोणीं कमी केलें नसतें. पण तिला असला जीवनक्रम पटत नव्हता. तिचें सासर मुंबईस होतें. तिथल्या शेजारच्या मुली शाळेंत जात होत्या. तिची जाऊहि लिहायला वाचायला शिकलेली होती. तिला वाटत होतें, आपणहि त्यांच्यासारखें शिकलें तर! पण कोण शिकविणार आपल्याला? शाळेंत जाणें तर अशक्यच होतें तिला. काम करावें व जेवावें खावें, असेच गीतेचे दिवस जात होते. यापेक्षां सध्यां तिला कांहींच करतां येत नव्हतें. जावेचा संसार जावेला होता, सासूबाईचा देवधर्म नि पोथीपुराण त्यांना होतें. गीतेला मात्र मन रमेल असें आयुष्यांत कांहींच नव्हतें!

गीतेच्या यजमानांचे एक स्नेही गोविंदराव गोडबोले म्हणून होते. ते शिकलेले फार नसले तरी त्यांचीं मतें सुधारकी होतीं. ते नाटककंपनींत कारकुनाचें काम करीत असत. त्यामुळें समाजांत त्यांना विशेष मान नव्हता, उलट लोक त्यांच्याकडे तुच्छतेनेंच पहात. कंपनींत नोकरी करतात म्हणून त्यांना मुलगीहि द्यायला कोणी तयार नव्हता, म्हणून ते अविवाहितच राहिले होते. त्यांचें जाणें येणें गीतेच्या घरीं बरेंच होतें. हिंगण्याच्या अनाथबालिकाश्रमाविषयीं त्यांना माहिती होती. तिथें अनाथ विधवांना स्वावलंबी करणारें शिक्षण फुकट दिलें जातें, असेंहि त्यांनीं ऐकलें होतें.

असेच एक दिवस ते गीतेच्या घरीं आले असतांना तिच्या सासूबाईच्या जवळ गीतेला हिंगण्याला ठेवण्यासंबंधीं त्यांनीं गोष्ट काढली. आणि जरा नवलाचीच गोष्ट कीं, त्यांना गोविंदरावांची सूचना पटली. परन्तु गीतेच्या जावेनेंच "अशा बायकांनीं काय शिकायला जायचं?" असें म्हणून तो विषय उडवून टाकला. गीतेची निराशा झाली. माहेरचीं माणसेंहि विरुद्धच होतीं. त्या दिवशीं तो विषय तितकाच राहिला, पण गीतेच्या

मनानें मात्र हिंगण्यास जाण्याचें घेतलें, आणि संधि साधून एक दिवस गोविंदरावांना तिनें आपलें मनोगत कळविलें.

गोविंदरावांनीं हिंगण्यास जाऊन आश्रम पाहिला. चौकशी करतां त्यांना असें समजलें कीं, तिथें मुलगी शिकायला ठेवायची तर तिची जबाबदारी घेऊन पालकत्व पतकरणारें नात्याचें कोणी तरी ( वडील, भाऊ, दीर, वगैरे ) लागतें. हें नात्याचें कोण आणायचें ? गोविंदराव ती जबाबदारी घेण्यास तयार नव्हते. हेतु हा कीं, आपल्यामुळें पुढें मागें गीतेला त्रास होऊं नये. सासर-माहेरचीं माणसें तर विरुद्ध.

आश्रमच्या मुख्य बाईंना गोविंदरावांनीं गीतेची सर्व हकीगत सांगितली आणि आपण पालक होण्यास कां तयार नाहीं तेंहि सांगितलें. बाईंनीं तोड काढली कीं, आश्रमांत कामाला म्हणून तिनें राहावें व फावल्या वेळांत तिनें लिहावाचायला शिकावें म्हणजे पालक वगैरेची भानगड करावी लागणार नाहीं. ही सूचना गीतेलाहि पटली. गोविंदरावांनीं त्याप्रमाणें बाईंना कळविलें. गीतेच्या वडिलांनीं तिला माहेरपणाला बोलावलेंच होतें. त्या संधीचा फायदा घेऊन गोविंदरावांनीं तिला माहेरीं पोंचवण्याच्या निमित्तानें मुंबईहून नेली ती, थेट हिंगण्याला पोंचविली.

सकाळीं नऊच्या सुमारास आश्रमांतल्या कचेरीसमोर एक टांगा उभा राहिला. गोविंदराव आणि गीता खालीं उतरलीं. आश्रमच्या शिपायानें त्यांना कचेरींत बसावयास सांगून बाईंना वर्दी दिली. दहा पंधरा मिनिटांनीं बाई आल्या. गीतेचा गोरा रंग, घारे डोळे, गरुडासारखें बांकदार उंच नाक, आणि रुबाबदार चेहरा सहज नजरेंत भरण्यासारखा होता. तिनें नेसलेल्या साध्या बिनकांठाच्या तांबड्या आलवाणांतूनहि तिचें सौंदर्य लक्षांत येत होतें. बाईंचें लक्ष गीतेकडे जातांच "हीच का ती

मुलगी ?" असा प्रश्न त्यांनीं गोविंदरावांस केला. त्यांनीं "हो" सांगितल्यावर त्या तिला म्हणाल्या, "तुला इथें पडेल तें काम करावें लागेल. आणि उरलेल्या वेळांत शिकायला सांपडेल, हें ठाऊक आहे ना ? गोविंद-रावांनीं सांगितलं आहे ना तुला ?"

"होय, त्याला माझी तयारी आहे," गीतेनें उत्तर दिलें.

नंतर त्यांनीं एका विद्यार्थिनीला बोलावून गीतेला आपल्या खोलींत घेऊन जावयास सांगितलें.

"गीतेची सगळी योग्य ती व्यवस्था करतें, काळजी करूं नका." असें सांगून बाईंनीं गोविंदरावांना निरोप दिला.

दुपारची जेवणाची घंटा झाली. मुलींची पंगत बसली. आश्रमांत दोन सोंवळ्या बायका विद्यार्थिनी म्हणून शिकायल्या आलेल्या होत्या. त्यांची मुगटे नेसलेली सोंवळी पंगत निराळी बसत असे. स्वयंपाकघरांतून जेवण हॉलमध्यें वाढायला जायला दार होतें, तिथेंच या दोन बायकांची आडवी पंगत बसे. त्यांना सैंपाकिणी सोंवळ्यानें वाढीत, कारण त्या सोंवळ्या; बाकीच्या ओंवळ्या.

"आज या खास पंगतींत वाढ झालीय् ग" एक मुलगी म्हणाली.

"काम मोठं झक् पक् दिसतंय" दुसरीनें उद्गार काढले.

"ए, कित्ति सुरेख दिसते नाहीं ही नवी मुलगी ?" तिसरी बोलली.

"पण बिचारीच्या नशिबीं एव्हांपासून संन्यास आला." चवथ्या एका पोक्तशा मुलीनें गहिंवरून म्हटलें. तिची ओळख करून घेतलीच पाहिजे, असें प्रत्येक मुलीनें ठरविलें.

गीतेच्या रूपाप्रमाणें तिच्या अंगीं दुसऱ्यांचीं मनें आकर्षण करून घेण्याचा विशेष गुण होता. प्रथम तिला सैंपाकाचेंच काम करावें लागलें, कारण सैंपाकीणबाई आजारी पडून रजेवर गेली होती. गीतेनें हें काम हौशीनें नि व्यवस्थितपणानें केलें. तिची टापटीप, चलाखी आणि स्वच्छता पाहून सैंपाकघरांतील व्यवस्था पाहणाऱ्या बाई खूष झाल्या. नेमलेलें सगळें काम भरभर आटपून गीता शाळेंत जाण्यास धडपडत असे. मिळेल तितका वेळ शिकण्यांत घालविण्याची तिची धडपड पाहून बाईहि शक्य तों तिला शाळेच्या वेळेवर मोकळी करीत.

आश्रमांत प्रवेश झाल्यामुळें आपला शिकण्याचा हेतु आतां आपण साध्य करून घेऊं, या समाधानांत गीता होती खरी, पण ती अशी सासरीं माहेरीं कुणाला न विचारतां घरांतून निघून आल्यामुळें ती घरांतून पळून गेल्याचा सगळीकडे बभ्रा झाला. तिच्या सासूला नि जावेला गोविन्दरावांचा संशय आला. गीता नाहींशी झाल्याची बातमी सगळ्या नातेवाईकांपर्यंत हां हां म्हणतां पोंचली. शेजारी तर 'त्या नाटक्याचाच हात धरून गेली काकूंची सून' असें कुजबुजूं लागले. 'आतां आपल्याला बाहेर तोंड काढायला जागा नाहीं' असें सासूला वाटलें. 'आपल्या घराण्याला काळोखी लावलीन्' असें जाऊ नि दीर म्हणूं लागलीं. आईला मरणप्राय दुःख झालें. 'नवऱ्यामागून मेली कां नाहीं आपली पोर' असें वडिलांच्या मनांत आलें. तपासाला मात्र यांपैकीं कोणीच पुढें सरसावलें नाहीं! 'ती आम्हांला मेली नि आम्ही तिला मेलों' असें सर्व जण समजलीं.

परंतु पंधरा वीस दिवसांनीं गीतेचेंच वडिलांना पत्र गेलें. त्यांत तिनें 'आपण केवळ शिकण्यासाठीं आश्रमांत आलों आहों, कोणतेंही वाईट कृत्य आपल्या हातून घडलेलें नाहीं. वाटल्यास अधिकाऱ्यांना विचारा' असें लिहिलें

होतें. सासरीं दिरांनाहि तिनें असेंच पत्र लिहिलें. या पत्रांनीं घरच्यांचा राग कमी झाला नाहीं. तरी पण इतरेजनांची कुजबूज थांबली.

घरीं असतांना गीतेनें शाळेंत जाणाऱ्या मुलांच्या मदतीनें अक्षर-ओळख करून घेतली होती. तितकीच तिची आश्रमांत आल्यावेळची विद्येची पुंजी होती. आश्रमांत आल्यावर तिला किती शिकूं नि किती न शिकूं असें होऊन गेलें. एखाद्या अधाशी मुलाप्रमाणें ती प्रत्येक मुलीजवळ कांहीं ना कांहीं शिकूं लागली. कोणाजवळ उजळणी तर कोणाजवळ वाचन, कोणाजवळ तोंडचे हिशेब तर कोणाजवळ मराठी असा अभ्यास ती वर्गाविरहित करूं लागली. अशा रीतीनें तिची अभ्यासांतील प्रगति पाहून मुख्य बाईनीं तिला उत्तेजन दिलें, आणि सैंपाकघरांतील तिचें कामहि बरेंच कमी केलें.

मराठी पांच इयत्तांपर्यंत शिक्षण झाल्यावर तिचें नांव इतर नादार विद्यार्थिनींप्रमाणें दाखल करून घेतलें. आणि ती नियमितपणानें शाळेंत जाऊं लागली. तिची मराठी सातवीची सरकारी परीक्षा पास झाली आणि पुढचें ट्रेनिंग कॉलेजचें शिक्षणहि पुरें झालें. याचें सगळ्यांना कौतुक वाटलें.

आश्रमांत असतांना गीतेच्या अंगचे अनेक गुण वेळोवेळीं चालकांच्या नजरेस आलेले होते. घरकामांतील माहिती, उरक, टापटीप व हौस, शरीरारोग्य, आनंदी वृत्ति आणि मनमिळाऊपणा या गुणांमुळें तिच्यावर सगळ्यांची मर्जी होती. मुख्य बाईनीं हे तिचे गुण पाहून ठरवून ठेवलें होतें कीं, हिला आश्रमांत मेट्रन म्हणून ठेवून घ्यावयाचें. आणि त्याप्रमाणें गीतेचें शिक्षण संपल्यावर त्यांनीं तिला विचारलें. गीतेनेंही मनाशीं ठरवलें होतें कीं आपण असेंच एखाद्या सार्वजनिक संस्थेंत काम करायचें. घरीं अगर एकटें राहून कुठल्या तरी शाळेंत शिक्षिका म्हणून राहण्यापेक्षां असल्या

संस्थांतून राहिलें तर आपलें कर्तृत्व दाखवायला वाव मिळेल आणि आपल्या हातून समाजसेवा घडेल. या विचारानें तिनें तें काम करण्याचें कबूल केलें.

आणि घरीं तरी कोण होतें तिचें कौतुक करणारें ? अजून तिच्यावरचा घरच्यांचा राग कमी झालेला नव्हताच. ती शिकायला गेली हेंच आधीं धर्मबाह्य वर्तन झालें होतें तिच्या हातून. त्यांत तिच्या वेषांतरानें भरच पडली होती. आश्रमाच्या एका सेविकेच्या उपदेशामुळें तिनें सोंवळेपणाचा त्याग करून ओंवळेपण स्वीकारलें होतें. या तिच्या अधार्मिक सुधारणेमुळें तिचे वडील तिच्यावर चिडले होते. त्यांनीं तिचें नांव सोडलेंच होतें. सासरींहि तोच प्रकार होता.

शिक्षण संपल्यावर ठरल्याप्रमाणें, गीता मेट्रनचें काम करूं लागली. हें काम करीत असतांना तिला विद्यार्थिनींच्या पालकांशीं बोलण्याभेटण्याचा आणि पत्रव्यवहार करण्याचा प्रसंग वरच्यावर येत असे. वर्ष सहा महिन्यांच्या अनुभवानें आपणांस इंग्रजी येत असतें तर अधिक चांगलें झालें असतें असें तिला वाटूं लागलें. ही उणीव भरून काढण्याच्या इरादानें तिथल्या एका शिक्षकांची शिकवणी तिनें सुरू केली. दोन वर्षांत साधारण कामापुरतें इंग्रजी तिला समजूं लागलें. गीता मेट्रनचें काम करायला लागल्यावर गोविन्दराव एकदोनदां तिला भेटून गेले होते. आतां त्यांचीं पत्रें वगैरे येत मधून मधून. गीतेच्या यजमानांचे दुसरे एक मित्र श्री. नाबर म्हणून होते. त्यांना घेऊन गोविंदराव एकदां संस्था पहायला आले होते. ते डॉक्टर असून त्यांचा खासगी दवाखाना व बाळंतपणाचें हॉस्पिटल अकोल्याला होतें. ते सधन जमीनदार असून तिथें त्यांची गणना श्रीमान् पुढाऱ्यांत होत होती. संस्था पाहून झाल्यावर गोविन्दरावांनीं गीतेची नि त्यांची ओळख करून दिली.

आश्रमच्या शेरे-बुकांत डॉ. नाबर यांनीं आजाऱ्यांच्या व्यवस्थेविषयीं

एक गोष्ट प्रामुख्यानें नमूद करून ठेविली, ती ही – "संस्थेंत राहून काम करणारी एक स्त्री–डॉक्टर आणि नर्स यांची उणीव भासते. मुलींच्या वसतिगृहाला स्थानिक डॉक्टर आणि नर्सची अत्यंत जरुरी आहे." आणि आपल्या हाताखालीं एखादी आश्रमांतील प्रौढ मुलगी पाठविल्यास आपण तिला नर्सिंगचें आणि कांपाउंडिंगचें शिक्षण देऊन तयार करूं, असें आश्वासनही त्यांनीं दिलें होतें. हा शेरा वाचून गीतेच्या मनांत 'आपण जाऊं या का हें शिक्षण घ्यायला संस्थेच्या वतीनें ?' असा विचार आला, पण तिनें तो तितकाच सोडला.

एकदां एका दिवाळीच्या सुट्टींत ती डॉक्टरांच्या निमंत्रणावरून अकोल्याला गेली. जमल्यास थोडीशी वर्गणी मिळवावी आणि नर्सिंग शिकण्याचें जमेल किंवा कसें, तेंही पहावें या दोन हेतूंनीं तिनें जाण्याचें केलें होतें. तिथें डॉक्टरांच्या मदतीनें तिला आश्रमाचें बरेंच काम करतां आलें. डॉक्टरांचें अकोल्यांत असलेलें वजन, त्यांची कामाची पद्धत, रोग्यांशीं बोलण्याचालण्याची आणि वागण्याची ढब, प्रेमळ वृत्ति या सर्वांचा गीतेच्या मनावर चांगलाच अनुकूल परिणाम झाला. त्यांची नवीनच ओळख झालेली आणि पहिल्यानेंच गीता त्यांच्या घरीं आलेली. परन्तु त्यांचें मोकळेपणाचें नि आपलेपणाचें वागणें पाहून ते जरी एकटेच असले तरी गीतेला आपण आपल्याच माणसांत राहिल्याप्रमाणें वाटलें.

पांच वर्षें मेट्रनचें काम केल्यावर चालकांच्या परवानगीनें गीता वर्षाची रजा घेऊन नर्सिंग शिकायला अकोल्यास गेली. तिची तिथें राहण्याची वगैरे सगळी सोय डॉ. नाबरांनीं केली. तो शिक्षणक्रम पुरा झाल्यावर परत आश्रमांत येऊन काम करावयाचा तिचा बेत होता. तिचा नर्सिंग आणि मिडविफ्रीचा कोर्स डॉक्टरांच्या हाताखालीं पुरा झाला. परन्तु मुंबईस कामा हॉस्पिटलमधला साडेतीन वर्षांचा सरकारमान्य शिक्षणक्रम

पुरा करावा असें तिच्या मनानें घेतलें. तिथें प्रवेश मिळवून देण्याची व्यवस्था डॉ. नाबरच करणार होते. तिनें आश्रमांत त्याप्रमाणें कळवून रजा मागून घेतली.

अकोल्याच्या राहण्यांत तिचा नि डॉक्टरांचा परिचय दृढ झाला होता. ती मुंबईस गेली तरी अधून मधून त्यांच्या भेटी व पत्रव्यवहार होत होता. त्यामुळें दिवसेंदिवस हा परिचय वाढतच होता. गीतेचा कष्टाळू स्वभाव आणि कर्तव्यतत्परता पाहून आपल्या 'मॅटर्निटी होम'करितां तिचा फार चांगला उपयोग होईल असें डॉक्टरांना वाटत होतें. आणि त्यांनीं तें तिच्याजवळ बोलूनहि दाखविलें होतें. तिनेंहि "पाहतां येईल पुढें" असें उत्तर देऊन वेळ मारून नेली होती.

कामा हॉस्पिटलमधला अभ्यास पुरा व्हायला सहा महिनेच अवकाश होता. तो पुरा झाल्यावर आश्रमांतच काम करावयास येण्याचा गीतेचा पूर्वीचा बेत होता. वसतिगृहांची मुख्य म्हणून तिची नेमणूक व्हायची असून शिवाय संस्थेच्या डॉक्टरांच्या सल्ल्यानें सगळें आरोग्यखात्याचें काम तिच्यावर सोंपवण्याचें ठरलें होतें. परन्तु डॉक्टर नाबरांचा तिला अकोल्यास येऊन काम करण्याचा आग्रह आणि तिला न कळत वाटणारें त्यांच्याबद्दलचें आकर्षण यामुळें अलीकडे तिच्या मनांत चलबिचल चालू झाली होती. डॉक्टरांचें मनहि तिच्याकडे ओढलें जात होतें हें त्यांनीं न सांगतांच तिच्या ध्यानांत आलेलें होतें. एकमेकांचीं मनोगतें एकमेकांनीं ओळखलीं होतीं. पण प्रत्यक्ष उच्चार करण्याचें धैर्य कोणालाच होत नव्हतें. आपण संस्थेंत काम करण्याचें वचन दिलेलें. तें मोडून दुसरा मार्ग कसा पतकरावा, हा प्रश्न गीतेला पडला होता. तर डॉक्टरांनाही सामाजिक कार्य करावयाला मनानें वाहून घेतलेल्या एका स्त्रीस संसारांत पडतेस का,

हें विचारण्याचें जिवावर येत होतें. तथापि हा प्रश्न एक दोन महिन्यांत अनपेक्षित रीतीनें सुटला.

डॉक्टर नाबर एकदम आजारी पडले व तो दोषी ताप असल्यानें चांगल्या शुश्रुषेची जरुरी उत्पन्न झाली, म्हणून गीतेला अखेरची परीक्षा होण्यापूर्वीच त्यांनीं बोलाविलें. तिलाहि न जाणें अशक्य होतें. ती ताबडतोब अकोल्यास गेली. या तापांतून बरें व्हायला डॉक्टरना चार महिने लागले. दुखणें जिवावरचेंच गेलें. गीतेनें केलेली अव्याहत शुश्रूषाच यांतून बरें करायला कारणीभूत झाली असें त्यांना वाटे. आणि आपल्यासाठीं केलेल्या कष्टांचें उतराई होण्याचा एकच मार्ग त्यांना योग्य वाटला, तो म्हणजे तिला आपली अर्धांगी करून सुखी करणें. आणि तेंच त्यांनीं केलें. गीतेला तेंच हवें होतें. आपली संसारसुखाची तहान समाजसेवेनें भागणें अशक्य आहे, असेंच तिला अलीकडे वाटत होतें. आणि म्हणूनच अखेर तिनें डॉक्टरांच्या विचारण्याला होकार दिला.

डॉक्टर नाबर व गीता यांच्या विवाहाची वार्ता वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. या आंतरजातीय पुनर्विवाहाबद्दल कोणी वधुवरांच्या धैर्याचें अभिनंदन केलें. तर 'लग्नच करावयाचें होतें तिला, तर ब्राह्मण वर ओस का पडले होते ?' असा सवाल टाकून कोणीं गीतेचा निषेध केला. अशा रीतीनें वर्तमानपत्रांतून एक दोन आठवडे उलट सुलट, अनुकूल प्रतिकूल चर्चा होत होती. पुढें ती आपोआप थांबली. असला हा परजातींत विवाह करून गीतेनें समाजाला तर धक्का दिलाच, पण आपल्या आईवडिलांनाहि शेवटचा जबर धक्का दिला व आपल्या आयुष्यांत क्रान्ति घडवून आणली. मात्र या जबरदस्त धक्क्यानें गीतेच्या वृद्ध आईवडिलांचा अंत झाला.

५

# सावित्री शिक्षिका झाली !

आतां सावित्रीला वांईसारख्या सनातनी कर्मठ ब्राह्मणांच्या धार्मिक क्षेत्रांत राहणें अशक्य वाटूं लागलें होतें. कारण आतां ती पूर्वींची दहा बारा वर्षांची बालविधवा पोर राहिली नसून न्हातीधुती तरणीताठी सकेशा विधवा म्हणून आपल्या माहेरीं राहत होती. हें तिथल्या धार्मिक म्हणवणाऱ्या भटजींना कसें खपावें ? त्यांच्या शास्त्राप्रमाणें बालविधवा मुलगी ऋतुमति झाल्याबरोबर तिला सोंवळी केल्याशिवाय तिच्या पतीला सद्गति नाहीं, तिला सद्गति नाहीं, आणि तिच्या कुळाला सद्गति नाहीं. अशी त्यांची समजूत असल्यामुळें सावित्रीला 'पवित्र करून घ्या' असें टुमणें तिच्या वडिलांमागें या ब्राह्मणांनीं लावलें होतें. परंतु गोविंदभटजी हे जरी जुन्या वळणाचे व धार्मिक वृत्तीचे ब्राह्मण होते, तरी त्यांना अशा प्रकारच्या दुष्ट सामाजिक रूढि मुळींच आवडत नव्हत्या. ते पावित्र्याचे भोक्ते होते, पण तें रक्षण करण्याकरितां शरिराचें विडंबन केलेलें त्यांना खपत नव्हतें. म्हणून त्यांनीं ब्राह्मणांच्या सूचनेकडे कानाडोळाच केला.

ते केशवपनाच्या विरुद्ध होते आणि म्हणूनच त्यांनीं सावित्रीला तिच्या दिराकडे न पाठवितां माहेरीं ठेवून घेतली होती. सावित्रीचें सासर अगदींच सनातनी होतें. तिचे दीर तिला बाळगायला तयार होते. पण ती जनरूढी-प्रमाणें सोंवळी झाली तर. त्यांनीं गोविंदभटजींना स्पष्ट सांगितलें होतें कीं, " ती माझ्याकडेच येऊन राहिली तर पोशीन तिला जन्मभर. नाहीं तर तिची कोणतीच जबाबदारी घ्यायला मी तयार नाहीं. उचलून पैसे देण्याची आमची ऐपत नाहीं. "

आधींच सासरीं एकादशी नि माहेरीं शिवरात्र, अशी सांपत्तिक परिस्थिति. त्यांतून सकेशा राहिल्यामुळेंच दिरानें संबंध सोडलेला. माहेरचें भिक्षुक घराणें. वडील नि चुलते भिक्षुकी करीत. तीच त्यांच्या चरितार्थाचें मुख्य साधन होतें. थोडी फार शेतीभाती होती; पण प्रपंच मोठा असल्यामुळें घरखर्च मोठ्या शिकस्तीनें भागवावा लागे. कुठें पत्रावळी, द्रोण लावून विका, कुठें जानवीं जोड तयार करून विका, कुठें कुणाचा भाजीपाला आणण्याचें काम करा, अशा प्रकारचे बारीक सारीक धंदे करून भरीचे पैसे ते मिळवीत असत. सावित्री नि तिची चुलती घरचीं सगळीं कामें सांभाळीत. तिचे शाळेंत जाणारे दोघे भाऊ, लहान दोन बहिणी, तसेंच काकांचीं लहान तीन मुलें इतक्या माणसांच्या प्रपंचाचा भार दोघांवरच होता.

गोविंदभटजी नि विठ्ठलभटजी आपल्या सूचनेकडे दुर्लक्ष करीत आहेत, असें पाहून वांईच्या ब्राह्मणांनीं हळू हळू त्यांच्या विरुद्ध प्रचार करायला सुरुवात केली. त्यांना कोणी ब्राह्मणकृत्य करण्यास बोलावीनासें झालें; नेहमींचीं ठरलेलीं यजमानांचीं घरेंहि त्यांना वर्ज्य झालीं; भटाभिक्षुकांनीं त्यांच्यावर बहिष्कार टाकण्याचें ठरविलें. इतक्या थरावर गोष्टी आल्या, तेव्हां गोविंदभटजींच्या मित्रांनीं 'पाण्यांत राहून माशांशीं वैर करूं नका, यापेक्षां सावित्रीला पवित्र करून घ्या म्हणजे कांहींच पंचाईत नाहीं. आपण

भिक्षुकांनीं तरी धर्म पाळावा ' असा पोक्त सल्ला त्यांना दिला. पण सावित्रीनें तर या गोष्टीला मुळींच कबूल व्हायचें नाहीं असें ठरवल्याचें त्यांना माहीत असल्यामुळें, तिचें मन दुखवून तिच्यावर जुलमानें सोंवळेपणा लादणें शक्य नव्हतें. हा पेंच कसा सोडवावा या विचारांत ते पडले.

या बिकट परिस्थितीचा विचार करून सावित्रीनें वांई सोडण्याचा निश्चय केला होता. मुंबईपुण्यासारख्या एखाद्या शहरांत जाऊन सैंपाकाचें काम मिळवावें असें तिनें ठरविलें नि आपला विचार वडिलांना आणि चुलत्यांना सांगितला. " तूं अजून एकटी कुठें गेलेली नाहींस, पुण्यामुंबईसारख्या अफाट शहरांत कोण कोणाची दाद घेतो ? कोण कोणाला विचारतो नि मदत करतो ? तेव्हां तूं एकटी जाऊन काय करणार ? जरा धीर धर कांहीं दिवस. पाहूं या यांतून कांहीं मार्ग निघतो का. " असें त्यांनीं तिला सांगितलें. तिलाहि तें पटलें.

सावित्रीची एक लहानपणची मैत्रीण रंगू म्हणून होती. ती मुंबईला दिलेली होती. तिची तिला आज आठवण झाली. ती सध्यां कुठें असते याचा शोध करण्याकरितां तिनें तिच्या माहेरीं जायचें ठरविलें. सुदैवानें रंगूच आठदहा दिवसांत वांईला येणार असें तिला समजलें, म्हणून त्यांतल्या त्यांत तिला समाधान वाटलें. तिला रंगूचा मोठा आधार वाटला. निदान पहिल्यानें चार आठ दिवस तरी डोकें टेंकायला जागा तिच्याकडे मिळेल असा भरंवसा तिला वाटला. चारपांच दिवसांनीं रंगू आल्याचें तिला समजलें. रंगू वांईला येतांच सावित्रीच्या घरची परिस्थिति, गोविंदभटजीं-वरचा बहिष्कार, वगैरेची त्रोटक हकीगत तिला समजली होती. सावित्री तिला भेटायला गेली तेव्हां तिनें सगळी हकीगत तिच्याकडून ऐकली. रंगू म्हणाली, " माझ्या बरोबर तूं पुण्याला चलतेस का ? आतां आमची बदली पुण्यास झाली आहे कांहीं दिवस. मी तुझी सगळी व्यवस्था करतें.

काम मिळवून देतें. मी आहें तोंपर्यंत माझ्या घरीं रहा. ” आंधळा मागतो एक डोळा व देवानें दिले दोन, तर कोणाला नकोसे होतील ? सावित्रीनें मैत्रिणीचें म्हणणें ताबडतोब कबूल केलें.

ठरल्याप्रमाणें सावित्री रंगूबरोबर पुण्यांत आली आणि तिच्या मदतीनें तिनें कामें पाहायला सुरुवात केली. पुण्यासारख्या शहरांत काम मिळणें कांहीं कठीण नव्हतें, दहा पंधरा दिवसांतच तिला एका चार माणसांच्या कुटुंबांत सैंपाकाचें काम मिळालें. मोबदला जेऊन खाऊन पांच रुपये ठरला. सावित्रीनें सध्यां तरी रंगूकडेच राहायचें ठरविलें; कारण वेगळी खोली घेऊन राहिलें तर दोन अडीच रुपये भाड्यांतच खर्च झाले असते. सैंपाकाचें काम सांभाळून राहिल्या वेळांत वाड्यांतील बिऱ्हाडांचीं भाजण्या, मेतकूट, पापड–पापड्या, हळद–तिखट, वगैरे कामें ती करूं लागली. रंगूचेंहि अडलें पडलें काम होतेंच तिला. सगळे मिळून महिन्याकांठीं आठदहा रुपये तिला मिळूं लागले. ती त्यांतले पांच रुपये घरीं वडिलांकडे धाडूं लागली. अशा प्रकारें सावित्रीचे पुण्यांतले दिवस जरा बरे जाऊं लागले.

वांईच्या लोकांच्या डोळ्यांपुढें आतां ती नसल्यामुळें तिच्या वडिलांच्या मागचा त्यांचा ससेमिरा कमी झाला होता. त्यामुळें गोविंदभटजी व विठ्ठलभटजी यांना जरा शांत वाटत होतें. सावित्री त्यांच्या घरांतून निघून गेल्यामुळें आतां सोंवळ्या–ओंवळ्याचा प्रश्नही मिटला होता. हळूहळू सगळे व्यवहार पूर्वीप्रमाणें चालूं लागले होते.

एक दिवस हिंगण्याच्या आश्रमांतल्या एक प्रचारिका रंगूबाईकडे आश्रमांतल्या गरीब मुलींसाठीं मदत मागायला आल्या होत्या. सहज बोलण्यावरून बोलणें निघतां निघतां “ हिंगण्याच्या बोर्डिंगांत सैंपाक

करायला एक बाई हवी आहे." असें त्या म्हणाल्या. कामाचें स्वरूप नि पगाराची चौकशी करतां, पगार जेऊन खाऊन पंधरा रुपये, राहायला खोली, शिवाय मधल्या रिकाम्या वेळांत मुलींचीं धुणीं वगैरे धुतल्यास पैसे मिळवतां येतील, असें कळलें. प्रचारिका म्हणाल्या "पहा, असली कोणी तुमच्या ओळखीची तर द्या पाठवून; नाहींतर तुम्हीच या तिला घेऊन. संस्थाहि बघा."

काम आटपून सावित्री रात्रीं घरीं आल्यावर रंगूबाईनें दुपारीं समजलेली हकीगत तिला सांगितली. "तेथें जमलें तर छानच होईल कारण तिथली जागा कायमचीच असणार. उगीच सतरा उंबरठे चढायला नकोत, या दृष्टीनं तें काम स्वतंत्र."

सावित्रीलाहि असेंच कायमचें काम हवें होतें. दोन चार दिवसांनीं त्या दोघीजणी हिंगण्याचा आश्रम बघायला गेल्या. त्यांनीं तिथली सगळी व्यवस्था बघितली. सैंपाक करीत असलेल्या बायकांची राहण्याची सोय पाहिली. कामाची माहिती घेतली. सावित्रीनें तिथें राहण्याचें ठरवून पहिल्या तारखेपासून जायचें कबूल केलें आणि त्या तिथून परतल्या.

ठरल्या दिवशीं सावित्री हिंगण्याच्या आश्रमांत कामावर रुजू झाली. थोडयाच दिवसांत तिथें तिचें बस्तान चांगलें बसलें. तिला कामाचा सराव झाला. तिला नेमून दिलेलीं कामें बिनबोभाट होऊं लागलीं. तिचें काम मेट्रनना पसंत पडलें. मुली सैंपाकाची वाखाणणी करूं लागल्या. आतां तिला घरीं दर महिन्याला दहा रुपये पाठवतां येऊं लागले. आपण आपल्या वडिलांना मदत करूं शकतों, याचें समाधान तिला मिळूं लागलें. वडिलांना नि चुलत्यांनाहि तिच्या मदतीचें कौतुक वाटूं लागलें.

अशा प्रकारें दोन अडीच वर्षें सावित्रीनें हिंगण्यास काढलीं आणि घरच्या प्रपंचाला बराच हातभार लावला. आतां तिचा एक भाऊ मॅट्रिक होऊन नोकरीला लागला होता. दुसरा मॅट्रिकच्या वर्गांत होता. घरच्या प्रपंचाची ओढघस्त जरा कमी झाली होती. बहिणीचें लग्न झालें होतें. तिला ठिकाणहि बरें मिळालें होतें. तेव्हां सावित्रीला तिच्या पुढच्या आयुष्याविषयीं विचार करण्याइतकी मनाची शांतता मिळाली. हिंगण्याच्या वातावरणांत नि घरच्या वातावरणांत तिला किती तफावत दिसली. आश्रम म्हणजे विद्यामंदिरच तें. तेथें येणारी प्रत्येक लहान मोठी मुलगी विद्या शिकून स्वावलंबी होण्यासाठीं आलेली. कोणी पूर्ण खर्च देऊन. कोणी अर्धा खर्च देऊन. तर कोणी फुकट अगर काम करून तिथें राहत होत्या. कोणी मॅट्रिक होऊन कॉलेजचें उच्च शिक्षण घेण्याच्या महत्त्वाकांक्षेनें आलेल्या, तर कोणी अध्यापिकाशाळेंत ट्रेंड होण्यासाठीं आलेल्या; कोणी फक्त शिवण शिकण्यासाठीं आलेल्या तर कोणी नुसतें इंग्रजी-मराठी शिकण्यासाठीं आलेल्या. अशा अनेक जातीच्या विधवा, कुमारिका, सुवासिनी, लहान-मोठ्या स्त्रिया, स्वावलंबी होण्याकरितां आश्रमांत शिकत होत्या. आपल्याला ह्यापैकीं कांहीं तरी शिक्षण घेतां कां येऊं नये ? असे विचार सावित्रीच्या मनांत अलीकडे वरच्यावर येऊं लागले होते. तिला साधारण वाचायला येत होतें. तिनें अलीकडे जास्तीचीं कामें करण्याचें सोडलें होतें. फावल्या वेळांत ती आश्रमांतल्या मुलींच्या मदतीनें मराठी वाचायला लिहायला शिकत होती. मुली तिला सोपीं सोपीं मराठी गोष्टींचीं पुस्तकें आणून देत. कांहीं मुली तिला म्हणत, " सावित्रीबाई, तुम्ही फायनल व्हाल. प्रयत्न करा. "

" या कांहीं दिवस सैंपाकाला रजा नि लागा शाळेंत शिकायला " दुसरी एखादी मुलगी सुचवी.

" करा बाई गरिबाची चेष्टा; या जन्मीं नाहीं, तरी पुढल्या जन्मीं घेईन हौस भागवून शिकण्याची." असें सावित्री म्हणे नि कामाला लागे. असे संवाद वरच्यावर चालत. दर वेळीं सावित्री मुलींचें बोलणें थट्टेवारी नेई. पण तिच्या मनावर मात्र आतां खरोखरच फायनल होण्याच्या विचारानें पकड बसवली.

सैंपाकघरावर देखरेख करणाऱ्या बाई मोठ्या कडक होत्या, पण काम चोख नि झटपट करणाऱ्या बायकांवर त्या तितक्याच खूष असत. सावित्रीचें काम त्यांना फार पसंत होतें. तिच्यावर मुख्य व्यवस्थापिकेचीहि मर्जी होती. सावित्रीला शिकण्याची आवड आहे असें समजल्यापासून त्या तिला आपल्या रात्रींच्या रिकाम्या वेळांत प्राथमिक गणित, तोंडचे हिशेब, व मराठी शिकवीत असत. सावित्री एकही दिवस न चुकतां त्यांच्याकडे शिकायला जाई. तिची बुद्धि साधारण असली, तरी महत्त्वाकांक्षा मोठी असल्यामुळें प्रयत्न जबर होते; तिचीं नेहमींचीं कामें सांभाळून तिनें दोनतीन महिन्यांत बरीच प्रगति दाखविली. मराठी चवथी पर्यंतचे सगळे विषय तिनें मुख्य व्यवस्थापिका व मेट्रनबाई यांच्या मदतीनें तयार केले. आतां तिला बराच आत्मविश्वास वाटूं लागला. एक दिवस धीर करून तिनें आपल्या मनांत घोळत असलेला मराठी सहावीपर्यंत शिकण्याचा विचार मुख्य व्यवस्थापिका बाईच्या जवळ बोलून दाखविला. आणि फायनल होणें आपणांस जमेल कां ? असें विचारलें. त्या म्हणाल्या " प्रयत्न केलास तर जमेल. तूं करणार असलीस प्रयत्न, तर मी तुला सैंपाकाच्या कामाऐवजीं लहान मुलींवर देखरेख करायचें काम देतें, कदाचित् पगार थोडा कमी मिळेल. बघ, विचार आपल्या वडिलांना."

सावित्रीलाहि तेंच हवें होतें. या उत्तेजनानें ती अगदीं आनंदून

गेली. वडील कशाला नको म्हणतील ? त्यांना कसेंहि करून महिन्याकांठीं सात आठ रुपये पाठवतां येतील. आणि न पाठवले तरी आपल्या मुलीला शिकायला मिळतें, याचाच आनंद त्यांना होईल, अशी तिची खात्री होती. आणि तसेंच झालें. ही सवलत देऊन सावित्रीच्या शिक्षणाची सोय केल्याबद्दल, त्यांचें मुख्य बाईंना गौरवपर पत्र आलें.

अशा रीतीनें सावित्रीनें नव्या कामाबरोबर मोठ्या जोमानें अभ्यासाला सुरुवात केली. आतां ती नियमितपणानें वर्गांत जाऊं लागली. प्रौढ मुलींचे वर्ग निराळे होते, म्हणून बरें. नाहीं तर ज्या लहान मुलींचें काम नि देखरेख तिला करायची होती, त्यांपैकीं कांहींच्या बरोबर तिला शिकण्याची पाळी आली असती. कित्येक वेळां लहान मुलींपैकीं ज्या मुली वरच्या वर्गांत शिकत होत्या, त्यांची मदतहि सावित्री घेत होती. त्याहि ती मोठ्या प्रेमानें देत असत. आणि गमतीनें म्हणत, "आम्ही तुमच्या बाई झालों !"

अशा रीतीनें सावित्रीचा अभ्यास व्यवस्थित चालला होता. अखेर तिची फायनलची परीक्षा चांगल्या रीतीनें पास झाली. सगळ्या अध्यापकांना नवल वाटलें. ही बाई अध्यापिकाशाळेचा तीन वर्षांचा शिक्षणक्रमहि पुरा करील असें मुख्याध्यापिका आणि अध्यापिकाशाळेच्या प्रिन्सिपलनाही वाटलें. परंतु खर्चाचा प्रश्न सावित्रीच्या पुढें होता. आतां तिला काम करून अभ्यासाला वेळ देणें अशक्य होतें. तिनें नादारीचा अर्ज केला. "पूर्ण नादारी देतां येत नाहीं, तेव्हां अर्धा खर्च तिनें करावा." असें तिला सांगण्यांत आलें. परंतु सावित्रीनें आपली परिस्थिति इतकाहि खर्च करण्यासारखी नाहीं; पूर्ण नादारी मिळाली नाहीं तर आपण आपलें सैंपाकाचें अगर लहान मुलींचें काम करायला तयार असल्याचें सांगितलें.



म. मो. ... वाचनालय ... ग्रा. क्र. ...५५८.....

तेव्हां "नापास झाल्यास नादारी बंद होईल" या अटीवर तिला पूर्ण नादारी देण्यांत आली.

सावित्रीनें नादारी बंद करण्याची वेळ प्रिन्सिपलवर आणलीच नाहीं. तिचीं तीनहि वर्षें पार पडलीं. आतां ती सैंपाकीण म्हणून राहणार नसून शिक्षिका म्हणून समाजांत वावरणार होती. सर्व वरिष्ठांना तिचें कौतुक वाटलें. शेवटच्या परीक्षेचा निकाल लागून ती पास झाल्यावर प्रिन्सिपलनीं रात्रींच्या प्रार्थनेच्या वेळीं तिचें खास अभिनंदनहि केलें.

प्रिन्सिपलनीं तिची बुद्धि, चिकाटी आणि महत्त्वाकांक्षा या गुणांचें कौतुक केलें, तेव्हां ती म्हणाली, "माझ्या अंगच्या गुणांचें चीज होईल अशा ठिकाणीं मी ईश्वररुपेनें आलें, म्हणून हें अनपेक्षित यश मला प्राप्त झालें; नाहींतर मी जन्मभर सैंपाकीणच राहिलें असतें."

सावित्रीच्या घरच्या मंडळींना फार धन्यता वाटली. गोविंदभटजींना तर आकाश ठेंगणें झालें. "सावित्री आतां मास्तरीण झाली हो!" असें ते मोठ्या अभिमानानें शेजाऱ्यापाजाऱ्यांना सांगूं लागले.

६

# तापी आणि नर्मदा

तापी-नर्मदेची मैत्री म्हणजे आश्रमांतल्या मुलींचा एक चर्चेचा विषयच होऊन बसला होता. त्यांच्या या मैत्रीबद्दल अध्यापक-वर्गांतही कधीं कधीं बोलणीं निघत. त्या आश्रमांत आल्या दिवसापासूनची ही त्यांची मैत्री, त्यांचें सगळें शिक्षण संपून त्या कामाला लागल्या तरी टिकून राहिली होती.

दोघीही बालविधवा एकाच वयाच्या, दोघीही एकाच दिवशीं आश्रमांत आलेल्या, दोघीही एकाच वर्गांत बसलेल्या, दोघीही हुषार असून पहिल्या दुसऱ्या क्रमांकानें शेवटपर्यंत पास होत गेलेल्या, दोघींचेंही शिक्षण शिष्यवृत्तींवर झालेलें आणि त्या पास होतांच दोघींनाही त्यांच्या इच्छेप्रमाणें आश्रमांतच शिक्षिकांचें काम मिळालें. आतां त्या शिक्षिका म्हणून स्वतंत्र बिऱ्हाड करून राहिल्या होत्या.

तसें पाहिलें तर त्यांची पूर्वींचा ना ओळख ना देख. तापी अहमदनगरची, तर नर्मदा रत्नागिरीची राहणारी होती. तापी देशस्थ, तर नर्मदा कोकणस्थ. तापीचे वडील नगर म्युनिसिपालिटींत एक कारकून असून त्यांचा पगार बेताचाच होता. नर्मदेचे वडील भिक्षुकीचा धंदा करीत असून सुगीच्या दिवसांत थोडासा आंब्यांचाहि व्यापार करीत. दोघांचाहि प्रपंच मोठा होता. तापीच्या घरीं सख्खीं चुलत मिळून दहा पंधरा माणसें होतीं. नर्मदेला चार बहिणी, तीन भाऊ, आत्या, आजी, चुलते मिळून चौदा पंधरा माणसें नात्याचीं होतीं. तिचें घराणें भिक्षुकाचें असल्यामुळें तिला आश्रमांत पाठवितांना तिच्या वडिलांना घरांत बरेंच अकांडतांडव करावें लागलें. तितका त्रास तापीच्या वडिलांना पडला नाहीं. अशा रीतीनें त्या दोघीजणी एकाच दिवशीं आश्रमांत येऊन दाखल झाल्या होत्या, इतकाच योगायोग. दोघीहि नव्या असल्यामुळें त्यांच्या अडचणी समान होत्या. तेव्हां एकमेकींच्या विचारानें सगळ्या गोष्टी करतां करतां त्यांची मैत्री जमली होती.

या त्यांच्या मैत्रीमुळें, त्यांनीं जरी एकमेकींचीं घरें पाहिलीं नव्हतीं, तरी एकमेकींच्या घरच्या सगळ्या लोकांची खडान् खडा माहिती एकमेकींना दिली होती. तसेंच त्या सुटीला दोघी आपापल्या घरीं जात, त्यावेळीं घरच्या बरोबरीच्या लहान मोठ्या भावंडांनाहि आपल्या मैत्रिणींविषयीं त्या खूप सांगत. आणि आईवडिलांना " मी माझ्या मैत्रिणीला एकदां एका सुटींत घेऊन येणार आहें " असेंहि सांगत. अशाच आणखी दोन तीन सुट्या गेल्यावर तापीनें नर्मदेच्या आईवडिलांची परवानगी आपल्या वडिलांकडून मागविली, आणि तिला आपल्या घरीं गणेशोत्सवाकरितां नेलें. तसेंच पुढील एका उन्हाळ्याच्या सुटींत आंबेफणस खायला नर्मदेनें तापीला रत्नागिरीला नेऊन आणलें होतें. अशा प्रकारें त्यांचा आतां एकमेकींच्या घरींहि परिचय झाला होता.

तापीचा मावसभाऊ रमेश आणि त्याचा एक मित्र सुरेश हे दोघे पुण्याला कॉलेजचें शिक्षण घेण्याकरितां खोली घेऊन राहिले होते. तापी हिंगण्याला आली त्या वर्षी रमेश वाडिया कॉलेजमध्यें असून बी. ए. च्या परीक्षेला बसणार होता. त्याचा मित्र सुरेश फर्ग्युसन कॉलेजमधून बी. एस्सी. परिक्षेला बसणार होता. पुढें त्याला एंजिनिअरिंग कॉलेजमध्यें जायचें होतें. तापीला हिंगण्याला पोंचवायला वडिलांबरोबर रमेश आला होता, म्हणून त्याची व नर्मदेच्या वडिलांची त्याच दिवशीं ओळख झाली होती. तेव्हां सहजच त्यांनीं घरीं परत जातांना त्याला सांगितलें होतें कीं, “आमच्या नमूचीहि विचारपूस करीत जा म्हणून.” तेव्हां रमेश नि सुरेश तापीला भेटायला गेले कीं, नर्मदेची देखील चौकशी करीत, व एकादे वेळीं तिला तापीबरोबर गांवांत सिनेमानाटकाला घेऊन जात.

सुरेश हा नगराचाच असून त्याचे वडील गोविंदराव गुपचूप हे एंजीनिअर होते. त्याच्याच घराशेजारीं तापीच्या वडिलांचें घर होतें. सुरेश गोविंदरावांचा एकुलता एक मुलगा होता. त्यांच्या घरीं दुसरीं लहान मुलें नसल्यामुळें तो सारा दिवस तापीच्या घरींच मुलांमध्यें खेळत असायचा. कित्येक वेळां त्याचें जेवणखाण नि निजणेंही तिथेंच व्हायचें. तापीचेंहि त्याच्या घरीं जाणें येणें होतेंच. तो तिला भारी त्रास द्यायचा, पण तिला त्याच्याकडेच जायला हवें असायचें. अशा रीतीनें सुरेशची या मुलांशीं जमलेली लहानपणची गट्टी मोठेपणींहि कायम राहिली होती.

तापीकडे रमेशचें जाणेंयेणें वरच्यावर होत असे, त्यामुळें त्याच्याशींहि सुरेशची मैत्री जमली होती. ते दोघे वयानें बरोबरीचे असून त्यांचा स्वभावहि एकमेकांना पटलेला होता. त्यामुळें ते पुण्याच्या निरनिराळ्या कॉलेजमध्यें जात होते तरी एकाच ठिकाणीं राहत होते. रमेश बी. ए. झाल्यावर पुणें

सोडून नौकरीनिमित्त मुंबईला गेला, आणि सुरेशला एंजिनिअरिंग कॉलेजमध्यें प्रवेश मिळाल्यामुळें तो पुण्यांतच राहिला. तो रेसिडेन्सींत राहायला न जातां आपल्या पूर्वींच्याच खोलींत राहिला होता. अर्थात् रमेश मुंबईला गेल्यावर तापी-नर्मदेकडे जाऊन समाचार घेण्याचें काम आतां त्याच्याकडेच आलें होतें.

तापी आणि सुरेश यांचा लहानपणापासूनच एकमेकांकडे ओढा होता. आपल्या भावंडांना देखील ती इतक्या प्रेमानें वागवीत नसे, पण सुरेशचा शब्द झेलायला ती नेहमीं तयार असायची. मध्यंतरीं तिचें लग्न झालें, नि ती सासरीं गेली. सुरेशही पुण्याला गेला, त्यामुळें त्यांच्या सहवासांत खंड पडला असेल तेवढाच. पण तापी माहेरीं आली, कीं सुरेश एकदोनदां तरी नगरला चक्कर टाकून यायचा.

तापीच्या लग्नानंतर दीड दोन वर्षांतच तिच्यावर बालविधवा म्हणून हिंगण्याला शिकायला जाण्याचा प्रसंग आला. आणि सुरेशची व तापीची मैत्री अधिकच वाढत चालली. तो तिला सख्ख्या बहिणीप्रमाणें समजे. तापीला कोणी रागें भरलें किंवा कांहीं दुःख झालें, तर सुरेशचे डोळे भरून येत. तापीचाहि त्याच्यावर फार जीव होता. तापीमुळें नर्मदेलाहि तो बहीण मानूं लागला. आणि तितक्याच मोकळेपणानें तिच्याशीं वागे.

तापी आणि नर्मदा यांचें स्वतंत्र बिऱ्हाड झाल्यावर सुरेश शनिवार रविवारची सुटी त्यांच्याकडेच काढायचा. एखादा शनिवार रविवार त्यांचा गांवांत सिनेमानाटकाचा कार्यक्रम व्हायचा. कधीं बंड गार्डन, एंप्रेस गार्डन, आणि लोणावळा—मळवलीसारख्या सहली व्हायच्या. अशा रीतीनें तापी, नर्मदा आणि सुरेश यांचे पुण्यांतले दिवस मजेंत जात होते. महिन्या दोन महिन्यांतून रमेशही मुंबईहून येत असे, त्यामुळें तर त्यांच्या कार्यक्रमाला

आणखीच मजा यायची. गप्पागोष्टी, थट्टाविनोद, वादविवाद, यांत त्यांचा दिवस कुठें जाई तो समजतही नसे.

या चौघांनां हिंगण्याइतका मोकळेपणा आणि स्वतंत्रपणा दुसऱ्या कोठेंही वाटत नसे. शिक्षणानें त्यांच्यामधला भलता संकुचितपणा नाहींसा झाला होता. त्यांचे विचार–आचार बरेच पुढें गेले होते. आणि केशवपना-पासून तों, प्रौढविवाह, प्रेमविवाह, विधवाविवाह, आंतर्जातीय विवाहापर्यंत सामाजिक विषयांवर त्यांचे वादविवाद चालत. रमेश आणि सुरेश दोघेही या बाबतींत पक्के सुधारक असून प्रेमविवाहाच्या बाजूनें बोलत. " प्रेम बसलें कीं मग आपण विधवा, कुमारिका, ब्राह्मण, मराठा, असा विचार नाहीं बुवा करीत बसणार ? " असें रमेश प्रतिपादी, तर सहवासोत्तर प्रेमाला सुरेश अधिक किंमत देई.

असेच एका रविवारीं दुपारीं जेवणेंखाणें आटपून, हा चौकडा ब्रिज खेळत बसला होता. खेळणें संपून चहा फराळ होत असतां रमेश म्हणाला. " सुटींतला कार्यक्रम काय तुम्हां लोकांचा ? " " कोंकण पाहायला चला या सुटींत तुम्ही सगळींजणं " नर्मदा म्हणाली. पण तापीनें त्या बेताला नकार दिला, कारण तिच्या आईला बरें नव्हतें आणि घरांत फार अडचण होती. म्हणून सुटी सुरू होतांच निघून येण्याबद्दल तिला तिच्या घरचें पत्र आलें होतें. हा नकार ऐकून रमेश तिला चिडवण्याच्या हेतूनें म्हणाला, " तुझं कोंकण झालं आहे पाहून, तूं नको येऊंस पाहिजे तर. आपण जाऊं रे सुरेश दोघेजण. "

"नको रे बाबा, आमच्यावर घुस्सा व्हायचा बहिणाबाईचा. तिथें खाल्लेले आंबे-गरे पचायचे सुद्धां नाहींत आपल्याला यांच्या शापामुळें."

हें सुरेशनें दिलेलें उत्तर ऐकून तापी मनांतल्या मनांत खूष झाली आणि

वरवर म्हणाली, "खरंच जा नर्मदे तूं या दोघांना घेऊन. यंदाचं सुरेशचं पुण्यातलं हें शेवटचं वर्ष शिक्षणाचं. माझं काय? मी केव्हांही येईन." होय नाहीं करतां तापीनें सुटी होतांच नगरला जावें, रमेशनें रजेचा अर्ज करावा, सुरेशनें आपलें कॉलेजमधलें जादा काम पुण्यांत राहून संपवावें, नर्मदेनें हिंगण्यासच राहून पोहायला वगैरे शिकावें, मेच्या वीस तारखे-पर्यंत तापीनें घरून यावें, आणि एक आठवडा सर्वांनीं रत्नागिरीला घालवावा असें ठरलें.

परंतु वरील कार्यक्रमाप्रमाणें कोणालाच कांहीं करतां आलें नाहीं. कारण तापीला घर सोडायला सवडच मिळाली नाहीं, रमेशला रजा मिळाली नाहीं, आणि सुरेशची कॉलेजची तहकूब झालेली गोव्याची सहल पुन्हां ठरली. नर्मदेचा पोहण्याचा कार्यक्रम मात्र चालू होता. तसेंच सुरेशचे नि तिचे गांवांतले कार्यक्रम सुटी असल्यामुळें जास्त प्रमाणांतच चालू होते. ती टिळक तलावांत पोहायला शिकावं म्हणून गांवांत राहायलाही चार पांच दिवस गेली होती.

सुरेश पोहण्याच्या कलेंतला दर्दी होता. त्यानें तिला पोहायला शिकवण्याचें कबूल केलें होतें. त्यानेंच हिंगण्याच्या पाटलाच्या विहिरींत प्रथम तिला उतरवली होती. पण भीतीमुळें तिला तिथें शिकणें जमत नव्हतें. म्हणून त्यानें तिला पुण्यांत राहायला बोलावली होती.

नर्मदा गांवांत गेली ती सुरेश सहलीला जायला निघेपर्यंत तिथेंच होती. ती सांगायला आपल्या मामीकडे असे, पण रात्रींचें जेवण नि झोपणें, येवढेंच तिचें तिथें होई; बाकीचा सगळा वेळ ती सुरेशच्या खोलीवरच काढी. सकाळीं पोहायला जाणें; नंतर खोलीवर सुरेशचा डबा येत असे, तिथेंच जेवण करणें; नंतर विश्रांति नि मधल्या वेळचा चहा-फराळ, गप्पा झाल्यावर

सायंकाळीं लांब फिरायला जाणें, किंवा सिनेमाला जाणें, असा रोजचा त्या दोघांचा कार्यक्रम होता. या पंधरा वीस दिवसांच्या निकट सहवासानें त्यांच्या मनांत सुप्त असलेलें एकमेकांबद्दलचें आकर्षण मूर्तस्वरूप धारण करूं लागलें.

एक दिवस सिनेमागृहांत ‘ शो ’ सुरू होण्याची वाट पाहत तीं बोलत बसलीं असतांना सुरेश म्हणाला, “ किती आनंदांत आपले हे दिवस गेले नाहीं ? तुला नाहीं वाटत ? ” तिनें आपली संमति नजरेनेंच व्यक्त केली, आणि उत्तर दिलें, “ पण हें औट घटकेचं राज्य; घटका बुडाली, राणी राज्यावरून खालीं आली. ” इतक्यांत सिनेमागृहांत अंधार झाला. पडदा सरकला आणि चित्रपट सुरू झाला, म्हणून तें बोलणें तितकेंच राहिलें. परंतु तिचा हात आपल्या हातांत घेऊन सुरेश तिच्या कानांत पुटपुटला “ पण या राणीची इच्छा असली तर हें राज्यपद अढळ राहील. ” या त्याच्या शब्दांनीं नर्मदेच्या सगळ्या शरिरांतून वीज चमकून गेली. तिचें सर्वांग थरारल्याप्रमाणें झालें. आपण स्वप्नांत आहोंत कीं जागृत आहोंत याचाहि तिला भ्रम झाला. हें अनपेक्षित उत्तर ऐकून तिला स्वर्गीय आनंद वाटला.

नर्मदेचें लक्ष चित्रपटाकडे मुळींच नव्हतें. चित्रपट संपला आणि जिकडे तिकडे लख्ख प्रकाश पडला, तेव्हां ती एकदम दचकून भानावर आली. दोघेंही आपापल्या घरीं गेलीं, पण त्यांना ती रात्र अस्वस्थपणांत काढावी लागली. “ आपलें प्रेम व्यक्त करण्यांत आपण घाई तर नाहीं केली ? ” असें सुरेशला वाटून त्याचें मन बेचैन झालें. तर “ सुरेशसारखा जोडीदार आपल्याला मिळावा असं तापीला नसेल का वाटत ? मग सुरेशनीं मला कां आशा दाखवली ? तापीचं मन त्यांच्यावर नसेल कशावरून ? तिचाच हक्क त्यांच्यावर अधिक नाहीं का ?

पण मी काय करणार? मीं होऊन हा प्रश्न कधींच काढला नव्हता." इत्यादि विचारांनीं नर्मदेचें मन व्यग्र झालें.

दुसऱ्या दिवशीं नर्मदा रोजच्याप्रमाणें सुरेशकडे गेली. तों सुरेश नुकताच उठून स्टोव्ह पेटवून चहा करण्याच्या तयारींत असलेला दिसला. नर्मदेनें कपड्यांची पिशवी त्याच्या पलंगावर टाकीत विचारलें,

"आज पोहायला नाहीं वाटतं यायचं?"

"रात्रभर मी खूप खूप पोहलोंय कीं. इतका दमलोंय. हुश्ऽऽऽ" सुरेश म्हणाला.

"कुठल्या तलावांत गेलां होतां पोहायला?" हंसत हंसत नर्मदा म्हणाली.

"एवढ्याशा तलावांत नाहीं गेलों मी पोहायला. मोठ्या अफाट सुखसागरांत!" असें म्हणून तो मोठ्यानें हंसला.

"बरं तर, मी देतें तुम्हांला चहा करून. दमलांत ना फार तुम्ही?" असं म्हणत ती उठली नी चहा करायला लागली. त्या दोघांचा चहा पिऊन झाल्यावर नर्मदेच्या मनांत रात्रभर घोळत असलेले तापीविषयींचे विचार तिनें सुरेशजवळ बोलून दाखवले, आणि आपला संशय फेडून घेतला. सुरेशनें "तापी माझी आवडती बहीण आहे, तर तूं माझी आवडती पत्नी व्हावंस" इत्यादि सांगून तिचें समाधान केलें. त्याच दिवशीं एकमेकांनीं एकमेकांचा स्वीकार करण्याचें वचन दिलें.

सुटी संपून पुन्हां शाळा कॉलेजें सुरू झालीं. तापी आणि नर्मदा कामावर

रुजू झाल्या. सुरेश सहलीवरून परत येऊन नगरला गेला होता तोही परत कॉलेजमध्यें हजर झाला. या त्रिवर्गीच्या नेहमींच्या रिकाम्या वेळांतल्या कार्यक्रमाला पुन्हां सुरुवात झाली. ‘ चोराचीं पावलें चोराला ओळखतात. ’ तापीच्या नजरेंतून नर्मदा नि सुरेश यांच्या वागण्यांत पडलेला फरक सुटला नाहीं. त्यांत भर म्हणजे अलीकडे नर्मदेचें गांवांत मामीकडे वरच्यावर काम निघूं लागलें होतें; ती दर रविवारीं गांवांत जायची. तसेंच सुरेशचेंही हिंगण्याला येणें कमी कमी होत गेलें होतें. विचारलें तर हें शेवटचें वर्ष असल्यामुळें शनिवार-रविवार देखील कॉलेजमध्यें जावें लागतें, अशी तो आपल्याकडून बेमालूम थाप तापीला मारीत असे. तरी पण तिला तें खरें वाटणें शक्य नव्हतें.

तापीचें मन संशयपिशाच्च्यानें पछाडलें. ती नर्मदेशीं धडपणें बोलेनाशी झाली. अलीकडे ती कोणत्याच कार्यक्रमांत मनापासून भाग घेत नसे. तसेंच नर्मदेनें गांवांत येण्याबद्दल तिला विचारलें तरी कांहीं तरी करून ती तिला नकार देत असे. चार सहा महिने अशा धुसफुशींत निघून गेले. वरकरणी जरी त्यांची मैत्री पूर्वीसारखीच दिसत होती, तरी येथें कांहीं तरी बिघडलें आहे, हें बरोबरीच्या शिक्षकिणींच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं. ह्यांच्यापैकीं एखादी तापीला किंवा नर्मदेला एकटीच गांवांत जायला निघालेली पाहून विचारीही, “ कां, आज जोडी फुटलीशी ! ” त्या उडवाउडवीचीं उत्तरें देऊन वेळ मारून नेत.

एक दिवस तापीला ताप आला होता, म्हणून ती रजेवर होती. मधल्या सुटींत नर्मदा खोलींत येऊन तिला काय हवें तें विचारूं लागली. तरी तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं, असें पाहून ती तिच्याजवळ गेली, नि तिच्या कपाळावर हात ठेवून, “ डोकं का ग दुखतंय् भारी ? अमृतांजन चोळून

देऊं का ?" असं म्हणून तिनें अमृतांजनाची डबी उघडली, आणि तिच्या डोळ्यावरचें पांघरूण दूर करायला लागली. तोंच तिच्या हाताला हिसका देऊन तो दूर करीत तापी फणकाऱ्यानें म्हणाली, "कांहीं नकोय् चोळायला माझ्या डोक्याला. कंटाळा आला आहे आतां मला या मायावी प्रेमाच्या पुळक्याचा !"

"अशी काय ग करतेस तूं आतांशी तापी ? तुला झालंय् तरी काय ?"

"माझा केसानं गळा कापून आणखी वर मानभावीपणानं मलाच विचारतेस होय काय झालं म्हणून ?"

"मीं तुझा केसानं गळा कापला ? काय बोलतेस हें तापी ?"

"तुला काय वाटतं. माझ्या लक्षांत आल्या नाहींत होय सगळ्या गोष्टी ? मला एका शब्दानं तरी दर्शवल्यास का कधीं सुरेशबद्दलच्या तुझ्या भावना ? तूं रमेशला नि मला, दोघांना दुःखी करून सुखी होणार ? स्वार्थी नाहीं तर ! तूं......तूंच माझा सुरेश हिरावून घेतलास !" असं म्हणून तापी उशींत तोंड खुपसून रडूं लागली.

"तर मग तूं मला कां नाहीं सांगितलंस यापूर्वी हें कधीं ? मी कशाला तुझे सुरेश हिरावून घेऊं ! त्यांनींच मला आपण होऊन विचारल्या-वर मीं होकार दिला, यांत माझं काय चुकलं ? विचार त्यांना हवं तर ?" इतक्यांत शाळेची घंटा झाली आणि नर्मदा वर्गांत निघून गेली.

नर्मदेच्या या भाषणानें मात्र तापी अगदीं सर्दच पडली. तिचें मन खट्टू झालें. सुरेश असें वागेल, हें तिच्या स्वप्नांतही नव्हतें. ती अकरा बारा

वर्षांची होती, तिला कांहीं कळत नव्हतें तेव्हांपासून सुरेशच आपला नवरा व्हावा, म्हणजे आपल्याला सासरीं दूर जावयास नको, असें तिला वाटत होतें. इतका तिला तो आवडत होता. परंतु तिचें लग्न झालें तेव्हां तो अवघा पंधरा सोळा वर्षांचा असून शाळेंत शिकणारा मुलगा होता. त्याचें कोण लग्न करणार होतें त्यावेळीं ? आणि तापी तरी आपल्या मनांतली गोष्ट कोणाला सांगणार ? तेव्हांपासूनचें तापीच्या मनांत असलेलें सुरेशवरचें प्रेम आतां ती मोठी झाल्यामुळें जागृत झालेलें होतें. सुरेशही आपल्यावर प्रेम करीत आहे, अशीच तिची आतांपर्यंतची कल्पना होती. ती साफ खोटी ठरलेली पाहून तिच्या मनाला मोठाच धक्का बसला ! रमेशचें प्रेम नर्मदेवर असल्याची तिला शंका होती. म्हणून तिनें तिला त्याच्याशीं लग्न करण्याबद्दल एक दोनदां विचारलेंहि होतें; पण नर्मदेनें आपल्याला लग्नच करायचें नाहीं, असें सांगितलें होतें. त्यामुळें तिचें नि सुरेशचें सूत जमत असेल असें तिला वाटलेंच नव्हतें. तिला त्याचा भयंकर राग आला. तो त्यावेळीं समोर असता, तर तिनें काय केलें असतें कोण जाणें ! इतकी ती संतापानें बेफाम झाली होती.

सुरेशला भेटून केव्हां एकदां त्याची कावड काढीन असें तापीला झालें होतें. ती शाळेंत शिकवण्याचें काम करीत होती, पण तिचें त्यांत लक्ष लागेल तर शपथ. दोन तीन दिवस तिनें कसे तरी काढले. आणि शनिवारीं शाळा सुटतांच ती निघाली, ती तडक सुरेशच्या खोलीवर जाऊन दाखल झाली. जवळच्या किल्लीनें तिनें खोलीचें दार उघडलें आणि सुरेश येण्याची वाट पाहत ती त्याच्या पलंगावर पडून राहिली. दहा मिनिटांनीं सुरेश येऊन पाहातो, तों तापी बिछान्यावर निजलेली त्याच्या दृष्टीस पडली. तिला पाहून तो म्हणाला, " वाहवा ! तूं आजारी ना होतीस ? नर्मदेनं कळवलं मला, म्हणून मी आतां मंडईत जाऊन फळं घेऊन आलों. आणि चहा घेऊन तिकडेच येणार होतों. "

हें ऐकून तापीच्या संतापानें एकदम उसळी मारली. आणि "ढोंगी ! नीच ! विश्वासघातकी ! दुष्ट ! कोणाकरतां तूं येणार होतास, आणि आतांपर्यंत येत होतास, हें मला आतां चांगलं कळलं आहे. व्यर्थ ! व्यर्थ मीं या सापाला दूध पाजलं नि गरळ अंगावर घेतलं ? गरळ ओकणाऱ्या सर्पाचं जातक आहे तुझं !" इत्यादि कठोर शब्दांनीं तिनें त्याची संभावना करायला सुरुवात केली.

तिला मध्येंच थांबवून सुरेश म्हणाला. "तूं काय म्हणतेस याचा अर्थच मला समजत नाहीं. तुझ्यासाठीं मी प्राणहि खर्ची घालायला तयार आहें. मग------"

त्याचें बोलणें पुरें होण्यापूर्वींच ती अधीरतेनें म्हणाली, "आणि हृदय — प्रेम मात्र दुसरीला अर्पण केलंय ? किती आशेनं मी आजपर्यंत तुझी मूर्ति माझ्या हृदयांत स्थापून तिची पूजा अष्टौप्रहर करीत होतें ! केवढी निराशा केलीस माझी तूं नर्मदेला आपलं प्रेम देऊन !"

सुरेशच्या डोक्यांत आतां लख्ख प्रकाश पडला. तो म्हणाला, "तापी केवढी चूक केलीस तूं ? आपण लहानपणापासून बहीणभावंडांप्रमाणें एकत्र खेळलों, बोललों, बसलों, जेवलों, खाल्लों. मी तुला बहिणीप्रमाणें मानीत आलोंय्, आणि अजूनहि माझी तीच भावना आहे. पत्नी म्हणून तुझा अंगिकार करणं मला कधींच जमलं नसतं. क्षमा कर मला. माझी ताई म्हणून तूं मला पूर्वींइतकीच प्रिय आहेस."

"ठीक आहे." असं म्हणून तापी तावातावानें जी बाहेर पडली ती तडक परत हिंगण्यास गेली.

तापीनें हिंगण्याचें वर्ष पुरें होईपर्यंतहि वाट पाहिली नाहीं. तिला बरें वाटत नव्हतेंच. बारीक ताप येऊं लागला. तेव्हां सहामाही पुरी होईपर्यंत ती तिथें राहिली. या नव्या घडलेल्या घटनेपासून तिनें नर्मदा आणि सुरेश यांच्याशीं बोलणेंच वर्ज्य केलें होतें. आतां ती गांवांत गेली तरी सुरेशकडे जात नसे. तो आजारी असला तरी ती त्याच्याकडे ढुंकूनहि पहात नसे. दोघांच्याबद्दल तिच्या मनांत वसत असलेल्या असूयेचें द्वेषांत आणि तिरस्कारांत रूपांतर झालें होतें; तें इतकें कीं आतां ती आपल्या इतर मैत्रिणींजवळहि सगळें सांगून तो तिरस्कार व्यक्त करूं लागली.

सुटी होतांच तापीनें आजारी म्हणून शाळा सोडली, आणि नर्मदेनें लग्न ठरलें म्हणून सोडली. तापी घरीं निघून गेली. नर्मदेनें सुरेशशीं लग्न करून संसार मांडला. तापी आणि नर्मदा यांची जोडी अशा रीतीनें फुटली ती पुन्हां कधींच सांधली नाहीं! आतां त्या एकमेकींचा दुस्वासच करूं लागल्या.

तापी–नर्मदा आश्रमांत आल्या, तेव्हां त्यांच्या असामान्य मैत्रीची चर्चा होत होती; आतां त्यांच्यामध्यें उत्पन्न झालेल्या दीर्घ–द्वेषाची आणि तिरस्काराची चर्चा होऊं लागली. सर्वांना अभेद्य वाटणारी त्यांच्यामधली मैत्री कायमची तुटली कशी याचेंच आश्चर्य सगळ्यांना वाटूं लागलें. त्यांच्याविषयीं जेव्हां जेव्हां बोलणें निघे, तेव्हां मुली म्हणत, "हें असं कसं झालं?" शिक्षिकाहि म्हणत, "आश्चर्य आहे खरं!"

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२५२२
विभाग कथा — ६५ —
क्रमांक ४३३
नों. दि.

७

# पुनर्मीलन

नागपूर
४-२-१९१५

सौ. विजया,

त्या दिवसापासून तुझं तोंडहि बघायचें नाहीं असं ठरवलं होतं मीं; आणि हा माझा निर्धार गेलीं पांच वर्षें तडीला गेला. परंतु आज सहा महिने झाले. तुझ्या मुख्याध्यापिका बाईनीं माझ्यावर पत्रांची सारखी झोड उठवली आहे, एकदां तरी येऊन त्यांना भेटून जाण्याबद्दल. त्यांनीं तुझ्या गुणांची, हुषारीची नि वागणुकीची तरफदारी करून एकदां तरी तुला भेटून जाण्याची गळ घातली, म्हणून मी गेल्या महिन्यांत पुण्याला आलों. बाईंना भेटायला हिंगण्याला आलों त्यावेळीं, मीं तुला घरीं नेऊन तुझ्याशीं संसार करावा, तुझ्या चुकांकडे कानाडोळा करावा, एकमेकांनीं एकमेकांचे अपराध विसरून

जावे, वगैरे उपदेश तुझ्या बाईनीं मला केला. नंतर त्यांनीं कचेरींत मला भेटायला तुला पाठवून दिलें.

'मी चुकलें म्हण, म्हणजे मी तुला क्षमा करतों.' असा पूर्वीचाच जवाब मीं तुला दिला, आणि 'आहे हें कबूल ?' असा प्रश्न विचारला. तूंहि 'मी चुकलेंच नाहीं, तर चुकलें असं कसं नि कां म्हणूं ?' असं पूर्वीचेंच ताठ्याचें उत्तर मला दिलेंस. अजून तुझा ताठा गेला नाहीं म्हणायचा तर ! पण ध्यानांत ठेव तूं आपली चूक कबूल केलीस तरच मी तुला क्षमा करीन. पांच वर्षांचा अवधि मी तुला देईन, असं मीं माझ्या मित्राला वचन दिलं होतं. तें आतां पुरं होत आलेलं आहे. पांच वर्षें संपत आलीं तरी तुला पश्चात्तापाचें नांव नाहीं ! आतां मी दुसरं लग्न करायला मोकळा झालों आहें. तेव्हां अजून नीट विचार कर.

विश्राम गोळे

* * * *

हिंगणें

१५-२-१९१५

रा. रा. विश्राम,

होय, तुमच्या मताप्रमाणं मीं तुम्हांला त्या दिवशींहि तेंच पूर्वीचं ताठ्याचं उत्तर दिलं. कारण स्त्रीला आपलं शील प्राणांहून प्रिय वाटतं. तिच्या शीलावर अनीतीचा शिंतोडा कोणींहि उडवलेला तिला सहन होणार नाहीं. मग तुम्ही तर माझे प्रत्यक्ष पति असून माझ्या शीलाविषयीं खोटा संशय घेतलात ! माझं म्हणणं ऐकूनहि घेतलंत नाहीं, मग तें खरं मानायची गोष्टच कशाला ?

तुमच्या पायांची नि देवा तुळशीची शपथ घेऊन मीं तेव्हां सांगितलं होतं, कीं अशी गोष्ट माझ्या हातून मुळींच घडली नाहीं ! त्या मेल्या तुमच्या शागीर्दानेंच माझी खोडी काढली, आणखी ती पचवावी, आपला बभ्रा होऊं नये, म्हणून सासूबाईच्या नि भाऊजींच्या मनांत माझ्याविषयीं भलतं सलतं भरवून दिलं. त्यांच्याकडून तें तुम्हांला कळलं, आणि तुम्हींहि तें खरं मानलंत. सोळा वर्षांची पोर, लग्न होऊन वर्ष सहा महिने होतात न होतात तों असले ढंग करील का, याचा विचारहि तुमच्या मनाला शिवला नाहीं ! आणि असला घाणेरडा आरोप माझ्यावर करून मला घरांतून माहेरीं जा म्हणून घालवून दिलंत. हें निर्दयतेचें कृत्य विसरणें शक्य आहे का ?

आतां सांगतां 'चूक कबूल कर, म्हणजे मी तुझ्यावर दया करीन.' त्या दिवशींहि, मी लहान होतें तरी, 'चूक नसतांना मी कां म्हणून म्हणेन चुकलें असं,' असंच उत्तर दिलं. मग आतां तर मी मोठी झालें आहे, आणि धीट झालें आहे. जें माझ्या हातून घडलंच नाहीं, तें मी घडलं असं खोटंच मानूं ? नि चूक कबूल करूं ? छे ! तें शक्य नाहीं. तुम्हीच उलटी माझी क्षमा मागायला हवी, खोटा आरोप माझ्यावर केल्याबद्दल. लग्न करण्याचा धाक घालतां ! त्याला मीं त्यावेळींहि जुमानलं नसतं. मग आतां कां जुमानीन ? करा लग्न. माझी 'ना' नाहीं. माझ्या सवतीला मात्र मी इतकं तरी सांगेन कीं, "बाई ग, तुझे यजमान हलक्या कानाचे आहेत. जपून वाग त्यांच्याशीं !" कधीं तरी माझं सांगणं तुम्हांला खरं मानावंच लागेल. तो दिवस लवकर येवो, अशी इच्छा करणारी,

आपली धर्मपत्नी

विजया

नागपूर
२५–२–१९१५

सौ. विजया,

आतां तुला माझी गरज नाहींशी दिसते. कारण आतां तूं स्वावलंबी झालीस असं तुला वाटतं, आणि म्हणून लिहितेस 'खुशाल लग्न करा.' परंतु पतीच्या सान्निध्याशिवाय, नि सांवलीशिवाय कोणत्याच – आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र स्त्रीलाहि – संसारसुख मिळणार नाहीं, हें आहे का तुला माहित ? तेव्हां ही तुझी भाषा आततायीपणाची आहे.

मीं तुझ्यावर खोटा आरोप केला, असं तुझं म्हणणं. मग त्यावेळीं तसं निक्षून सांगायला तूं कां कचरलीस ? दुसरं, रावजीनं तुझी खोडी काढली तर तूं ताबडतोब ती गोष्ट माझ्या कानावर कां घातली नाहींस ? तूं गप्प बसून त्याला उत्तेजनच दिलंस नाहीं का ? मीं माझ्या डोळ्यांनीं तुमची दोघांची माजघरांतील जिन्यांत गांठ पडलेली बघितली. माझी चाहूल लागतांच त्यानं तुझा हात सोडून तुला पटकन् दूर लोटलं. तूं तोंड फिरवून माडीवर गेलीस. काय होतं तुझं तिथं काम त्या जिन्यांत फुटक्या तिन्हीसांजा ? माझ्याशीं बोलण्या-बसण्यापेक्षां रावजीशींच तूं अधिक मोकळेपणानं बोलत बसायाचीस सदा, तें मीं काय पाहिलं नव्हतं ?

त्यावेळीं मीं जें केलें तेंच योग्य केलं. मीं तुला निष्ठुरपणानं घालवून दिली माहेरीं. मी एक निष्ठुर होतों, पण तुझ्या बाबांनीं कां नाहीं तुला थारा दिला ? त्यांची तर तूं एकुलती एक मुलगी. यावरून काय सिद्ध होतं ? तुला आश्रमानं तरी कशी ठेऊन घेतली याचंच आश्चर्य वाटतं मला. तुला ना कोणी मालक ना पालक. एक पळपुटी मुलगी ! अशा

मुलींना आश्रय देऊन या संस्था असल्या वर्तनाला उत्तेजन मात्र देतात.

विश्राम गोळे

हिंगणें

१०-३-१५

रा. रा. विश्राम,

'एक पुळपुटी मुलगी !' किती निंदाव्यंजक विशेषणानं उल्लेख केलात तुम्हीं माझा ? संस्थेनें कसा आश्रय दिला मला, याचं नवल वाटतं तुम्हांला ? व्यक्ति विकारानं अंध होतात. संस्था नाहीं होत तशा. त्या विचारानं वागतात, असाच मला अनुभव आला त्यावेळीं. नाहीं तर त्यांनीं तरी माझ्या सांगण्यावर भरंवसा कसा ठेवला असता ? मी माझी पुण्याईच समज तें ती नाहीं तर वडिलांनींहि मला तुमच्याकडेच कांहीं झालं तरी गेलं पाहिजे, असं सांगितल्यावर मी कुठें जाणार होतें ? ज्या पतीनंच आपल्याला कुलटा ठरवली, त्याच्याकडे प्राण गेला तरी जायचं नाहीं, हा तर माझा निश्चय होता. पुण्यांत अनाथ, निराश्रित, मुलींना आश्रय देऊन त्यांना स्वावलंबी बनवणारं शिक्षण देणाऱ्या सेवासदनचं आणि आश्रमचं नांव मीं ऐकलं होतं. म्हणून तिथें जाण्याच्या हेतूनें मी वडलांच्या घरून निघालें, ती अकोला स्टेशनवर येऊन पुण्याच्या गाडींत बसलें.

गाडींत एका गृहस्थांना माझी दया येऊन त्यांनीं मला मदत केली नसती तर माझ्यावर आणखी काय प्रसंग आले असते कुणास ठाऊक. माझ्याजवळ

एका लुगड्याच्या घडीशिवाय सामान कांहीं नव्हतं. बरोबरहि कुणीं दिसत नव्हतं. चेहरा भेदरलेला! अशा स्थितींत मी बांकाच्या एका कोपऱ्यांत बसलेली होतें. आणि माझ्याच डब्यांत समोरच्या बांकावर हे गृहस्थ – भार्गवराव – बसले होते. त्यांनीं बराच वेळ माझ्याकडे निरखून पाहिलं असावं, कारण मीं रस्त्याकडून आंतल्या बाजूला तोंड वळवलं सहज, तोंच त्यांनीं मला विचारलं, " कुठें जायचंय् तुला मुली? बरोबर कुणी आहे कीं नाहीं?" "मी एकटीच पुण्याला जाणार आहें." येवढंच उत्तर, डोळ्यांतील पाणी आवरून मीं कसंबसं दिलं. आणि पुन्हां खिडकीच्या बाहेर तोंड काढून पूर्वीप्रमाणें स्तब्ध बसलें. पण त्यांनीं " कांहीं हरकत नाहीं, घाबरूं नको, मी नेईन तुला माझ्याबरोबर पुण्याला, आणि कुठें जायचं असेल तिथें पोंचती करीन." असें म्हटलें. या त्यांच्या आश्वासनपर उच्चारलेल्या शब्दांकडे माझें लक्ष होतें. मला धीर आला. त्यांनीं खरोखरच मला संभाळून पुण्यापर्यंत नेलं. माझी सगळी हकीगत सहानुभूतीनं ऐकून घेतली, आणि तुला कर्व्यांच्या आश्रमांत पोंचवतों असं त्यांनीं मला आश्वासन दिलं.

पुण्याच्या स्टेशनवरून आम्ही एका खानावळींत टांगा करून गेलों. तिथें स्नानजेवण करून दुपारीं हिंगण्यास जाण्याचा आमचा बेत होता. परंतु संस्थेंतील एका प्रचारिकेची व आमची त्या खानावळींतच गांठ पडली. भार्गवरावांनीं माझी सगळी हकीगत त्या बाईंना सांगितली, व आपण माझ्या वडिलांचे स्नेही असल्याबद्दल बतावणी केली. स्त्रियांचीं दुःखें स्त्रियाच जाणतात. त्या बाईंनीं माझ्या वडिलांचा, तुमचा नि भार्गवकाकांचा पत्ता घेतला. आणि मला आपल्या ताब्यांत घेऊन, "मी हिची सगळी व्यवस्था लावतें" असं भार्गवकाकांना सांगितलं. त्यांचा निरोप घेऊन मी त्या बाईबरोबर हिंगण्याला गेलें.

त्या दिवसापासून ह्या घटकेपर्यंत मी संस्थेंत शिकत्यें आहे. संस्थेच्या

लोकांनीं आणि मेट्रन बाईनीं माझा मुलीप्रमाणं संभाळ केला, आणि कुठेंहि शिक्षिकेचं काम करून मानानं आपलं पोट भरीन इतकं सामर्थ्य माझ्यांत आणून दिलं. मला संस्थेनं आश्रय दिला म्हणूनच ना माझ्या अंगीं हें सामर्थ्य आलं ?

मी आतांपर्यंत सुमारें पांच वर्षें इथें आहे. विचारा त्यांना माझ्यांत काय काय गैरवर्तन दिसलं तें ? माझ्या त्या असहाय्य स्थितींत भार्गवकाकांची सहानुभूति आणि आश्रमाचा आश्रय मिळाला नसता तर माझी काय स्थिति झाली असती ?

आपली धर्मपत्नी

विजया

॰ ॰ ॰ ॰

महिलाश्रम वसतिगृह

हिंगणें

१२–३–१९१५

श्रीयुत विश्रामपन्त गोळे यांस,

सा. न. वि. वि.

तुमची आणि सौ. विजयाची आश्रमांतील भेट तितकीशी यशस्वी झाली नाहीं. क्षमेच्या तुमच्या भाषेनं तीहि चिडली आणि तुम्हांलाहि तिच्या उत्तराचा राग आला. म्हणून तुम्ही नागपूरला गेल्यावर शान्त चित्तानं दूरवर विचार करावा आणि सौ. विजयाशीं निदान पत्रव्यवहार तरी सुरू करावा असं मीं सुचवलं. तें तुम्हांला पटलं, याबद्दल मला आनंद वाटतो. परंतु वाईटहि वाटत आहे.

चि. सौ. विजयाच्या अजाणतेपणानं विस्कटलेली तुमच्या संसाराची घडी पुन्हां नीट बसावी असं मला मनापासून वाटतं. तुम्ही दोघेंहि एकमेकांना अनुरूप असून सद्गुणी आहांत परंतु तुमचा पुरुषी मत्सर नि हेका आणि विजयाचा मानी स्वभाव नि शीलाभिमान तुमच्या दोघांच्या पुनर्मीलनाच्या आड येत आहे, असं दोघांमध्यें चालू असलेल्या पत्रव्यवहारावरून दिसत आहे. तुम्ही अशींच एकमेकांचीं उणींदुरीं काढूं लागलांत, तर एकमेकांपासून अधिकच दुरावत जाल, अशी भीति वाटते आणि म्हणून मी हें पत्र लिहीत आहें.

पळपुट्या मुलींना आश्रम तरी आश्रय कसा देतो, असं तुम्ही विचारतां. 'अशा नकळत किंवा अज्ञानानं चुकलेल्या मुलींना सुसंस्कृत आणि स्वावलंबी करून परत पतींच्या घरीं लावून देण्यासाठीं,' हेंच त्याचं उत्तर. तुमच्या-सारख्या शिकलेल्या तरुण मुलांनीं भावनेच्या भरांत बायकोवर रागवून तिला घरांतून घालवून दिल्यावर, आमच्या संस्थेसारख्या संस्थांनीं तिला आश्रय नाहीं द्यायचा तर कोणीं ?

रावजीशीं तिनें जास्त सलगी केली, असं तुम्ही म्हणतां, पण घरांत रात्रंदिवस राहणारा नि हरकाम करणारा शागीर्द तो. त्याच्याशीं सगळ्याच बायका बोलणार. विजया नुकतंच लग्न होऊन सासरीं आलेली मुलगी. सगळींच माणसें तिच्याहून वयानें नि मानानें मोठीं. तिच्या बरोबरीचें कोणीच नाहीं. साहजिकच कांहीं विचारायचं सवरायचं असलं तर ती रावजीलाच विचारणार. तिला काय कल्पना, रावजी तिच्या मोकळेपणाचा असा भलताच फायदा घेईल नि त्याचा परिणाम इतका भयंकर होईल ?

विजया रावजीबरोबर वागे इतकी मोकळेपणानं ती तुमच्याशींहि वागत

नसे, असं तुमचं म्हणणं. पण सासुरवाशीण ती. ती कशी मोठ्या माणसांच्या देखत तुमच्याशीं मोकळेपणानं वागेल ? त्यांतून तुम्ही तशी संधि दिली असती तर वागलीहि असती तशी ती. परक्या कुटुंबांतून तुमच्या घरांत आलेली ती. कोणाशीं कसं वागावं हें तुम्हीं तिला सांगायचं. तिला संभाळून घेणं सगळ्या मंडळींचं काम होतं. कारण ती लहान होती. तुम्ही मोठीं आणि अनुभवशीर माणसं. तेव्हां चूक तुमची जास्त आहे. तिला परत बोलावून आतां तरी ती दुरुस्त करा, असं माझं तुम्हांला आग्रहाचं सांगणं आहे. विचार करा. कळावें.

आपली हितेच्छु

मुख्याध्यापिका

❧ ❧ ❧ ❧

नागपूर
१७–३–१९१५

मुख्याध्यापिकाबाई, महिलाश्रम वसतिगृह, हिंगणें, यांस,

सा. न. वि. वि. आपलें ता. १२ चें पत्र पोंचलें. आपण आपल्या लाडक्या विद्यार्थिनीचीच तरफदारी केलीत आणि दोषाचें खापर आमच्या डोक्यावर फोडलेंत. अजून मी असें म्हणतों कीं, तुमच्या संस्थेनें तिला आश्रय देऊन तिच्या असल्या वागण्याला उत्तेजनच दिलें.

संस्थेंत तिला ठेवून घेतली नसती तर ती चट मुठींत नाक धरून परत घरीं

आली असती. तिच्या वडिलांनीं केलें तेंच तुम्हीं करावयास हवें होतें. बरें, तिला ठेवून घेतलीत, तर ताबडतोब नागपुरास कां नाहीं पोंचती केली ? ती लहान असल्यामुळें तिला संभाळून घ्यावयाचें जर आमचें कर्तव्य होतें, तर ती चुकली असतां क्षमा मागण्याचें कर्तव्य तिचें नव्हतें का ? आमच्या मतें ती चुकलीच होती. रावजी तरी एकदम कसा तिच्या वाटेला जाईल ? त्याचें वागणें तिला आवडत असेल म्हणूनच त्याला तरी इतकें पुढें जावयाचें धैर्य झालें असलें पाहिजे.

म्हणून म्हणतों, तिला पश्चात्ताप होत असला तर तिनें क्षमा मागावयास कां तयार होऊं नये ? मी म्हणून क्षमा करून तरी तिला पुन्हां बाळगावयास तयार झालों आहें. माझ्या ठिकाणीं दुसरा एखादा असता तर केव्हांच दुसरें लग्न करून मोकळा झाला असता. कळावें.

विश्राम गोळे

* * * *

महिलाश्रम वसतिगृह
हिंगणें
२२-३-१९१५

श्री. विश्रामपंत गोळे यांस,

सा. न. वि. वि. अजूनही माझं म्हणणं तुम्हांला पटत नाहीं. संस्थेनें विजयाला ठेवून घ्यावयाची नव्हती असं अजून तुम्हांला वाटतं. आम्हीं तिला घालवून दिली असती तर ती तुमच्याकडेच परत गेली असती कशावरून ? स्वतःला अन्याय झालेला आहे असें समजणारें तिचें मानी मन लाचारी पतकरण्यास तयार झालें नसतें. एकतर तिनें जिवाचें कांहीं

तरी बरेंवाईट केलें असतें किंवा ती कोणाच्या तरी जाळ्यांत सांपडली असती. कल्पना करा, अशा अल्पवयी सुंदर मुलीला अशी वाऱ्यावर हिंडतांना पाहून कोणी तरी फूस लावून नेली असती तर ती आजच्या परिस्थितींत दिसली असती का ? ती कुमार्गाला गेली नसती कशावरून ? ती तशी गेली असती, तर त्याला जबाबदार कोण ? तें पाप तुमच्या माथींच होतं.

तुमच्यासारख्या शिकल्या-सवरलेल्या नि शाहण्यासुरत्या माणसांनीं तरी हें पाप पदरीं घेतां कामा नये. स्पष्ट लिहितें म्हणून राग मानूं नका, परंतु तुम्हां तरुणांच्या असल्या अविचारी नि बेजबाबदार वर्तनामुळेंच एखाद्या वेळीं चुकलेल्या मुली अधिकाधिक घसरत जातात. कारण आपला समाज त्यांना चूक सुधारायला संधीच देत नाहीं. इतकंच नाहीं तर तो त्यांना तुच्छ आणि तिरस्करणीयच लेखतो व दूर सारतो.

तेव्हां तुम्ही तरी विजयाला दूर लोटूं नका. तुमच्या मतांप्रमाणें ती जरी चुकली असली तरी तुम्ही तिला चूक सुधारण्याची, किंवा तिच्या म्हणण्याप्रमाणें म्हणजे ती चुकलीच नव्हती अशी तुमची खात्री पटविण्याची संधि द्या. आतांपर्यंतच्या तिच्या येथील वागणुकीवरून मी खात्रीनें सांगतें, ती तुमचं जीवन सुखी करील. तिच्या वर्तनाबद्दल मी हमी घेतें. जसं कांहीं मागें घडलंच नाहीं असं समजून तिचा स्वीकार करा. तिलाही मी हेंच सांगेन. त्या बाबतींत यापुढें दोघांनीं अगदीं ‘अळीमिळी’ घाला. कळावें.

आपली हितेच्छु

मुख्याध्यापिका

महिलाश्रम वसतिगृह
हिंगणें
२०-४-१९१५

श्रीयुत विश्रामपंत गोळे यांस,

सा. न. वि. वि. महिना होत आला तरी माझ्या पत्राचं उत्तर आलं नाहीं. तेव्हां माझं लिहिणं बहुधा तुम्हांला पटलं तरी नसावं. किंवा त्यावर विचार करायला तितका वेळ तरी मिळाला नसावा. मीं भार्गवरावांना पत्र लिहून तुम्हांला भेटायला सांगितलं आहे. ते नुकतेच पुण्यांत येऊन आम्हांला भेटून गेले. आमच्या दोघांच्यासमोर विजयेनं तुमच्याकडे जायची आपली तयारी असल्याचं सांगितलं. तिनं आणखी असंहि सांगितलं, "त्यांनीं माझ्या वागण्यांत यापुढें चूक दाखवून द्यावी. खरीच माझी चूक असली तर त्यांचे मी पाय धरीन. मात्र विश्वास बाळगून त्यांनीं मला न्यावी, आणि माझं शुद्धत्व सिद्ध करण्याची संधि द्यावी." तेव्हां आतां माझं तुम्हांला सांगणं येवढंच आहे कीं तुम्ही तिला घेऊन जा. त्यांत तुमचं दोघांचंही कल्याण आहे. कळावें.

तुमची हितेच्छु

मुख्याध्यापिका

✻ ✻ ✻ ✻

नागपूर
२५-४-१९१५

सन्मान्य मुख्याध्यापिकाबाई यांस,

सा. न. वि. वि. आपलीं दोन्हीं पत्रें पोंचलीं. प्रथम आपला गैरसमज दूर करतों. आपण मला जें पत्र लिहिलंत, तें केवळ पुरुष जातीला शिव्या

देण्याकरतां नसून माझ्या कल्याणाच्या चार गोष्टी सांगण्यासाठींच लिहिलंत, हें मी जाणतों. मी पंधरावीस दिवस बराच आजारी असल्यामुळें पत्राचें उत्तर देण्यास विलंब लागला. पत्रांतल्या बऱ्याचशा गोष्टी मला पटल्या आहेत. मीं आपल्या पत्रावर विचार केला. भार्गवरावहि मला भेटून गेले. त्याला आठ दिवस झाले. त्यांनींही आम्हां तरुणांची बरीच कानउघाडणी केली. पूर्ण विचाराअन्तीं मीं सौ. विजयाला घेऊन जाऊन तिला हवी असलेली संधि देण्याचं ठरवलं आहे. आणि तेंही तिच्या म्हणण्याप्रमाणें वेगळं बिऱ्हाड करून. माझी खामगांवला बदली झाली आहे. भार्गवराव तिकडे येत आहेत. तरी शाळेला सुटी होतांच ते च तिला खामगांवला घेऊन येतील. मी मेच्या पहिल्या तारखेला तिथल्या कामावर रुजू होणार आहें. पत्रोत्तर यावें. कळावें.

आपला

विश्राम गोळे

खामगांव

५-५-१९१५

ती. स्व. बाईंना सा. न. वि. वि.

आपला आशीर्वाद घेऊन निघालें ती खामगांवला सुखरूप येऊन पोंचलें. घरांत पाऊल टाकतें, तों सगळं बिऱ्हाड झकपक लावलेलंच नजरेला पडलं. जसं कांहीं चार सहा महिने झाले आहेत त्यांना या घरांत राहायला येऊन ! संसाराला लागणारं सगळं सामान घरांत असून तें नीटनेटकं लावलेलं होतं. सगळे जिन्नस निवडून टिपून डब्या-बाटल्यांतून भरलेले. मला कांहींच करावं लागलं नाहीं. फक्त वेणी

आंगधुणं करून सैंपाकाला लागणंच उरलं होतं. ह्यांनीं आमचं स्वागत तर हंसऱ्या चेहऱ्यानं केलं. आरंभ तर ठीक झाला आहे नव्या संसाराला. सविस्तर पत्र सवडीनं लिहीनच. कळावें, लोभ असावा, ही विनंती.

आपली विद्यार्थिनी
विजया

❧ ❧ ❧ ❧

खामगांव
९-९-१९१५

ती. स्व. बाई यांस सा. न. वि. वि.

माझ्या सविस्तर पत्राची तुम्ही वाट पहात असाल हें मनांत येत असूनहि तें काम लांबणीवर पडलं, पण लिहिण्यासारखं विशेष असं पहिल्या एक दोन महिन्यांत कांहीं घडलंच नाहीं. मी आपल्याकडून अतिशय काळजीपूर्वक तुमचा 'अळीमिळीचा' उपदेश डोळ्यांपुढें ठेऊनच वागत असतें. तेहि तसंच वागतात, हें सांगायलाहि मला अभिमान वाटतो. आतां हळूहळू सासरचीं एक एक माणसं कांहीं ना कांहीं कामानिमित्त खामगांवला येतात. आणि नवल म्हणजे तीं आमच्याकडे मुक्काम ठोकतात. मी या सर्वांचं मनापासून सगळं काम करून सगळी व्यवस्था सासुरवाशिणीला शोभेल अशीच ठेवीत असतें. त्यामुळें हे माझ्यावर खूष असतात, व ह्यांना तर अलीकडे मित्र मंडळी बोलावून त्यांना चहापार्ट्या देणं, आणि उलट त्यांच्याकडे जाऊन त्या घेणं ह्या कार्यक्रमापुढें कांहीं सुचेनासें झालें आहे. मला घेतल्याशिवाय मात्र एकाहि पार्टीला जात नाहींत. तसंच मधून नाटक-सिनेमासारखे कार्यक्रमहि होत असतात आमचे. अलीकडे मला जरासं बरं नाहीं, तर 'बाई ठेवूं का स्वैंपाकाला,' असं विचारतात, परंतु

'बाई नको नि बुवा नको,' असं मी हंसत हंसत उत्तर देतें. तेव्हां तेहि हंसतात. असो, एकंदरींत माझ्या आयुष्याचं नाटक सुखपर्यवसायी होणार या आनंदांत मी आहें. हें नाटक आनंदपर्यवसायी करायला कारणीभूत झालेल्या माणसांनीं यायला नको का माझ्या घरीं ? तुम्ही म्हणालां होतां, "मी येईन तूं कसा काय संसार करतेस तें बघायला." सुटींत आलें पाहिजे चार आठ दिवस तरी. कळावें, ही विनंती.

आपली
विजया

खामगांव
४–१०–१९१५

सन्मान्य मुख्याध्यापिका यांस सा. न. वि. वि.

आपलं सौ. विजयाला आलेलं पत्र मीं वाचलं. 'शेवटीं आपल्या कर्तबगारीनं नि वागवणुकीनं तूं विश्रामवर विजय मिळवलास, तूं आपलं 'विजया' नांव सार्थ केलंस. शाबास!' या गौरवपर शब्दांनीं तिचं अभिनंदन केलंत. हेवा वाटतो मला विजयेचा. बाकी आपण काय खोटं लिहिलंत ? खरंच, विजयेनं माझ्यावर मोहिनी टाकून विजय मिळवला आहे. आपल्याला तिची बरोबर परीक्षा झाली! मुलींचं मन नि स्वभाव माताच जाणतात. आपण तिचा खरोखरच मुलीप्रमाणं संभाळ केलात. आपल्यासारख्या रत्नपारख्या स्त्रीनं माझी पाठ पुरवली नसती तर हें रत्न मला लाभलं नसतं. तेव्हां माझं हरपलेलं रत्न मला मिळवून दिलंत, तें आपणच. हें मी कधींच विसरणं शक्य नाहीं. आपल्यासारख्या संस्थांची आणि संस्थाचालकांची आम्हां तरुणांना ताळ्यावर आणायला फार जरूर आहे.

अरे हो, आपल्या कृतज्ञतेचं पुराण लिहिण्याच्या भरांत मीं मुख्य ज्या गोष्टीकरतां पत्र लिहावयास घेतलं, ती मी अजीबातच विसरत चाललों. ती गोष्ट म्हणजे विजयेचं निमंत्रण स्वीकारून आपण येत्या दिवाळीच्या सुटींत दिवाळीसाठीं इकडे आलं पाहिजे. मी माझ्या सासऱ्यांना व आईवडिलांनाहि बोलावणार आहें. ही आमची आनंदाची पहिली दिवाळी सर्वांनीं साजरी करावी अशी आमची दोघांची इच्छा आहे. त्या आनंदांत आपणहि वांटेकरी व्हावं, या उत्कट इच्छेनंच आपणांस आमचं आग्रहाचं निमंत्रण आहे. रा. रा. भार्गवरावांनाहि बोलावलें आहे. कळावें, लोभ असावा ही विनंती

आपला

विश्राम गोळे

९८५२२
कथा
४३३

८

# अनपेक्षित भाग्य

आज मीं अगदीं सुखाचें नि ऐश्वर्याचें उच्च शिखर गाठलें, असेंच मला वाटलें. आणि तसें कां नाहीं वाटणार? समाजांत मानाचें स्थान मिळवून देणारें, नि स्वावलंबी बनवणारें शिक्षण मला मिळालें; इतकेंच नाहीं, तर सुसंपन्न, सद्‌गुणी नि श्रीमान् पतीच्या लाभानें माझ्या एकाकी, नीरस जीवनाला जणूं नवी पालवी फुटली. स्त्रियांना आणखी काय हवें असतें? आपल्या जिवाला जीव देणारा, आणि आपल्यावर अलोट प्रेम करणारा असा जोडीदार मिळणें, हें भाग्यच नाहीं का? असलें भाग्य कधीं काळीं आपल्या वांट्याला येईल, असें स्वप्नांत देखील मला वाटलें नव्हतें! तें भाग्य महाभाग कर्वे यांच्या अनाथबालिकाश्रमानें मला आणून दिलें. धन्य तो आश्रम!

मी आश्रमांत आलें त्यावेळचें तें माझें दैन्य, नि आतांचें हें वैभव! दोहोंत जमीन अस्मानाचें अंतर! दोन्ही हेवा करण्यासारखींच वाटतात

मला. कारण असें दैन्यहि कोणाला मिळायचें नाहीं नि असं वैभवहि फारच थोड्यांच्या वांट्याला येतें.

तो दिवस माझ्या आठवणींतून जाणेंच शक्य नाहीं. कुठें मद्रास ? कुठें पुणें ? परंतु माझे वडील पुण्याच्या आश्रमाचा पत्ता काढीत शेंकडों मैल आले. कशाला ? तर आपल्या तेरा चौदा वर्षांच्या विधवा मुलीला कर्व्यांच्या स्वाधीन करून काशीयात्रेला जायला. माझी आईहि आमच्या बरोबर होती. पुण्याच्या स्टेशनवर आम्ही उतरलों; जिकडे तिकडे अफाट मैदान दृष्टीस पडलें. त्या मैदानांत पन्नास साठ टांगे उभे दिसले. आम्ही मद्रासमधल्या खेड्यांतलीं माणसें. गाड्या घोडे कधीं मधीं दिसायचे. आतां मला माझ्या अज्ञानाचें हंसू येतें. पण त्यावेळीं वाटलें कीं, साहेबांचा देश म्हणतात तो हाच कीं काय ? आम्हीं आपलीं कावऱ्याबावऱ्यासारखीं चोहींकडे पहात उभीं राहिलों. स्टेशनवर टांगेवाले बोलत होते, त्यांतलें एक अक्षर समजेल तर शपथ ! कारण आमची भाषा तामीळ. मी तर ‘ आ ’ वासून आश्चर्यानें जिकडे तिकडे पाहूं लागलें. ती टांगेवाल्यांची धांवपळ, नि ती गिऱ्हाइकांची भाडें ठरविण्याची गडबड मोठी मनोरंजक वाटली मला, तशाहि असहाय्य स्थितींत. माझे वडील, ‘ आतां काय करावं, हमाल करावा कीं टांगा ठरवावा ? ’ या विचारांत उभे होते. इतक्यांत त्यांच्या भोंवतीं चार पांच टांगेवाले जमले. आमचें लहानसें गाठोडें पाहून चार पांच हमालहि आले असावेत. परंतु ते काय विचारतात, तें कोणाला समजत होतें ? ‘ हिंगण्याऽ, हिंगण्याऽ, कर्वाऽऽऽ ’ इतकेच शब्द माझे वडील उच्चारीत होते.

पुण्याचे टांगेवाले किती चाणाक्ष ! ‘कर्वा’ हे शब्द ऐकतांच ‘ बोडक्यांचा बंगला का ? ’ असें त्यांतल्या एका टांगेवाल्यानें विचारलें असावें. ( कारण याच अभद्र नांवानें सारे टांगेवाले त्यावेळीं आश्रमाला ओळखीत

असत. ) परंतु आम्हांला त्या शदबंचा कांहींच बोध होईना, असें पाहून तो आमचें गाठोडें उचलूं लागला. इतक्यांत माझ्या आईनें तें झटकन् काखोटीला मारलें नि तें घट्ट धरून ती उभी राहिली. पुन्हां आपलें वडलांचें ' हिंगण्या ऽ ' 'कर्वा ऽऽ' असें बडबडणें चाललेंच होतें. दुसरा एक इसम जवळच उभा होता. त्यानें एका टांगेवाल्याला काय सांगितलें कोणास ठाऊक. पण टांगेवाल्यानें ' हिंगणें हिंगणें ' असें म्हणून आम्हांला टांग्यांत बसण्याची खूण केली, नि आम्हीहि टांग्यांत बसलों. कित्ती वेळचा टांगा चालत होता. दुतर्फा शेतें, झाडें नि डोंगर पाहून 'कुठल्या रानांत तर नाहीं ना हा आपणांस नेऊन सोडीत ' असें मनांत येऊन आई कुरकुरत होती. पण गप्प बसण्यापलीकडे काय करायचें होतें ? साधारण तासाभऱ्यानें आमचा टांगा एका इमारतीच्या दाराशीं थांबला. टांगेवाला म्हणाला, ' ही हिंगण्याची शाळा. '

तो रविवारचा सुटीचा दिवस असावा. आमचा टांगा कचेरीसमोर येऊन उभा राहिला. संस्थेचा शिपाई पुढें येऊन वडिलांना ' कोण पाहिजे ? ' वगैरे विचारूं लागला. पण ते नुसते ' कर्वा ऽऽऽ, आश्रम ऽऽऽ ' असं हेल काढून म्हणण्यापलिकडे कांहींच बोलले नाहींत. शिपायानं त्यांना व्हरांड्यांत बसण्यास खुणाविलें आणि तो मुख्याधिकाऱ्यांस बोलावण्यास गेला. ' हीं कोण सोंगं आलीं ? ' अशा प्रश्नार्थक चर्येनें कांहीं मुली खिडक्यांतून आमचेकडे टकमक पहात होत्या. आश्रमांतून विद्यालयांत, नि विद्यालयांतून आश्रमांत ( हीं दोन वसतिगृहें ) खेपा मारणाऱ्या भटक्या मुलीहि आमच्याकडे चमत्कारिक नजरेनें पहात होत्या. कांहींची करपल्लवी, तर कांहींची नेत्रपल्लवी चालू असावी. मला तर अगदीं बुजल्यागत नि लाजल्यागत झालं. 'अशा कां या मुली आमच्याकडे पहाताहेत ? ' असं मनांत येऊन मला त्यांचा रागहि आला.

दहा पंधरा मिनिटांनीं एक मध्यम वयाच्या बाई नि एक पोक्त वयाचे गृहस्थ कचेरीकडे आले. सुदवानें आमचं तामीळमिश्रित मोडकें तोडकें कानडी त्यांना समजत होतें. त्यामुळें माझ्या वडलांना बराच धीर आला. त्यांनीं आपली सगळी करुण कहाणी या गृहस्थांना सांगितली. " एकुलता एक कर्तासवरता मुलगा प्लेगच्या भक्ष्यस्थानीं पडला ! मुलीच्या लग्नाला वर्ष देखील झालें नाहीं, तोंच जांवई रेल्वे अपघातांत सांपडून मृत्युमुखीं पडला ! आणि ही ( मी स्वतः ) पोरगी घरीं आली. तिचें नशीब फुटलें ! आमच्यावर आकाशींची कुऱ्हाड पडली ! आश्रमचें नांव ऐकलें आणि आश्रयासाठीं इकडे धांव घेतली. जवळ विष खायला देखील पैसा नाहीं. शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून प्रवासापुरते पैसे घेतले आणि पुणें गांठलें. ही मुलगी पदरांत घ्या म्हणजे आम्ही दोघं काशीयात्रेला निघून जाऊं. "

ही हकीगत ऐकून त्या गृहस्थांचा चेहरा गंभीर झालेला दिसला, बाईंचे डोळे पाण्यानें भरून आले ! अर्थात् मला तिथें ठेवून घेण्याचें त्या दोघांनीं आश्वासन दिलें. एक दोन दिवस राहून, माझी सगळी सोय लागली असें पाहून आई नि वडील निघून गेलीं तीं गेलीं; त्यांची व माझी ती शेवटचीच भेट ठरली.

मी एकटी राहिलें. मला रडूं कोसळलें ! दोन पातळें नि दोन चोळ्या यांखेरीज माझ्याजवळ कांहींच सामान नव्हतें. तरीहि मुख्य बाईंनीं माझी सगळी सोय केली. जुनींच कां असेनात, पण लुगडीं, चोळ्या पोलकीं व हांतरूण पांघरूण दिलें. तसेंच मला एकटें एकटें वाटूं नये म्हणून मोडकें तोडकें कानडी येत असलेल्या मुलींच्या स्वाधीन मला केलें. थोड्याच दिवसांत मला कारणापुरतें मराठी समजूं लागलें. बऱ्याच मुलींशीं ओळख झाली. त्यांच्या मदतीनें मी मराठी लिपीचाहि अभ्यास केला; त्यामुळें वर्गांतहि माझें जमूं लागलें.

आश्रमांत पुष्कळ विधवा मुली होत्या, त्यांतील बऱ्याचजणी माझ्या वयाच्या होत्या. त्या सर्व आनंदी नि मनमोकळ्या वागणाऱ्या होत्या. त्यामुळें माझी वृत्तीहि आनंदी बनत चालली व घरची परिस्थिति मनाआड होऊं लागली; कारण 'ही विधवा, फुटक्या नशिबाची, नवऱ्याला निर्दाळून बसली,' इत्यादि मागासलेल्या खेडवळ बायकांप्रमाणें इथें कोणीच मला बोलत नव्हतें. उलट सगळ्या बायकांनीं आपल्या पायावर उभें राहावें, पुरुषांप्रमाणें स्वावलंबी व्हावें अशीच शिकवण आम्हां मुलींना पावलोपावलीं मिळे. 'विधवा म्हणजे सगळ्या नातेवाइकांची गुलाम' या वृत्तीचा नायनाट करून त्यांना शिकवून स्वावलंबी करावें, याच हेतूनें या आश्रमाची स्थापना झाली असल्यामुळें मुलींना हीच शिकवण मिळत राही. अशा या वातावरणांत राहायला गेल्यामुळें मलाहि पुष्कळ हुरूप वाटूं लागला. मी शिकेन, पैसे मिळवीन, नि माझ्या आईवडलांनाहि मदत करीन. माझं आयुष्य मातीमोल नाहीं, या नव्या स्फूर्तिदायक विचारांचा उद्भव माझ्या मनांत झाला. समाजांत मी एक स्वावलंबी कर्तासवरती स्त्री होणार, या हिरीरीनें मी अभ्यासाला लागलें. पांचसहा महिन्यांच्या काळांतच मी आश्रमांतल्या राहणीला इतकी सरावलें कीं आश्रम व येथील सर्व मंडळी मला आपल्या नातेवाइकांप्रमाणेंच वाटूं लागलीं.

दिवसेंदिवस अभ्यासांत माझी प्रगति चांगलीच होत होती. तीनचार वर्षांत माझें शिक्षण मराठी सात इयत्ता व इंग्रजी तीन इयत्तांपर्यंत झालें. वर्गातील परिक्षांत माझाच नेहमीं उच्चांक असावयाचा. मराठी भाषा देखील उत्तम प्रकारें येऊं लागलेली पाहून सर्व शिक्षकांना माझें कौतुक वाटत असे. मला माझ्या हुशारीबद्दल नि होतकरू नि गरीब विद्यार्थिनी, म्हणून बरींच बक्षिसें वार्षिक संमेलनाच्या वेळीं मिळूं लागलीं. ही माझी प्रगति ऐकून माझ्या आईवडिलांना धन्यता वाटली. ती त्यांनीं पत्रानें मला कळवली. प्रथम जरी त्यांनीं मला सहासात महिन्यांत लिहिलें नाहीं तरी मीं मात्र त्यांना

दर महिन्याला माझी खुशाली कळवावी अशी त्यांची इच्छा असल्यानें पत्र लिहीत असें. आतां मला त्यांचीं उत्तेजनपर पत्रें येऊं लागलीं होतीं. त्यांनीं एका पत्रांत लिहिलें होतें, "पोरी आतां आम्हांला तुझी काळजी नाहीं. तूं खात्रीनं चार घांस सुखानें खाण्याइतका पैसा मिळवशील. आतां आम्ही सुखानें मरूं' वगैरे.

अशा रीतीनें आश्रमांतील माझा जीवनक्रम चालू होता. सातवीच्या सरकारी परीक्षेला बसावयाचें म्हणून जोरांत अभ्यास चालू होता. इतक्यांत एक दिवस आमच्या बाईंनीं मला आपल्या खोलीवर बोलावून घेतलें. त्यांनीं विचारलें "तूं पुढें काय करणार आहेस ? शिक्षकीण होणार कीं दुसरं काम करणार ?"

"शिक्षकिणीपेक्षां दुसरं काय मी करूं शकणार ?" मी म्हणालें.

"नर्सिंग शिकायची आहे का तुझी तयारी ?"

"पण मला इतकं इंग्रजी कुठं येतंय् ?"

"डॉ. कर्वे, आपल्या अण्णासाहेबांचे चिरंजीव, ते तुला आफ्रिकेंत नेऊन नर्सिंगचें शिक्षण देण्यास तयार आहेत. त्यांचं तिथं हॉस्पिटल आहे; तिथेंच ते तुला नौकरी देतील. पगार चांगला मिळेल. शिक्षणाची सगळी जबाबदारी ते घेतील. पहा विचार कर, तुझी तयारी असली तर आईवडलांना मी विचारतें पत्र पाठवून."

या बाईच्या सूचनेनें माझ्या मनांत क्षणभर विचारांचें काहूर उसळलें. पण मीं शांतपणानें दोनतीन दिवस विचार केला. मैत्रिणींशीं बोललें नि आलेल्या संधीचा फायदा घ्यायचा निश्चय केला. "अग तूं किती नशीबवान् म्हणून तुला आमच्या अण्णांच्या मुलाच्या हॉस्पिटलमध्यें शिकण्याची संधि प्राप्त झाली. ही गमावूं नकोस" माझी एक मैत्रीण म्हणाली.

झालें! मीं जाण्याचें ठरविलें. बाओींनीं वडिलांची परवानगी मागविली. वडिलांनीं भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. पण पंधरा दिवसांतच जायचें असल्यानें तें जमलें नाहीं. डॉ. कर्वे व त्यांच्या पत्नी हिंगण्यास आल्यावर बाईनीं त्यांची व माझी ओळख करून दिली. डॉक्टरांनीं, मीं आनंदानं त्यांच्याबरोबर जाण्यास तयार आहे ना? नर्सिंगचें काम मला आवडतें का? काम घाणेरडें व मेहनतीचें आहे, तें मला करायला आवडेल नि झेपेल का? वगैरे प्रश्न विचारले. मीं दिलेल्या उत्तरांनीं ते खूष झालेसे दिसले.

ठरल्याप्रमाणें पंधरा दिवसांनीं मीं हिंगणें सोडलें. तें सोडतांना मला फार वाईट वाटलें. माझ्या मैत्रिणींतून मी आतां हजारों मैल दूर जाणार या विचारानें माझें हृदय भरून आलें. पाण्यानें डबडबलेल्या डोळ्यांनीं नि जड अंतःकरणानें मीं सर्वांचा निरोप घेतला. आम्ही पुण्याहून मुंबईस आलों व आठ दिवसांनीं आफ्रिकेला जाणाऱ्या बोटीवर चढलों.

मद्रासहून पुण्याला येतांना मी पहिल्यानेंच आगगाडींत बसलें होतें, नि आतांहि पहिल्यानेंच बोटींत बसणार होतें. माझ्या मैत्रिणींच्या तोंडून मीं कोंकणांत जाणाऱ्या बोटीचें वर्णन ऐकलें होतें. बोटीवरील प्रवाशांची, बोट लागल्यामुळें ओकून ओकून कशी त्रेधातिरपीट उडते, याचें रसभरित वर्णन माझी एक कोंकणची मैत्रीण करीत असे. मला वाटलें आपल्यालाहि असाच त्रास बोटींत होणार. आणखी प्रवास तरी एकदोन दिवसांचा का होता? दहा बारा दिवस काढायचे होते बोटीवर. परंतु प्रत्यक्ष अनुभव अगदीं निराळाच आला.

आफ्रिकेची बोट म्हणजे सगळ्या सुखसोईंनीं युक्त असलेलें असें एक लहानसें गांवच होतें. आपल्या घराप्रमाणें सगळ्या दिवसाचा कार्यक्रम करतां

येत होता तिथें. खेळणें, फिरणें हेंही बोटीवर जमत होतें. जेवणें खाणें, चहाफराळ, मेजवान्या, सर्व कांहीं घरच्याप्रमाणें व्हायचें. तेव्हां या प्रवासाचा त्रास आम्हांला मुळींच झाला नाहीं म्हटलें तरी चालेल. पहिले दोन तीन दिवस मला एकटें एकटें वाटलें परंतु नंतर डॉक्टर व त्यांच्या पत्नी यांच्या प्रेमळ नि बोलक्या स्वभावामुळें माझा परकेपणा निघून गेला. त्यांच्या मुलांची नि माझी दोस्तीहि चांगलीच झाली. त्यांची आंघोळ, जेवणखाण, पोशाख, वगैरे आतां मीच करूं लागलें. अशा रीतीनें माझा वेळ चांगला जाऊं लागला.

योग्य वेळीं आम्ही आफ्रिकेंत जाऊन पोंचलों. आफ्रिकेंत माझें राहणें वगैरेची सोय डॉक्टरांच्याच घरीं व्हायची ठरली असल्यामुळें मला यापुढें कसलीच काळजी करण्याचें कारण नव्हतें. आठ दिवसांनीं मी माझ्या कामावर रुजू झालें. प्रथमचे सहा महिने शिकाऊ उमेदवार म्हणूनच मी काम करूं लागलें. नर्सिंगचें काम म्हणजे सगळ्या रोग्यांची — पुरुष स्त्रियांची — सगळ्या प्रकारची शुश्रूषा करायची. घाणेरडें नि किळसवाणें काम. पहिल्या पहिल्यानें तर मला असलें घाणेरडें काम करून घरीं गेलें नि किती स्वच्छतेनें स्नान वगैरे उरकलें तरी जेवण जात नसे. चार सहा महिन्यांनीं सगळी संवय झाली.

डॉक्टरांची काम शिकविण्याची नि तें करून घेण्याची पद्धत नि माझी मेहेनत यामुळें मला माझ्या कामांत गोडी वाटूं लागली. मी सहा महिन्यांत डॉक्टरांच्या कल्पनेपेक्षां बऱ्याच जास्त गोष्टी शिकलें. माझ्या नियमितपणावर, टापटिपीवर नि शिस्तवार कामावर डॉक्टर खूष झाले. त्यांनीं सहा महिन्यांनींच पगार सुरू केला. अशा रीतीनें वर्षांत माझा नर्सिंगचा शिक्षणक्रम मात्र संपूर्णपणें पुरा झाला. परिक्षा झाल्या. शिफारसपत्रें मिळालीं. आणि मी एक नर्स म्हणून मोठ्या पगारावर डॉक्टरांच्या बाळंत-

पणाच्या हॉस्पिटलवर काम करूं लागलें. आतां मी स्वतंत्रपणानें वेगळें राहायचें ठरविलें व त्याप्रमाणें हॉस्पिटलमध्येंच नर्सेसकरितां बांधलेल्या खोल्यांत राहूं लागलें.

आफ्रिकेंत गेल्यावर मला माझ्या वडिलांचीं दोन तीन वेळांच पत्रें आलीं. त्यानंतर आलीं नाहींत. माझीं पत्रें त्यांना जात, पण उत्तराची वाट पाहून पाहून मीहि मग वरच्यावर त्यांना लिहीनाशी झालें. मला पगार मिळायला लागल्यावर पहिल्या पगाराचे पैसे मीं त्यांना पाठविले होते. त्यांची पोंच आली. तेंच त्यांचें शेवटचें पत्र. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें, ' तुझे पैसे मिळाले. पुत्रजन्माइतका आनंद वाटला. पुत्राचें कर्तव्य केलंस म्हणायचं. आमची काळजी करूं नकोस. तुझ्या लिहिण्याप्रमाणें आम्ही माधुकरी मागण्याचें सोडून देऊं. आतांपर्यंत आम्हांला दुसऱ्यांनीं भिक्षा वाढली. आतां आम्ही गोरगरिबांना मदत करूं. ' यानंतर माझ्या कोणत्याच पत्राला त्यांच्याकडून उत्तर मिळालें नाहीं. ' मालक नाहीं ' असा शेरा मारलेली मनिऑर्डरही परत आली ! काय झालें त्यांचें देव जाणें.

नर्सिंगचा धंदाच असा आहे कीं त्यामुळें अनेक श्रीमंत गरीब स्त्री पुरुषांच्या गांठीभेटी पडतात आणि ओळख-परिचय वाढतो. त्यांतून मी डॉक्टरांकडे राहिलेली, त्यांच्याच हॉस्पिटलमध्यें काम करणारी आणि डॉक्टरांचें इथें केवढें तरी नांव नि कीर्ति. मग माझा मोठमोठ्या लोकांशीं परिचय होण्यास काय कठीण ? पुष्कळ वेळां डॉक्टर व त्यांच्या पत्नी यांच्याबरोबर मी सभा–संमेलनें नि चहा–पार्ट्या नि मेजवान्यांना जात असें. अशाच एका मेजवानीच्या प्रसंगी डॉक्टरांनीं माझी नि श्रीयुत ठाकोर यांची ओळख करून दिली. माझी हुषारी, कामांतील तत्परता यांचें त्यांनीं केलेलें वर्णन ऐकून ठाकोरांनीं माझें कौतुक केलें. मलाहि त्यांच्याबद्दल, कां कोण

जाणें, एक प्रकारचा आदर आणि आपलेपणा वाटूं लागला. आणि मी त्यांना हॉस्पिटल पाहण्यास बोलावणें केलें.

दिवसेंदिवस ठाकोरांचा नि माझा परिचय वाढत चालला. चार आठ दिवसांनीं तरी एकमेकांना भेटल्यावांचून आम्हांला चैन पडेनासें झालें. आमच्या स्नेहाचें रूपांतर प्रेमांत झालें. ठाकोरांनीं मला मागणी घातली. अर्थात् मीं ती स्वीकारली. परंतु हें सगळें डॉक्टरांच्या कानांवर कसें घालावें ? ते मला काय म्हणतील ? मी करतें ही चूक होईल कीं काय ? मीं आश्रमचें अन्न खाल्लें. मला आश्रमचें ऋण नको का फेडायला ? माझ्या आईवडिलांना कळलें तर काय वाटेल ? अशा प्रकारचे अनेक खळबळकारक विचार माझ्या डोक्यांत घोळत होते. वरकरणी नेहमींप्रमाणें मी शांत दिसलें तरी मनांतली ही चलबिचल डॉक्टरांच्या तरी नजरेंतून सुटण्यासारखी नव्हती. त्यांनीं यापूर्वींच या गोष्टीचा कयास बांधला होता. परंतु मी विचारीपर्यंत आपण तिकडे कानाडोळा करावा असें ठरविल्याप्रमाणेंच ते वागत होते. अशा परिस्थितींत एक महिना होऊन गेला तरी मी कांहींच बोलत नाहीं असें पाहून त्यांनीं होऊनच तो विषय काडला. अर्थात् मग टाळाटाळी करणें मला शक्यच नव्हतें. मीं सगळें त्यांना सांगितलें. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, डॉक्टरांनींच आमच्या लग्नाची जबाबदारी घेतली. आणि मला मुलगी मानून मोठ्या थाटांत आमचा विवाहसमारंभ घडवून आणला. मला कितीं धन्यता वाटली म्हणून सांगूं ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
क्र. ९८५२२
विभाग
नों. दि. ११. ५. ३३

# ९

# " आतां काय तूं शिकणार ! "

तास संपवून ताई वर्गांतून बाहेर पडल्या त्या थेट आपल्या खोलीकडे जायला निघाल्या होत्या इतक्यांत नारायणराव आणि विनायकराव त्यांच्या समोर आले, आणि " ताई आपटे आपणच का ? " असा प्रश्न त्यांनीं ताईंना केला. त्यांनीं ' होय ' असें उत्तर देतांच नारायणराव म्हणाले, " आपल्याशीं कांहीं काम आहे. "

खोलीचें दार उघडून ताई आंत गेल्या. त्यांनीं बाजूच्या दोन खुर्च्या पुढें सरकवल्या. दोघांना तिथें बसायला सांगून त्या आपणहि एका खुर्चीवर बसल्या. आणि म्हणाल्या, " हं, काय काम आहे आपलं माझ्यापाशीं ? "

विनायकराव—अंबाक्का दामले म्हणून कोणी आपल्या मुलीला घेऊन इथें आल्या आहेत ना ? किती दिवस झाले त्यांना येऊन !

ताई — होय, आल्या आहेत. झाले आठ दिवस. कां ?

नारायणराव — एवढी मोठी तुमची नांवाजलेली सार्वजनिक संस्था. तुम्ही तींत एक जबाबदार स्त्री म्हणून काम करतां, आणि पळवून आणलेल्या आमच्या भावजईला आश्रय देतां ! शोभतं कां हें तुम्हांला ? फिर्याद कां करूं नये तुमच्या संस्थेवर या गुन्ह्याबद्दल ?

ताई — आपला गैरसमज झालेला दिसतोय् कांहीं तरी. अंबाक्का माझ्या पाहुण्या आहेत. मीं संस्थेंत काम केलं तरी माझं घर वेगळं आहे इथें. आपल्याकडे येणाऱ्या बहिणीला मी घालवून देऊं ? दुसरं मी असं विचारतें तुम्हांला, कीं त्यांनीं यमुनेला पळवून आणली, हें तुम्हांला कसं समजलं ?

विनायकराव — अहो परवांच्या दिवशीं त्या यांच्याकडे आल्या होत्या, तेव्हां मागून त्यांनीं सांगितलं यांना, कीं 'यमुनेला आश्रमांत शिकायला ठेवायचा बेत आहे, म्हणून !' परंतु पहिल्यांदा 'मी यमुनेला मुंबईस मामांकडे घेऊन जातें आठ दिवस,' असं खोटं सांगून तिचं सामानसुमान घेऊन त्या बाहेर पडल्या. हें पळवून आणणं नाहीं तर काय ?

नारायणराव — आणि त्या निघाल्या त्या आपल्याकडे आल्या !

ताई — त्या तुमच्या घरांतून पळून, कीं कशा नि कां निघाल्या हें मला काय माहीत ? यमुनेची शिकण्याची इच्छा आहे तेव्हां कसं काय करावं, या विचारांतच आहेत त्या अजून.

नारायणराव — त्यांनाच विचारा, मीं घरीं नसतांना खोटी थाप मारून आमच्या बायकोला सांगून यमुनेला घेऊन त्या निघाल्या कीं नाहीं तें ?

सैंपाकघरांत बसलेल्या यमुना आणि अंबाक्का हें संभाषण ऐकत होत्या. अंबाक्कांना ताईनीं हांक मारली आणि विचारलें, " ऐकलंसना हे काय

म्हणताहेत तें ? खोटी थाप मारून कां तूं यमुनेला इकडे घेऊन आलीस ?"

अंबाक्का --- होय. खोटं बोलूं नको तर काय करूं ? मी यांना सरळ सांगतें आहे आज किती तरी दिवस कीं, यमुनेला शिकायला पाठवा हिंगण्याला म्हणून. पण ते ऐकत नाहींत. महिन्यापंधरा दिवसांत हे जाणार कानपूरला बदली होऊन. ते तिला तिकडे घेऊन जाणार होते. एकदां गेल्यावर मग कसली तिला ते पाठवताहेत ? तिला तर शिकायचं आहे, म्हणून मीं खोटं सांगितलं. मला त्यांना फसवायचं असतं, तर मागून तरी कशाला सांगितलं असतं खरं ? आईचं हृदय नि आईचं प्रेम ! त्यानंच लावलं मला खोटं बोलायला.

नारायणराव :—शिकायचंच होतं यमुनेला, तर तिनं कां नाहीं मला सांगितलं त्या दिवशीं ? मीं विचारलं नव्हतं तुमच्या समोर तिला ? काय यमुने बोल विचारलं होतं कीं नाहीं मी तुला ?

यमुना —होय विचारलं होतं.

नारायणराव —मग, कां नाहीं तेव्हां बोललीस स्पष्ट ?

यमुना —मी कांहींच बोललें नव्हतें. बाईंना राग आला असता.

अंबाक्का —तुम्ही तिच्या नांवानं चार दोन हजार रुपये वेगळे ठेवून तिच्या अन्नवस्त्राची जन्माची सोय केली असतीत, तर मीं तरी तुमच्या मनाविरुद्ध जाऊन एवढा हट्ट धरला असता कशाला तिला शिकवण्याचा ?

नारायणराव —माझ्यावर तुमचा इतका विश्वास नाहीं ? 'माझा भाऊ आहे आणि भावजय गेली, असंच मी समजतों.' हें मीं पहिल्या पत्रांत लिहिलं होतं. तें विसरतां तुम्ही !

विनायकराव —त्यांना तरी आहे कोण दुसरं घरांत मदत करायला ?

चांगलं मुलाबाळांचं कोडकौतुक करावं, दिराजावेला मदत करावी नि राहावं खुशाल! सगळ्या पोरांना हिचा लळा आहे. ती दूर गेली तर यांचा धाकटा छोकरा मधुकर तर धोसराच घेईल वहिनींचा.

ताई — अहो, पण तुम्ही यमुनेच्या पुढच्या आयुष्याचा केला आहे का कांहीं विचार? तुम्ही काय जन्माला का पुरणार आहांत तिच्या? वास्तविक तुम्ही आपण होऊनच तिला आश्रमासारख्या संस्थेंत शिकायला पाठवायची आणि स्वावलंबी करायची. तुम्ही स्वतःला पदवीधर म्हणवतां, पुण्यासारख्या शहरांत राहतां, आणि लहान विधवा असली तरी तिनं जुन्या रूढीप्रमाणं व्रतवैकल्यं करीत आपल्या नातेवाइकांनीं दिलेल्या भिक्या नि मेलेल्या अन्नावर दिवस काढावे असं समजतां?

नारायणराव — आमचं अन्न मेलेलं, आणि आश्रमाचं जिवंत? आपलीं माणसं सोडायचीं नि दुसऱ्याच्या गळीं पडायचं! आणि ही काय आतां मोठी बी. ए. एम्. ए. च होणार आहे कीं नाहीं! ह्या वयांत ती शिकायला सुरुवात करणार आणि शिक्षण संपवणार! दहा पंधरा रुपड्या मिळवणारी मास्तरीण तरी होऊं दे म्हणजे झालं! मग नाहीं ना तुला घरीं यायचं?

ती कांहींच बोलत नाहीं असं पाहून ते म्हणाले, "मग बांगड्या नि पाटल्या दे इकडे काढून! इथें दागिने ठेवीत नाहींत ना?"

अंबाक्का — न ठेवायला काय झालं? लुंड्या मुंड्या हातांनीं नाहीं कांहीं मुली वावरत इथें? पुष्कळांच्या हातांत सोन्याच्या बांगड्या आहेत.

नारायणराव — माझी इच्छा नाहीं तिनं पाटल्या बांगड्या घालाव्यात अशी! माझ्या इच्छेविरुद्ध तुला या बाटग्या संस्थेंत राहून शिकायचं असलं, तर तुला माझ्याकडून सुतळीचा तोडाहि मिळायचा नाहीं! काढ त्या बांगड्या पाटल्या!

यमुना — त्या माझ्या आहेत. स्त्रीधन. मी नाहीं देत.

नारायणराव — अस्सं तें स्त्रीधन आहे काय ? गेल्या आठ दिवसांतली शिकवण दिसते आहे ही, इथल्या मंडळींची ! ठीक आहे, पाहून घेऊं ! चल विनायक.

असें म्हणून नारायणराव तावातावानें खुर्चीवरून उठून टांग्यांत जाऊन बसले, आणि चालते झाले.

या संभाषण-प्रसंगानें यमुना इतकी भिऊन गेली, कीं तिनें आईला आपल्याला सासरीं पोंचवायला सांगितलें. "माझं काय व्हायचं असेल तें होऊं दे. तुला आणखी बाबा, काका, आजी, आत्या, बोलबोलून घेतील, हें सगळं भावोजींनीं तिकडे लिहून कळवलं तर." असें म्हणून ती रडूं लागली.

अंबाक्कांना सुद्धां ही धास्ती वाटतच होती. आधींच मोठ्या जिकिरीनें पुण्याला यमुनेला भेटायला येण्याची त्यांनीं परवानगी मिळवली होती. त्यांतून आतां नारायणरावांनीं दहशत घातल्याप्रमाणें झालेल्या प्रसंगाचें वर्णन तिखटमीठ लावून रसभरित करून खरेंच घरीं पत्र लिहिलें तर आपल्याला सगळां बोचून खातील, याविषयीं त्यांना भीति वाटत होती. पण एकदां टाकलेलें पाऊल मागें घ्यायचें नाहीं असा त्यांचा निश्चय होता.

अंबाक्का पन्नाशीच्या घरांत आल्या असल्या, तरी त्या आपल्या घरांत सगळ्यांत धाकट्या जाऊबाई असल्यामुळें अजून सासूरवाशीणच होत्या. कारण त्यांच्या सासूबाई आणि आजेसासूबाई घरांत कर्त्या बायका होत्या. मोठे दीरच काय ते मिळवते असून संसार चालवीत होते. त्यांचे यजमान अगदींच निरुद्योगी असल्यामुळें त्यांच्या मुलाबाळांचा पालनपोषणाचा भार त्यांच्या दिरावरच होता. कुटुंबांत दहा पंधरा माणसें. मिळकत बेताचीच. सगळ्यांनाच काबाडकष्ट करावे लागत असत. अंबाक्का तर सर्वस्वी पराधीन. तेव्हां आपल्या हातून होतील ते कष्ट मात्र त्या रात्रंदिवस करीत.

अंबाक्कांना दहा मुलें झालीं. परंतु त्यांतलीं दोनच हयात राहिलीं. यमुनेकरतां तर त्यांनीं कित्येक नवस केले होते. त्यांना मुलीची फार आवड होती. यमुनाहि मोठी गुणाची पोर निघाली. दिसायला बरीच सुरेख असल्यामुळें तिला ठिकाणहि बऱ्यापैकीं मिळालें होतें. खायप्यायला तोटा नव्हता. नवऱ्याला पोस्टांत बेताच्या पगाराची असली, तरी कायम नौकरी होती. दीर, जाऊ, घरांत मोठीं माणसं होतीं. दिराला रेल्वेंत चांगल्यापैकीं नोकरी होती. माहेरीं नाहीं पण सासरीं तरी आपल्या मुलीची हौस मौज होईल याचें अंबाक्कांना समाधान वाटत होतें. पण दुर्दैवानें त्यांना या समाधानांत फार दिवस ठेवलें नाहीं. दोन अडीच वर्षांनींच यमुनेचा नवरा अपघातीं गेल्याचें पत्र आलें. या बातमीनें अंबाक्कांची कमरच खचून गेली !

आतां आपल्या पोरीचें आयुष्य कसें जाणार ! तिचा दीर त्याला गरज आहे तोंपर्यंत तिचें नीट करील. पण सगळेच दिवस सारखे नसतात; शिवाय दीर सनातनी मताचा. त्याच्या घरीं देवधर्म असतो. सोवळें ओवळें कडक. तेव्हां कदाचित् आपल्या यमूवर तो सोंवळें होण्याचा प्रसंग आणील या कल्पनेनें तर त्यांचा जीव अगदीं कासावीस होत होता. आपण सवाष्णपणाचे सगळे भोग भोगावयाचे आणि आपल्या मुलीनें एवढ्या वयापासून सन्यासिनी म्हणून दिवस काढायचे. छे : ! त्यापेक्षां आपण हें पाहायला जगलों तरी कशाला ? असें मनांत येऊन कित्येक वेळां त्या अश्रु ढाळीत स्वस्थ बसायच्या.

काय करावें याचा विचार करतां करतां दोन तीन महिने निघून गेले. विचार करतां करतां त्यांची एक आतेबहीण हिंगण्याच्या आश्रमांत शिक्षिकेचें काम करीत होती, तिची त्यांना आठवण झाली. तिच्या विचारानें आपण यमूची पुढील व्यवस्था लावूं असा विचार अंबाक्कांच्या मनांत आल्यावर त्यांना समाधान वाटलें. आतां कांहीं करून यमुनेला भेटायला

पुण्याला जायचेंच, असें त्यांनीं ठरविलें, आणि त्याप्रमाणें आपल्या भावोजींकडे विचारणा केली. "जायला हरकत नाहीं पण पैसे नाहींत माझ्याकडे. आणि गेलीस तर तिला घेऊन येशील आणखी इथें, तो एक खर्च. कोणीं करायचा इतका खर्च ?" असें म्हणून नकारच दिला त्यांनीं. तरी पण "आपलें एकटीचें पुण्याचें तिकीट काढून द्या. पुढचे मी घेईन बहिणीकडून पैसे आणि येईन यमूला निदान भेटून," असें सांगून त्यांनीं भाऊजींकडून तिकिटापुरते पैसे घेतलेच नि त्या ताबडतोब पुण्यास नारायणरावांच्या बिऱ्हाडीं येऊन दाखल झाल्या.

त्या दिवशीं रात्रींचीं जेवणें खाणें झाल्यावर त्यांनीं नारायणरावांजवळ यमुनेबद्दलचा प्रश्न काढून पाहिला. त्यांच्या मनांत तिला शिकायला वगैरे न पाठवितां आपल्या बरोबर कानपूरला बदलीच्या गांवीं न्यायचें होतें.

"सध्यां तर मी तिला कुठेंच पाठवीत नाहीं. आमची 'ही' आजारी असते. मुलगा अजून अगदींच लहान. त्याचा तिला लळा आहे. पाहूं पुढें." असें म्हणून त्यांनीं अंबाक्कांना स्वस्थच बसवलें.

यमुनेच्या सांगण्यावरून अंबाक्कांची खात्री झाली होती, कीं ते बायकांनीं शिकण्याच्या विरुद्धच होते. त्यांतून त्यांना घरांत माणसांची जरूर नेहमींचा होती. बायको सदाची आजारी, चार पांच मुलांचें करायचें कोणीं ? तेव्हां यमुनेला आपल्या घरांतच राबवायची, हा त्या दोघां नवराबायकोंचा बेत होता. वरील कारणामुळेंच शेवटीं अंबाक्कांनीं खोटी थाप मारून यमुनेला हिंगण्यास नेऊन ताईच्या स्वाधीन केली होती.

नारायणराव घरांत असतांना ते यमुनेला टांग्यांतहि बसूं देणार नाहींत या भीतीनें ते कचेरींत गेल्याची संधि साधून यमुनेच्या जावेला सांगून अंबाक्का निघाल्या, त्या मुंबईस न जातां थेट हिंगण्याला आल्या.

नारायणरावांना घरीं आल्यावर ही बातमी समजली. तेव्हांपासून अंबाक्कांवर ते रागावलेलेच होते. तो राग दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं मिळालेल्या अंबाक्कांच्या पत्रानें अनावर झाला. रात्रभर विचार करून तिसऱ्या दिवशीं ते आपल्या आतेभावाला बरोबर घेऊन हिंगण्याला त्यांना जाब विचारायला गेले, परंतु तिथूनही ते चिडून परतले. घरीं परत आल्यावर त्यांनीं यमुनेच्या काकांना एक खरमरीत पत्र लिहून अंबाक्कांच्या खोटया नि उद्दाम वागणुकीचें वर्णन केलें आणि ' यापुढें यमुनेच्या नि आमच्या घराण्याचा काडीमात्र संबंध नाहीं, तिला आमच्या घरचा सुतळीचा तोडाहि मिळणार नाहीं, ' वगैरे कळवलें. त्याचा परिणाम जो होईलसें अंबाक्कांना वाटलें होतें तोच झाला.

यमुनेची सगळी व्यवस्था ताईनीं लावल्यावर पंधरा दिवसांनीं त्या घरीं परत जातात तों तिथलें सगळें वातावरण क्षुब्ध झालेलें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्या गाडींतून उतरून घरांत गेल्या, हात पाय धुवून देवांना नमस्कार करून ओटीवर दिरांना नमस्कार करायला गेल्या, तों ते उठून बाहेरच गले होते. घरांत जाऊबाईही रागावलेल्याच दिसल्या. सासूबाई, नन्संबाई सगळ्यांची एकच तऱ्हा. अंबाक्का समजल्या. त्याही कांहीं विशेष कोणाशीं बोलल्या नाहींत. अंग धुवून, सोवळ्यांतलें अन्न काढून घेऊन त्या जेवल्या. आणि आपल्या रोजच्या कामाला लागल्या.

रात्री अंबाक्कांनीं नेहमींप्रमाणें सैंपाक केला. जेवणाचीं पानें मांडलीं होतीं, त्यांचे यजमान गोपाळराव हातपाय धुवून घरांत येत होते, त्यांना त्या म्हणाल्या, " मी काय असं घोडं मारलं आहे कोणाचं, म्हणून सगळीं माझ्यावर रागवलेलीं ? लवकर परत आलें नाहीं सांगितलेल्या मुदतींत हें खरं, पण इतक्या लांब गेल्यासारखं भेटावं माहेरच्या माणसांना, असं वाटलं. यमुनेला ताईकडे नेऊन तिच्या शिक्षणाची सोय लावण्यांत गेले चार आठ दिवस अधिक . "

" यमुनेचं नांव अंबाक्कांच्या तोंडून निघालं मात्र, तिचे भावोजी ओटो-वरून माजघरांत येत होते, ते गर्जून बोलले. "आपण चांगलेच प्रताप गाजवलेत पुण्याला जाऊन ! आमच्या तोंडाला काळं फासलंत. मुलीला शिकायला ठेवलीस त्या बाटग्या संस्थेंत. आपणही जा तिकडेच !"

झालं ! यमुनेविषयींच्या ह्या बोलण्यानें सगळ्यांनाच उसळी आली. जाऊबाई, सासूबाई, नन्सं, ह्याही आपापल्या परीनं त्यांना दोष देऊं लागल्या. त्या बोलण्यांत यमुनेच्या दिराच्या पत्राचाही उल्लेख येत होता. सगळ्यांनीं दिराचीच बाजू घेतली. अंबाक्का कांहींच बोलल्या नाहींत. त्यामुळें हें उठलेलें वादळ तासाभरानें शांत झालें. पण त्यांच्या मनांतला राग मात्र शांत झाला नाहीं. तो शेवटपर्यंत तसाच राहिला.

यमुनेचें शिक्षण व्यवस्थित चालू होतें. तिच्या दिरानें तिचें नांव सोडलेंच होतें. त्यानें यमुनेच्या माहेरीं एकच तेवढें पत्र पाठवलें. म्हटल्याप्रमाणें त्यानें पुढें कोणालाच म्हणण्यासारखा त्रास दिला नाहीं. एकदोन वर्षें यमुना माहेरीं सुटींतही गेली नाहीं. पण नंतर ती आईच्या बोलावण्या-वरून जाऊं लागली. तरी तिच्याबरोबर फारसें कोणी बोलत नसे. तिच्या आईबरोबर सुद्धां जितक्यास तितकेंच बोलत सगळीं. अशीच त्यांची वागणूक अलीकडे होती. यमुनेनें पांच वर्षें आश्रमांत राहून अध्यापिकाशाळेंतलें शिक्षण पुरें केलें. परीक्षा पास झाल्यावर सांगलीच्या मुलींच्या शाळेंत तिनें नौकरी धरली, आणि त्याप्रमाणें तिनें आईला कळवलें. तिचें शिक्षण पुरें झालेलें पाहून अंबाक्कांना आपल्या धडपडीचें खरें चीज झालें असें वाटलें.

वर्षभरांत यमुनेचा सांगलीच्या शाळेंत चांगलाच जम बसला. विशेषतः बालवर्ग शिकविण्यांत तिचा हातखंडा होता. तिला गाण्याचें अंग चांगलें

असून आवाजाचीहि ईश्वरी देणगी तिच्याजवळ होती. तसेंच मुलांना गोष्टी सांगण्याची तिची पद्धत मोठी मोहक होती. या सर्व गुणांमुळें तिच्या वर्गाची सरासरी हजेरी नेहमींच चांगली असायची. तिला शिवणकाम, भरतकाम, नि कागदकाम यांचाहि नाद होता. तिथल्या बायकांना हें काम शिकविण्यासाठीं तिनें एक वर्गही खासगी रीतीनें चालविला होता. शेजारपाजारच्या, विशेषतः शाळेंतल्या मुलींच्या आया, हें काम शिकण्याकरतां येत असत. गरीब बायकांकडून ती फी घेत नसे, त्यामुळें त्या सगळ्या बायकांना यमुनेबद्दल एक प्रकारचा आपलेपणा वाटे. म्हणूनच त्यांपैकीं कोणी तिला कधीं जेवायला तर कोणी चहाला बोलावीत, तेव्हां ती आढेवेढे न घेतां त्यांचें आमंत्रण स्वीकारीत असे.

सांगलीच्या खासगी कारभाऱ्यांची मुलगी प्रमिला हिंगण्याला यमुनेच्या वर्गांत शिकायला होती. यमुना फायनल झाल्यावर अध्यापिकाशाळेंत गेली, नि प्रमिलेनें मॅट्रिकचें शिक्षण पुरें केलें. त्या दोघी जीवश्चकंठश्च मैत्रिणी होत्या. प्रमिलेच्या आग्रहावरून यमुना तिच्या घरांतच राहायला गेली. मात्र 'निराळें बिऱ्हाड करून राहायला जागा असली तरच आपण येऊं तुझ्या शेजारीं,' असें तिनें प्रमिलेला आधींच बजावलें होतें. त्याप्रमाणें प्रमिलेनें कबूल करून तशी तिला स्वतंत्र जागा दिली होती. आई, वडील, दोन भाऊ व एक बहीण, इतकीं माणसें प्रमिलेच्या कुटुंबांत होतीं. तिचा एक भाऊ स्टेट एंजिनिअर होता. दुसरा कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्यें शिकत होता. बहीण बरीच लहान असून ती यमुनेच्या शाळेंतच शिकत होती. प्रमिलेची आई फार मायाळू असून ती यमुनेवर प्रमिलेप्रमाणेंच प्रेम करीत असे. यमुना एकटीच राहात असल्यामुळें पुष्कळ वेळां ती तिला जेवायला बोलावीत असे. सणावारीं तर त्या तिला जेवायला बोलवायला कधींच विसरत नसत.

ठाणे, नौपाडा शाखा.
५५८ नों. वि

पहिल्या पहिल्यानें यमुना जाण्याचें टाळीत असे. ती म्हणे, "दर वेळीं काय यायचं काकू तुमच्या घरीं पुख्खा झोडायला ?"

पण "लहान मुलींनीं मोठ्या माणसांचं ऐकावं मुकाट्यानें; सतरा पंचाइती करूं नये," असें काकूंचें उत्तर ऐकल्यावर ती मुकाट्यानें बसे. शिवाय प्रमिलेची छोटी बहीण प्रभा सदांच तिला म्हणायची 'आमच्याकडे जेवा' म्हणून. प्रमिलाहि कॉलेजला सुट्टी होऊन घरीं आली, कीं तिला आपल्याच घरीं राहायला बोलावीत असे. अशा रीतीनें हळूं हळूं प्रमिलेच्या घरच्या सगळ्या मंडळींना यमुनेबद्दल आपलेपणा वाटूं लागला होता. तिनें आपल्या गोड बोलण्यानें आणि कामासूपणानें सगळ्यांना आपलेंसें केलें होतें. अंबाक्कांची आणि काकूंचीही आतां ओळख झाली होती. कारण मधून मधून चोरून मारून अंबाक्का यमुनेला भेटायला येऊन आठपंधरा दिवस राहून जात असत. त्यांचा मुलगा आतां कोल्हापूरला नोकरीला लागला होता. त्यामुळें त्याच्याकडे जाण्याच्या निमित्तानें त्या सांगलीला येऊं शकत.

प्रमिलेची भावजय गेल्याला चार वर्षें झालीं होतीं तरी तिच्या भावानें – प्रभाकरानें – अजून लग्न केलें नव्हतें. त्याचे वडील नि आई यांनीं त्याला दुसरें लग्न करण्याविषयीं बरेच वेळां सांगून पाहिलें, पण प्रभाकरानें तिकडे दुर्लक्षच केलें होतें. पुष्कळ प्रौढ व शिकलेल्या मुली त्याला सांगून येत होत्या, परंतु प्रत्येक वेळीं तो "इतक्यांत नको, पाहूं पुढें" असें म्हणून वेळ मारून नेई. अखेर त्याचे वडील तात्यासाहेब यांनीं एकदां त्याला निक्षून विचारलें, तेव्हां त्यानें आपलें खरें मत सांगितलें. तो म्हणाला, "विधुरानें विधवेशींच विवाह करावा असें माझें मत आहे. तशी विधवा माझ्या योग्य मिळाली आणि तुमची संमति या विवाहाला असली तर मी लग्न करायला तयार आहे."

हें उत्तर ऐकून तात्यासाहेब थोडेसे बुचकळ्यांत पडले आणि "ठीक आहे" इतकेंच बोलून ते कोट टोपी घालून बाहेर निघून गेले.

या गोष्टीला दोन महिने झाले. तात्यासाहेब किंवा काकू, कोणींही प्रभाकराच्या लग्नाची गोष्ट काढली नाहीं. आतां मुलीहि सांगून येईनाशा झाल्या होत्या; कारण मुलींचे वडील तात्यासाहेबांकडे आले तर ते त्यांना नकार देऊन परस्परच लावून देत असत.

मे महिन्याच्या सुट्टींत प्रमिला घरीं आल्यावर पुन्हां या प्रश्नाला तोंड फुटलें. प्रभाकरचीं मतें तिला माहीत होतींच आणि अलीकडे अलीकडे त्याचें मन नकळत यमुनेकडे ओढलें जात होतें, हेंही तिच्या लक्षांत वेळोवेळीं आलें होतें. यमुनेच्या मनाचा मात्र तिला थांग लागत नव्हता. एक दिवस प्रभाकरला तिनें आपला संशय बोलून दाखवून विचारलें, “ तुला यमुनेविषयीं प्रेम वाटत असलं तर तसं विचारीत कां नाहींस तिला ? ”

“ तिच्या होकाराची मला खात्री नाहीं म्हणून. ” त्यानें उत्तर दिलें. तेव्हां प्रमिलेनेंच तें काम केलें. यमुनेनें पहिल्यानें साफ नकार दिला. “ काकू आणि तात्यासाहेब काय म्हणतील मला ? माझ्याशीं तुम्हीं सगळींजणं प्रेमळपणानं वागतां त्याचा फायदा घेऊन मी तुमच्या कुटुंबांत वितुष्ट उत्पन्न करण्याचं पातक करूं ? काकूंना काय वाटेल, आपल्या मुलानं विधवेशीं लग्न केलं तर ? त्या मलाच दोष नाहीं कां देणार ? ”

परंतु ही तिची भीति निराधार ठरली. तात्यासाहेबांना प्रमिलेनें आपलें प्रभाकर व यमू यांच्याशीं झालेलें बोलणें सांगितलें. तेव्हां त्यांनीं या विचाराला संमतीच दर्शविली. यमूच आपली सून होणार असेल तर काकूंचीहि प्रभाकरच्या विधवाविवाहाला संमति मिळणार होती. तेव्हां आतां यमुनेला नकार देण्याचें कांहींच कारण नव्हतें. माहेरच्या माणसांची परवानगी मिळणें शक्यच नव्हतें. इतकेंच नाहीं तर ती मंडळी अडथळे आणून लग्न मोडण्याचाच प्रयत्न करतील, म्हणून तिनें आपल्या

आईलाहि हें कळूं नये अशी खबरदारी घेतली. तिनें आपला हा विचार ताईना मात्र पत्रानें कळवून त्यांचा आशीर्वाद घेतला.

लग्न झाल्यावर तिनें आपल्या आईला नि भावाला कळवलें. भावाचें "कांहीं हरकत नाहीं, बरें केलेंस," असें उत्तर आलें. पण चुलत्यांचें "वा, फार छान केलंस. आतां आम्ही सगळीं कृतकृत्य झालों. तुझ्या मातोश्रींनींच त्या बाटग्या संस्थेंत तुला ठेवून मार्ग दाखवून दिला! त्यांच्या डोळ्यांचं पारणं फिटलं!" वगैरे लिहून तिची यथेच्छ निर्भर्त्सना केली. या तिच्या कृत्याचें प्रायश्चित्त अंबाक्कांना मात्र अखेरपर्यंत भोगावें लागलें. परंतु यमुनेच्या सुखापुढें त्यांना त्याचें कांहींच वाटत नव्हतें. कोणीं कांहीं विचारलें तर त्या म्हणत "पोरगी सुखांत तर पडली, लोक कांहीं का म्हणेनात!"

## १०

# अनशी

मारुतीची कामावरून यायची वेळ झाली कीं अनशीच्या अंगाचा थरकांप उडे. तिच्या उरांत धडकी भरे. घरांतलें काम सुचेनासें होई. कारण तो यायचा, तो झिंगूनच यायचा. घरांत पाऊल ठेवतांक्षणींच कांहीं तरी निमित्त काढून अनशीवर तोंडसुख घ्यायचा, तिला अद्वातद्वा बोलायचा, आणि तिनें एखादा शब्द त्याच्याविरुद्ध तोंडावाटे काढला, तर तिला मरे मरे तों मारायचा. तिला निपचित पडलेली त्यानें पाहिली कीं, "ब्येस झालं! त्वांड वर करून बोलतीया न्हवं का?" असें म्हणून भेसूर हंसत नि झोकांडया खात आपल्या कोपऱ्यांत अंथरलेल्या कांबळ्यावर जाऊन पडायचा तो उजाडेपर्यंत उठायचा नाहीं. हाच अलीकडे त्याचा रोजचा कार्यक्रम होता.

नवऱ्याच्या मारानें निपचित पडलेली अनशी थोडया वेळानें सावध

व्हायची. तिचें सगळें अंग ठणकत असायचें. तरी तसेंच उठून तिनें चुलीला पेटूं घालायचें आणि भाजी भाकरी करून, झांकून ठेवून, ती चुलीपुढेंच एकादें फळकूट उशाला घेऊन लवंडायची. मारुती बेताची प्यायला असला, तर मध्यरात्रीं सावध होऊन तिला उठवायचा, आणि जेवायला मागायचा. दारूनें बेहोष झालेला असला, तर तो उठतही नसे. मग अनशी तरी कशाला उठते? तीहि तशीच चुलीपुढें एखादें फटकूर उशाला घेऊन जमिनीवर निजे, ती सकाळींच उठे नी कामाला लागे.

मारुती सकाळीं उठे तो मात्र सावध झालेला असे. तोंडबींड धुवून तो चहा प्यायला चुलीजवळ येऊन बसे, तेव्हां अनशीचा सुकलेला चेहरा पाहून तो तिला विचारी "भाकर खाल्ली नाहींस तूं रातची?" ती कांहींच बोलत नसे. पण तिच्या अंगावरचे माराचे वळ पाहून आपण तिला किती गुरासारखें मारलें असावें, याची कल्पना येऊन त्याची त्यालाच लाज वाटे, आणि तो अगदीं वरमून जाई. तो म्हणे "तूं माझ्याम्होरं न्हातीसच कां बरं? एखांयेळा जास्ती व्हती बघ मला. तुज्या गळ्याच्यान्, आतां नायू मी पिनार." असें म्हणून तो तिची समजूत घाली. तेवढ्याच गोड शब्दांनीं अनशी खूष होई आणि रात्रींच्या माराच्या वेदना विसरून जाई.

मारुती परळच्या सुताच्या गिरणींत काम करीत असे. त्या गिरणींत चारपांचशें मजूर होते. मारुती पहिल्यानें मालवाहातुकीच्या कामावर होता. परंतु त्याची कामांतली हुषारी आणि प्रामाणिकपणा पाहून लवकरच त्याच्याकडे सूत रंगवण्याचें काम आलें होतें. त्याला वेतनहि बरें मिळत होतें. तो व्यवस्थित राहता, तर त्याचा संसार सुखाचा झाला असता.

अनशीहि संसाराला मोठी हुषार पोरगी होती. ती लहानपणापासूनच

मोठी चलाख असल्यामुळें मारुतीच्या बापानें तिला मारुतीसाठीं मागणी घातली. मारुती त्यावेळीं बारा तेरा वर्षांचा असून मराठी शाळेंत जात होता. अनशीच्या बापानें ही मित्राची मागणी कबूल केली आणि अशा रीतीनें अनशीचें आणि मारुतीचें लग्न झालें. लग्न झालें तरी अनशीला पदर येईपर्यंत ती नवऱ्याकडे राहायला फारशी गेलीच नाहीं, कधीं बधीं सणासुदीची जायची, आणि आठपंधरा दिवसांनीं बापाकडे माघारी यायची.

मारुतीचें चार इयत्तेपर्यंत मराठीचें शिक्षण झाल्यावर तो त्याच्या बापाच्याच वशिल्यानें गिरणींत कामाला लागला. त्याचा बाप त्याच गिरणींत पहिल्यापासून शेवटपर्यंत काम करीत होता. शेंवटीं शेंवटीं तो मुकादमाच्या जागेपर्यंत चढला होता. तो फार सचोटीचा आणि प्रामाणिक मनुष्य होता, त्यामुळें त्याच्यावर त्याच्या मॅनेजरची मर्जी होती. त्याच्यानें आतां काम होईनासें झाल्यामुळें त्यानें आपल्या मुलाला तिथें चिकटवला आणि आपण काम सोडून मुलाजवळच राहावें असा विचार केला. परंतु काम सोडल्यावर तो फार दिवस जगलाच नाहीं.

मारुती कामाला लागल्यावर अनशी त्याच्याकडे राहायला आली. वर्ष सहा महिने दोघांचा संसार चांगला चालला होता. आपण किती भाग्याच्या, असें तिला वाटे. तिच्या मैत्रिणींनींही हेवा करावा, अशी त्यांची एकामेकांवरची प्रीति होती. परंतु मारुतीचा बाप गमावल्यावर थोडयाच दिवसांत दारूपायीं त्याची अवस्था वर वर्णन केल्याप्रमाणें झाली. त्याचें व्यसन वाढत चाललें. गिरण सुटतांच तो इतर मजुरांप्रमाणें आपल्या दोस्तां-बरोबर गुत्त्यावर जाऊं लागला.

पहिल्या पहिल्यानें मारुती पगाराचे पैसे अनशीजवळ द्यायचा, आणि

विडीकाडीला लागतील तितके पैसे तो तिच्याकडून मागून घ्यायचा. वर्षभरांत त्यानें अनशीला दहा पुतळ्यांचें गाठलेंहि घडवून आणलें. इतके पैसे त्यानें मागें टाकले. परंतु दोन वर्षांनंतर ही त्याची वृत्ति पालटली. त्याच्या विडीकाडीलाच जास्त जास्त पैसे लागूं लागले. ते नुसत्या विडीकाडीलाच खर्च होत नाहींत, हें अनशीच्या ध्यानांत आल्यावांचून राहिलें नाहीं. ती पैसे द्यायला कुरकुरे, त्यावरून अतांशा त्यांचे खटके उडूं लागले होते. तो पगाराचे पैसे हळू हळू आपणांकडेच ठेवूं लागला. लागेल ती वस्तु तोच स्वतः घरांत आणी.

दिवसेंदिवस मारुतीची पिण्याची संवय वाढतच होती. शेवटीं तर ती गटारांत लोळेपर्यंत अनावर झाली. त्याला पिण्यालाच पैसे पुरेनात, मग घरांत डाळतांदूळ आणायला कुठले उरणार? अनशीचे चांदीचे गोठ, पायांतल्या सांखळ्या, हातांतल्या वेळा, आणि गळ्यांतलें गांठलें, वगैरे सगळे दागिने एक एक विकले गेले. मारुतीच्या मारझोडीमुळें अनशीला एक एक दागिना त्याच्या स्वाधीन करावा लागला.

आतां मारुती घरांत मुळींच लक्ष देईनासा झाला. तरी पण जेवण, चहापाणी वेळेवर न मिळालें तर मात्र तो संतापायचा. “घरांत चहाची भुकटी नाहीं, साखरेची चिमटी नाहीं, दूध आणायला पैसे नाहींत, तर देऊं कुठून मी चहा?” असें अनशीनें म्हटलें तरी, “मला चा पाहिजे बस्, वाटेल तिथनं आण चा साखर.” असं तो म्हणे. आणि कांहींही करून तो देणें तिला भाग पडे. कांहीं दिवस कोणाकडून चहा तर कोणाकडून साखर आण, असें तिनें चालवलें. पण रोज कसें हें चालणार? तिनें घरांतलें एक एक भांडेंकुंडेंहि विकलें, चीजवस्त गहाण टाकली आणि कसा तरी प्रपंच चालवला. मारुतीचें व्यसन सुटावें म्हणून ती यत्न करी,

पण त्याचा परिणाम उलटच होऊं लागला. तो तिला अधीकच बडवूं लागला. अनशीची स्थिति दिवसेंदिवस फारच केविलवाणी होऊं लागली. नवऱ्याला सोडून माहेरीं जावें तर तो अधीकच बहकेल असें वाटून ती त्याचा मार निमूटपणें सहन करून त्याच्याजवळ राहिली होती. अंगावर धड वस्त्र नाहीं, रांधायला घरांत भांडें नाहीं, कीं मूठभर धान्य नाहीं! मारुती आज ना उद्यां ताळ्यावर येईल या आशेनें ती दिवस काढीत होती. परंतु मारुतीच्या तें गांवींही नव्हतें. त्याला तिच्याबद्दल कांहींच वाटेनासें झालें होतें. ती जेवली काय नि उपाशी असली काय, सारखेंच. मोलमजुरी करून ती कसाबसा संसार करीत होती पण त्या पैशांत दोघांचें कसें भागणार? दुसरें, तिच्याजवळ चार दोन आणे असले तर तो मारहाण करून काढून घेई.

गिरणी कामगारांची संघटना करून त्यांची परिस्थिति सुधारावी आणि त्यांचें जीवन सुखी करावें, म्हणून परळ भागांत काम करणारी कृष्णा देशमूख म्हणून एक मुलगी होती. ती नुकतीच कर्वे युनिव्हर्सिटीची जी. ए. पदवी घेऊन बाहेर पडलेली होती. ती आणि तिच्याबरोबर काम करणाऱ्या तिच्या एक दोन मैत्रिणी, या गिरणकामगारांच्या चाळींतून पाहणी करीत हिंडत असत. तेथील मजुरांना लिहिणें–वाचणें शिकवणें, स्वच्छतेचें महत्त्व त्यांना पटवून देणें, आरोग्याचे धडे देणें, औषधपाणी देणें, इत्यादि कामें त्या करीत. मजूर स्त्रियांचीं दुःखें नि अडचणी समजून घेऊन तीं दूर करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. या त्यांच्या वागणुकीमुळें तेथील बायकांना या मुलींबद्दल आपलेपणा आणि विश्वास वाटे. त्या त्यांच्याशीं मोकळेपणानें सगळें सांगत असत.

अनशीची होत असलेली ही कुचंबणा कृष्णाबाई पहात होती. तिनें

मारुतीला पन्नास वेळां सांगितलें होतें कीं, हें बरें नाहीं. त्याचें वागणें सुधारलें नाहीं तर कामावरून दूर करविण्याचाहि धाक तिनें त्याला घालून पाहिला. पण व्यर्थ. तिनें गिरणीच्या मालकांना सांगून त्याचा पगारहि एक दोनदां मागून घेतला होता. पण त्यामुळें तो अनशीवर अधिकच चिडला नि तिला जास्तच छळूं लागला. हें पाहून अखेर कृष्णाबाईनें अनशीला "घरांतून निघून जा, त्याशिवाय तो ताळ्यावर यायचा नाहीं" असें सांगितलें.

पण ती जाणार कुठें? ती बापाकडे जातें म्हणाली तर तो म्हणे, "जा तर खरी बाबाकडं, नवऱ्याची बायको हाएस तूं! कुठंबी गेलीस तरी दांडकीत माघारी आनीन. नाय ठावं तुला!" हे शब्द ऐकले कीं ती निमूटपणें बसे. 'खरंच तो आपल्याला झोडपीत आणील' अशी भीति तिला वाटे. म्हणून कृष्णाबाईचें सांगणें तिनें मनावरच घेतलें नाहीं.

असेच आणखी एक दोन महिने गेले. एक दिवस उजाडतांच अनशी कृष्णाबाईच्या बिऱ्हाडीं आली आणि ओक्साबोक्शी रडूं लागली. रडून रडून तिचा चेहरा फुलला होता. अंगावर वळ दिसत होते. एका हाताच्या मनगटांतून बांगडीची कांच शिरल्यामुळें रक्त येत होतें. आज मारुतीनें तिला यथेच्छ मारलें असावें असें कृष्णाबाईच्या चटकन् लक्षांत आलें. गेल्या रात्रीं मारुतीनें तिला घराबाहेर काढून दिली होती. दुसरी बया घरांत आणून तो मजा मारीत होता. अनशीला अचकट विचकट शिव्या देत होता. हें असह्य होऊनच अनशी घराबाहेर पडली होती, ती पुन्हां न जाण्याच्या इराद्यानेंच कृष्णाबाईकडे आली होती.

आतां हिची काय सोय करावी हा प्रश्न कृष्णाबाईच्या पुढें उभा राहिला. मुंबईत कोठें ठेवायची तर मारुतीच्या त्रासाची भीति होती. तेव्हां हिंगण्याला

चौकशी करून पाहावें म्हणून कृष्णाबाईनें आश्रमाच्या चिटणिसांना तिची सगळी हकीगत लिहून कळवून कसेंही करून तिला आश्रय देण्याविषयीं विनंती केली. परंतु नियमाप्रमाणें तिला नादारींत घेतां येत नाहीं; तथापि, झाडणें, लोटणें, भांडीं घासणें, वगैरे कुठलेंहि काम करायची तिची तयारी असली तर तिला पाठवावी, असें त्यांनीं कळविलें. अनशीची वाटेल तें करण्याची तयारी होती. त्यामुळें कृष्णाबाईनें तिला हिंगण्याला पोंचती केली. अनशी खरोखरच झाडलोट नीं धुणंभांडयांचें काम पतकरून राहिली, आणि शाळेंत प्रौढ वर्गांत शिकायला जाऊं लागली.

अनशी हरिजन असल्यामुळें तिला जरी सैंपाकघरांत काम मिळालें नाहीं, तरी तिला इतर सगळ्या बाबतींत वरच्या जातीच्या मुलींप्रमाणेंच वागविलें जात होतें. जेवणाच्या पंगती फक्त निरनिराळ्या जातींच्या निराळ्या असत; बाकी एका ठिकाणीं राहणें, निजणें; एकत्र शिकणें, खेळणें, वगैरे सगळ्या बाबतींत सर्व मुलींना समान वागणूक तिथें मिळत असल्यामुळें जातिवैमनस्याला जागाच उरत नसे. अशा प्रकारच्या आश्रमांतल्या वातावरणामुळें अनशीला तिथें घराप्रमाणेंच वाटत होतें.

अनशी परत घरीं आली नाहीं तरी मारुतीला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. त्यानें कृष्णाबाईला मात्र वाटेल तशी शिवीगाळ केली. "आपण एक नवऱ्याला सोडून आलीया आन् दुसऱ्यांच्या बायकांना फूस लावून नेतीया" इत्यादि अनेक प्रकारानें त्यानें तिच्या बिऱ्हाडीं जाऊन तिच्यावर तोंडसुख घेतलें. या त्याच्या वागणुकीमुळें आणि व्यसनापायीं होत असलेल्या कामाकडच्या दुर्लक्षामुळें कृष्णाबाईनें त्याच्याविषयीं मॅनेजरांकडे खरमरीत रिपोर्ट केला, आणि त्यामुळें त्याला गिरणींतून कमी केलें. तेव्हांपासून तो कुठें गेला, त्याचा पत्ता नाहीं.

अनशीचें शिक्षण धीमेपणानें चाललें होतें. ती आली तेव्हां तिचें नेसणें, बोलणेंचालणें, वागणेंसवरणें, सगळेंच ओळखून पडण्याइतकें निराळें होतें. बोलून चालून हरिजन ती. तिची भाषा एकदम कशी सुधारणार ? तरी पण हिंगण्यांतल्या एकंदर वातावरणामुळें वर्षभरांत तिच्यामध्यें चांगलाच फरक पडला. तिची बुद्धि बेताचीच होती, पण शिकण्याची ईर्ष्या नि अभ्यासाची चिकाटी दांडगी होती. ही तिची आस्था पाहून पुढें पुढें तिचें कामहि कमी करण्यांत आलें नि अभ्यासाला, अधिक वेळ देण्यांत आला. अशा रीतीनें आठ वर्षांच्या अवधींत तिनें अध्यापिकाशाळेंतलें शिक्षण पुरें केलें. आतां तिला २५ रुपयांचें सर्टिफिकेट मिळालें. आणि ती मागासलेल्या जातीपैकीं असल्यामुळें तिला नौकरी मिळायलाहि वाट पहावी लागली नाहीं. वेताळ पेठेंतल्या मुलींच्या शाळेंत ती काम करूं लागली. तिनें त्याच पेठेंत एक लहानशी खोली घेऊन आपलें बिऱ्हाड थाटलें.

आश्रमांतल्या जीवनांत वेळोवेळीं मिळालेल्या शिकवणीमुळें अनशीला समाजसेवेची आवड उत्पन्न झाली होती; म्हणून ती आपलें शाळेचें काम करून फावल्या वेळांत महारवाड्यांत जाऊन तेथील बायकांना लिहायला वाचायला शिकवीत असे. तिच्यापुढें आश्रम सेवकसेविकांचा आणि कृष्णाबाईचा आदर्श असल्यामुळें तीहि या बायकांचें जीवन सुधारण्याचे यत्न करी. या कामीं ती आश्रमाच्या मंडळींचा सल्ला घेत असे. एकदोनदां तिनें कृष्णाबाईला पत्र लिहून आपलें काम बघायला बोलावलें होतें. ती तिचें काम पाहून खूष झाली. अशा रीतीनें अनशी आतां स्वतंत्रपणानें सुखांत दिवस काढीत होती.

शनिवारचा सुटीचा दिवस होता. आज अनशी चार वाजतांच महारवाड्यांत वर्ग घ्यायला बाहेर पडली होती. दर शनिवारीं वर्ग संपल्यावर ती या बायकांना कपडे दुरुस्तीचें, तसेंच चोळ्या आणि मुलांचीं कुडतीं शिवण्याचें काम शिकवीत असे. थोडीबहुत घरगुती औषधपाण्याची माहितीहि ती त्यांना देत असे. असा दर शनिवारचा तिचा निरनिराळा कार्यक्रम ठरलेला होता.

वर्ग संपवून अनशी सहा वाजतां बिऱ्हाडीं जायला निघाली. ती फर्लांगभर चालून गेली असेल नसेल, तोंच समोरून येणाऱ्या मारुतीकडे तिची नजर गेली. क्षणभर, 'हा कोण बरं ओळखीचा?' असें तिच्या मनांत आलें. पण तो जवळ येतांच तिनें त्याला ओळखलें. एकमेकांची नजरानजर झाली. ती एकदम आश्चर्यचकित झाली; गांगरली. भीतीनें तिला कांपरें भरलें. मान खालीं घालून कसें तरी आपल्याला सांवरीत ती झपझप पुढें सटकली. तरी मारुतीनें तिला पुढें जाऊं दिलें नाहीं. त्यानें तिला अडवलें. तो म्हणाला, "मी तुझा माग काढीत इथवर आलों, नि तूं अशी पळतेस? आतां तुझा पहिला मारुती आलाया. चल माझ्यासंगं." असें म्हणून त्यानें तिचा हात धरला. त्याच्या त्या हस्तस्पर्शात तिला पूर्वीची प्रीतीची भावना जाणवली. तिनें वर बघितलें. त्याच्या नजरेंतहि प्रीतीच दिसत होती. चेहेऱ्यावर शरमिंदेपणा नि पश्चात्ताप दिसला. तिला धीर आला. तिनें त्याला आपल्या बिऱ्हाडीं नेलें.

बिऱ्हाडीं गेल्यावर मारुतीनें तिची क्षमा मागितली. आणि यापुढें तिला अंतर न देण्याची शपथ घेतली. नंतर त्यानें आपण कृष्णाबाईला टाकून कसें बोललों, कामावरून कां निघालों, मित्रानें आणि त्या बयेनें आपल्याला कसें लुबाडलें, पैसा संपतांच ती आपल्याला कशी सोडून गेली, आपण हमालीचें काम करून बोटीच्या धक्क्यांवरच कसे दिवस काढले, वगैरे

सगळी हकीगत अनशीला सांगितली. तसेंच आपली दारूहि सुटल्याचें त्यानें तिला सांगितलें.

हमालीचें काम झेपेना म्हणून दुसरें काम पहात असतां एका मोटारच्या कारखान्यांत तो कामाला लागला. कारखान्याचा मालक चंदूलाल मोठा सज्जन माणूस. त्यानेंच त्याला आपल्या कारखान्यांत मोटर ड्रायव्हिंगचें काम शिकविण्याची व्यवस्था केली. आणि आतां तो त्याच्याच खासगी मोटारीवर ड्रायव्हर होता. आतां अनशीचा शोध काढून तिला परत न्यायला तो पुण्यांत आला होता.

आपली हकीकत सांगून झाल्यावर तो अनशीला म्हणाला, " तूं हतं कशापायी आलीस ? आन् कोनासंगं ऱ्हातीस ? "

" कृष्णाबाईची कृपा. त्यांनीं माझी कर्व्यांच्या संस्थेंत सोय लावली नसती तर ही तुमची अनशी कोणत्या स्थितींत असती कोण जाणें ! " असें म्हणून तिनें आपली सर्व हकीकत सांगितली.

" तूं शिकून मास्तरीन झालीस. मंग आतां कशाला तूं माझ्यासंगं ऱ्हायला येशील ? " मारुती हताश होऊन म्हणाला.

" न राहायला काय झालं ? मास्तरीण झाली तरी तिला नवऱ्याजवळ राहून संसार करावासा वाटत नाहीं असं थोडंच आहे ? मला इथं कायम नोकरी आहे. तुम्हीही पुण्यांतच काम पहा. "

" किती गुनाची पोर हायेस तूं अनशे. माझ्यापायीं लई तरास सोसलास. म्यां चांडाळानं ... ... '

एकदम त्याच्या तोंडावर हात ठेवून अनशी म्हणाली, " झालं तें गेलं. आतां तें बोलूं नका. आपल्या नशिबाचा फेरा फिरला होता इतकंच. आतां काय त्याचं ? "

# ११

## पण आंतां काय उपयोग ?

मालण – मोठे निघाले आहेत माझं कल्याण करायला ! म्हणे तूं मोहनशीं संबंध ठेवूं नकोस. तो सीधा मनुष्य नाहीं; तुला फसवील. मीं साफ सांगितलं त्यांना कीं याच्यापुढें मला आश्रमांत राहायचं नाहीं. मी हवी तिथें नि हवी ती नोकरी करीन. सगळे जण मला इथेंच डांबून ठेवायला बघताहेत. म्हणे इथेंच नोकरी कर !

माणक – तूं चुकतेस मालण. कुठला एक फतरूस सिनेमा नट, तो तुझ्या त्या श्रीपादरावांच्या ओझरत्या ओळखीनं सहज त्यांच्याबरोबर आला. इतकीच तुझी नि त्याची ओळख. त्याला ना आगा ना पीछा. त्याच्याशीं तूं इतकी सलगी करावीस ? तसं कांहीं तुला करायचंच, तर आश्रमचालकांना कां नाहीं सांगत ? ते खात्रीनं तुला मदत करतील.

मालण – मला नको आहे कोणाची मदत या कामीं. आतां माझी मी

स्वतंत्र आहे सगळं कांहीं ठरवायला. मीं ठरवलं आहे सिनेमांत जायचं. मोहननं मला आश्वासन दिलं आहे 'किरणकला' कंपनींत नोकरी लावून देण्याचं. पगारही पुष्कळ मिळेल. कुठल्या तरी शाळेंत २५ रुपड्यांवर रखडण्यापेक्षां मला सिनेमांत काम करणंच पसंत आहे. हिंगण्याला तर नाहींच नाहीं राहाणार मी. पुरें झालं हें कैदखान्यातलं जीवन. आठ वर्षं काढलीं या तुरुंगांत ! आतां स्वतंत्रपणानं समाजांत संचार करणार मी.

माणक – किती बेताल्पणानं बोलते आहेस तूं मालण ? छान फेडते आहेस तूं श्रीपादरावांचे नि संस्थेचे उपकार ! कुंडलच्या स्टेशनवर श्रीपादराव तुला भेटले नसते, तर तुला हे दिवस दिसले असते का ? ते कोणाचे कोण ? पण त्यांनीं तुला त्या रात्रीं आपल्या घरीं नेली. आणि आश्रमांत तुझी सर्व सोय लावून दिली ! अजूनहि तुझी चौकशी ते नेहमीं करीत असतात. आश्रमानंच तुझी सगळी जबाबदारी घेऊन तुला शिक्षण दिलं नि स्वावलंबी केलं. हें सगळं तूं विसरतेस कशी ? किती कृतघ्नपणा तुझा हा !

मालण – शिक्षण देण्यासाठींच कर्त्यांनीं संस्था काढली आहे ना ? मग त्यांत उपकार कसला करतात ही मंडळी आमच्यावर ? शिवाय आमच्याकडून कर्जफेड म्हणून घेणारच आमच्या पगारांतून पैसे मागून !

माणक – मग ? पैसे मागून घेतात ते काय स्वतःसाठीं घेतात ? अशा निराधार मुलींकरतांच ते खर्च करतात, हें माहीत असूनहि तूं असं बोलतेस ? खरं पाहिलं तर आपण मुलींनीं आपण होऊन आश्रमाला मदत करायला हवी, तें राहिलं बाजूलाच. आणि आपल्याकरतां खर्च केलेले पैसे ते परत मागतात म्हणून त्यांच्यावर राग ? खासा न्याय !

मालण – फुकट शिक्षण देतों म्हणून डांगोरा कशाला पिटतात या संस्था

मग ! स्वतःजवळ पैसे असले तर ते खर्च करावेत परोपकारार्थ ! एकाजवळ मागायचे नि दुसऱ्याकरतां खर्च करायचे ! आणि वर प्रौढी मिरवायची परोपकार करतों म्हणून ! मला मुळींच या संस्थांचं असलं धोरण आवडत नाहीं.

परीक्षेचा निकाल लागला. मालण दुसऱ्या वर्गांत पास झाली. आणि खरोखरच कोणाचें न ऐकतां ठरविल्याप्रमाणें ती मोहनच्या घरीं निघून गेली. आश्रमच्या चालकांना मात्र सुट्टी संपतांच शाळेंत काम करायला येऊं अशी थाप तिनें ठेवून दिली. पण शाळा सुरू झाली तरी मालणचा पत्ता नाहीं, असें पाहून चालकांनीं श्रीपादरावांना पत्र पाठवून विचारलें, पण 'मालण इकडे आलीच नाहीं' असेंच त्या पत्राचें उत्तर आलें. अशा रीतीनें चालकांच्या हातावर तुरी देऊन ती संस्थेंतून चालती झाली.

मोहन हा एक अगदींच सामान्य प्रतीचें काम करणारा नट होता. मॉबसीन्समध्यें कुठें तरी चार कोलांट्या उड्या मारण्याचें काम असायचें त्याला. 'काम तसा दाम.' पगार वीस पंचवीस रुपयेच मिळत होता. परंतु त्याचे उलटे फिरविलेले तुकतुकीत केस, पांढराशुभ्र मलमलीचा सदरा नि वरती जाकीट, पांढरें शुभ्र धोतर, दोन्ही हातांच्या दोन दोन बोटांतल्या त्या खड्याच्या आंगठ्या, पायांत चढाव, मनगटावर घड्याळ, असा त्याचा रुबाब असल्यामुळें त्याच्याकडे पाहाणाराला हा कोणी तरी मोठा पगारदार मनुष्य असावा असें वाटे. एक दोनदां तो श्रीपादरावांबरोबर संस्था पाहण्याच्या निमित्तानें आला होता, तेव्हां मालणची व त्याची ओळख झाली. पुढें त्याचा फायदा घेऊन त्यानें आपण तिचा लांबचा भाऊ असल्याचें सांगून श्रीपादरावांचा निरोप आणला आहे, वगैरे सबबीवर मालणला भेटायला तो एकटाच येत असे. त्याच्या बोलण्याचालण्यांतला अधिकपणा लक्षांत आल्यामुळें त्याच्याशीं बेतानें वागण्याची सूचना तिला व्यवस्थापिके-

कडून मिळालेली होती. परंतु त्यामुळें उलट तिचें लक्ष त्याच्याकडे अधिकच ओढलें गेलें.

मोहननें खऱ्या खोट्या थापा देऊन तिच्या मनावर चांगलीच पकड बसवली होती. आपण 'कोळ्याचें जाळें' या चित्रपटांत मुख्य भूमिकेचें काम करीत आहोंत. आपल्याला पगारहि मोठा आहे.. आपण सध्यां लहानशाच खोलींत राहतों आहोंत, पण दोन चार महिन्यांत कंपनीच्या मालकीच्या बंगल्यांत आपल्याला जागा मिळणार आहे, अशा एक ना दोन, अनेक गप्पा त्यानें मारल्या. 'आपण तिथें राहायला गेलों म्हणजे तुझी नि कंपनीच्या डायरेक्टरांची ओळख करून देऊं,' असें सांगून त्यानें तिला खूष केलें होतें म्हणून श्रीपादरावांनाहि न कळवतां ती परस्पर मोहनकडे कोल्हापुरास आली.

मालणला त्याच्या त्या गलिच्छ वस्तींतल्या टीचभर लांबीरुंदीच्या काळोखाच्या कोंदट खोलीचें वैभव पाहूनहि कांहीं वाटलें नाहीं. कारण तीं पुढच्या सुखी जीवनाचीं चित्रें रंगविण्यांत दंग झाली होती. थोड्याच दिवसांत आपल्याला नटीची मोठ्या पगाराची जागा मिळेल व मग मुख्य नटी म्हणून मोहनबरोबर काम करूं अशा सुखस्वप्नांत ती होती. चालू चित्रपटाचें काम संपल्यावर मोहन सर्वस्वी तिचा होणार होता. मग त्याला मिळणाऱ्या बंगल्यांत त्यांचा संसार थाटणार होता. याच आशेवर सध्यां ती मोहनबरोबर दिवस काढीत होती. मोहनच्या खोलींत ना धड भांडींकुडीं, ना चिरगूट पांघरूण, कीं ना बसायला एकादी फाटकी सतरंजी. तरी पण जें काय सामानसुमान होतें, तें तिनें त्यांतल्या त्यांत व्यवस्थितपणानें लावलें. भांडीं कुंडीं घांसून स्वच्छ केलीं. पडकी मोडकी असलेली शेगडी सारवून लिंपून साफसूफ केली, आणि आपला दोन जीवांचा चिमुकला संसार सुरू केला.

मोहन नुसतें सिनेमांतच काम करीत नव्हता. आंकडे लावणें, सट्टेबाजी करणें, रस्त्यावर बसून ज्योतिष सांगणें, जादू करणें, अशा गोष्टी सुद्धां तो फावल्या वेळांत करीत असे. एकदां दोनदां तो मित्रांजवळून दहा रुपये उसने काढून रेसलाहि गेला होता, आणि त्याच्या सुदैवानं त्याला पांचशें रुपये मिळाले होते. आणि म्हणून त्याचा सध्यांचा रुबाब त्याला चालवतां येत होता.

मालण त्याच्याकडे आल्याबरोबर त्यानें तिला दोन तीन उत्तम साडया आणि ब्लाऊजकरितां कापड खरेदी केलें. तिला सैंपाकाचा त्रास पडूं नये म्हणून बोर्डिंगांतून डबे आणायचें ठरविलें होतें. चहासाठीं दोघेंहि उठून हॉटेलांत जात असत. आतां त्याला मालणशिवाय करमेनासें झालें होतें. त्यामुळें शूटिंग संपतांच तो सरळ घरीं येत असे. नंतर दोघेंजण हॉटेलांत जाऊन चहा फराळ करून कुठें तरी फिरायला किंवा सिनेमाला जात. परत येतात तों जेवणाचा डबा तयारच असे. अशा प्रकारें खाणेंपिणें, सिनेमा, फिरणें, गप्पागोष्टी आणि पुढील बेत करणें यांत मालणचे दिवस मजेंत चालले होते.

एक महिना गेला, दोन महिने गेले, तिसराहि महिना संपून चवथा सुरू झाला, तरी अजून चित्रपट कंपनीचें बोलावणें मालणला आलें नव्हतें. त्यांचा रोजचा कार्यक्रम चालूच होता. फरक इतकाच झाला होता कीं आतां खाणावळींतल्या डब्याचें अन्न खाऊन मोहनला कंटाळा आला होता, नि मालणला सगळा दिवस बसून काढण्याचा कंटाळा आला होता म्हणून ती घरीं सैंपाक करायला लागली होती, आणि तिचा सैंपाक जेवतांना मोहन तिची भरपूर वाखाणणी करी. मोहनजवळची पैशाची पुंजीहि कमी कमी होत आली होती. पहिल्या चित्रपटाचें काम संपलें होतें. दुसऱ्या चित्रपटाचें काम

आठ दिवसांत सुरू होणार होतें. तरीपण मोहनला डायरेक्टरांनीं अजून बोलावलें नव्हतें. आठ दिवस झाले, पंधरा दिवस झाले. महिना लोटला. तरी मोहन आपला रिकामाच घरांत बसलेला. रोज नवीन थाप मारून तो मालणचें समाधान करीत होता. मालणचें चित्त आतां अस्वस्थ झालें होतें. ती रोज एकदां तरी त्याला कामाचें बोलावणें कधीं येणार, बंगल्यांत राहायला कधीं जायचें, तिला सिनेमांत कसलं काम मिळणार ? इत्यादि प्रश्न विचारीत असे. अखेर तिच्या या प्रश्नांनीं मोहन चिडे नि कांहीं तरी वेडेंवांकडें उत्तर देई. या उत्तरानें तिलाहि उलट त्याचा राग येई.

आठ पंधरा दिवसांत आपल्याला दुसरें काम मिळेल ही मोहनची थापच होती, असें एक दिवस मालणच्या ध्यानांत अचानकपणानें आलें. मोहन नेहमींप्रमाणें कंपनीत चौकशी करून येतों, असें सांगून बाहेर गेला होता. मोहन बाहेरून आल्यावर चहा करावा, असा विचार करून मालण अजून चटईवरच वाचीत पडली होती. इतक्यांत पोस्टमन्नें एक पाकीट दाराच्या आंत भिरकावलें, तें बरोबर मालण पडली होती तिथें आलें. पाकिटावरचा पत्ता कंपनीचा होता, पण मोहन तिथें नसल्यानें तें घरच्या पत्त्यावर आलेलें होतें. तिनें तें हातांत घेतलें आणि आपल्याला कंपनींतलें बोलावणें आलें असेल असें समजून तिनें तें उघडलें, परंतु तें पत्र वाचून तिची विलक्षण स्थिति झाली. आत्यंतिक निराशेनें तिच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. भीतीनें आणि संतापानें ती थरथर कापूं लागली. तिला मोहनचा तिरस्कार वाटूं लागला. यावेळीं तो तिच्यासमोर असता तर तिनें संतापातिरेकानें त्याच्या श्रीमुखांत लगावण्यासहि कमी केलें नसतें! त्याक्षणीं, आपण कोल्हापूर सोडून पळून जावें नि पुढें ओढवणारें संकट टाळावें असें मालणला वाटलें, पण दुसरा विचार मनांत आला कीं तो घरीं आल्यावर

त्याची चांगली खेटरपूजा करून मगच निघून जावें. तें पत्र मोहनच्या मुंबईच्या मित्राचें होतें, त्यानें लिहिलें होतें:

मित्रा, मला वाटलंच तूं तिथें असाच कांहीं तरी घोटाळा करशील म्हणून ! सभ्यपणाचा टेंभा मिरविणाऱ्या त्या नटीची खोडी काढून तिचा नक्षा उतरलास एकूण तूं ! आणि या तुझ्या वर्तनाचा राग येऊन डायरेक्टरसाहेबांनीं तुला कामावरून काढून टाकलं म्हणतोस ? कुच फिकीर नाहीं. आपल्या चौघांच्या ठरलेल्या बेताप्रमाणं इथलं सगळं बस्तान बसलेलं आहे. आपल्या कारस्थानांत आणखीहि दोघे येऊन मिळालेले आहेत. आपल्या टोळींत राहण्याविषयीं परवांच बेलतुळस घेऊन त्यांच्या आणाशपथा झाल्या ! त्यांनीं आपल्या-वर ताण केली आहे. आपण सहासात तरुणींनाच फसवलें आहे तर त्यांनीं डझन डझन तरुणींना फूस लावून त्यांची अब्रू खराब करण्याचें पुण्य पदरांत बांधलें आहे. असो, तूं लवकर मुंबईस निघून ये. तुझं हें नवें आशुकमाशुक काय म्हणतंय ? राहूं दे चरफडत तिला तिथेंच ! तुझ्याबरोबर आली पळून तशी आणखी कुठें जाईल ! तुला कशाला तिची काळजी हवी ? पुन्हां थोडेसे पैसे जमले कीं दुसरी एकादी छानछबेली आणली ! अच्छा नमस्ते.

तुझा
प्रताप

मोहन घरीं येऊन खोलीचें दार उघडून आंत शिरला तों रडत असलेल्या मालणकडे आणि तिच्यासमोर पडलेल्या पत्राकडे त्याची एकदमच दृष्टि गेली.

त्यानें झटकन् पुढें होऊन तें पत्र मालणच्या लक्षांत येण्यापूर्वीच उचललें, नि "इथें कसें आलें हें पत्र ?" असा प्रश्न त्यानें मालणला विचारला.

"माझ्या सुदैवानं हें पत्र इथें आणलं." संतापून मालण बोलली. "विश्वासानं आश्रयासाठीं तुमच्या खांद्यावर टाकलेल्या माझ्या मानेवरून तुम्ही चांगलीच सुरी फिरवलीत! दुष्ट, विश्वासघातकी आहांत तुम्ही. असं मला फसवून तुम्हांला काय मिळालं?"

"मिळायचं तें मिळालं. आतां खुशाल बस कोकलत. तुम्ही मुली मागचा पुढचा विचार न करतां, एखाद्या तरुणाशीं थोडीशी ओळख झाली, तरी त्याच्या गुळचट थापांना भुलून त्याच्या मागं धांवतां. मग त्याचं प्रायश्चित्त असंच मिळायचं. अशा मुलींची खोडकी जिरवायचंच आम्हीं कांहीं मित्रांनीं ठरवलं आहे."

"मीं जिवापलीकडे तुमच्यावर प्रेम केलं. मैत्रिणींचं ऐकलं नाहीं. मला सन्मार्ग दाखवून माझं कल्याण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या श्रीपादरावांना मी कळवलं देखील नाहीं. कां? तर तुमच्यावरच्या प्रेमासाठीं......"

मध्येंच तिला थांबवून मोहन बोलला., "माझ्यावरच्या प्रेमासाठीं? झूट! प्रेमबीम सब झूट! पैशासाठीं आलीस तूं माझ्याकडे. मीं तरी कुठें तुझ्यावर प्रेम केलं? माझं इच्छित कार्य तडीस नेण्यापुरतीच तुझी मला गरज होती. आतां तूं, तुझा मार्ग धरायला मोकळी आहेस. अच्छा, कोण कार्टं जन्माला येईल त्याची वाट लावीपर्यंत तुला पोटापाण्याला म्हणून हा घे मोबदला." असं म्हणून दहा दहाच्या पांच नोटा तिच्या अंगावर त्यानें फेंकल्या, आणि "मी कुठें गेलों, काय करतों, वगैरे बद्दल एक शब्द तोंडावाटे काढशील तर याद राखून ठेव, माझ्याशीं गांठ आहे." असें बजावून तो निघून गेला. तो पुन्हां कधींच तिला भेटला नाहीं.

मोहनच्या या तीक्ष्ण शब्दांनीं मालणच्या काळजाचं पाणी पाणी होऊन गेलें. ती सुन्न होऊन बसली. काय बोलावें आणि काय करावें याचा विचार करण्याची तिच्यांत शक्ति येण्यापूर्वीच मोहन निघून गेला होता.

अशा रीतीनें मोहन मालणला असहाय्य परिस्थितींत सोडून गेल्यामुळें तिच्या सगळ्या आशाआकांक्षांचा चक्काचूर झाला. तिची स्थिति मोठी केविलवाणी झाली. पण जाणार कुठें आतां ?

महिनाभर कसा तरी त्याच बिऱ्हाडीं काढून तिनें पंढरपूरचा आश्रम गांठला. तिथें प्रसूति होईपर्यंत तिनें दिवस काढले. आणि मोकळी झाल्यावर ती पंढरपुराहून जवळच्याच एका खेडयांतल्या शाळेंत शिकविण्याचें काम करूं लागली.

शेवटीं शिक्षकिणीचीच नोकरी तिला पतकरावी लागली आणि तीहि एका खेडयांत. आतां तिला पश्चात्ताप होत होता. तिनें माणकला पत्र लिहून आपली करुणकहाणी कळवून शेवटीं लिहिलें होतें, " मींच दुराग्रहानं ही स्थिति आपल्यावर ओढवून घेतली. त्यावेळीं तुम्हीं सर्वांनीं मला सन्मार्ग दाखवलात पण मला तो दिसला नाहीं ! आतां माझे डोळे उघडले. पण आतां काय उपयोग ? आतां पश्चात्तापानं जळून जळून मरायचं इतकंच ! "

ग्रंथ संग्रहालय
कथा
नों. वि. — १६३ —

१२

# कायापालट

बायकांची अब्रू कांचेसारखी आहे असें म्हणतात. परंतु फुटलेली कांच रासायनिक कृतीनें सांधतां येते. तिच्या फुटलेल्या तुकडयांचा भट्टींत रस बनून एकजीव होतो आणि ह्या रसापासून नवीन सुंदर कांच बनते; मग बायकांची गेलेली अब्रू परत कां येऊं नये? त्यांना योग्य संधि मिळाली तर त्यांचाहि कायापालट होऊं शकतो हें विमलच्या चरित्रावरून समजेल.

" कार्टे सगळ्यांच्या तोंडाला काळिमा फासलास! नवऱ्याला निर्दाळिलंस तेव्हांच मेली असतीस तर!" हे सासूबाईचे कठोर शब्द जळजळीत तेलाप्रमाणें दाह करीत माझ्या कानांत शिरले. खरंच! माझ्याकडून घडलेला अपराध किती भयंकर होता! त्याचे काय परिणाम होतील आणि माझ्या सगळ्या आप्तेष्टांना लज्जेनें किती मान खालीं घालावी लागणार होती, याची पुरेपूर कल्पना आतां मला आली होती! परंतु आतां ती येऊन काय

उपयोग ? मला फसविणारा तरुण समाजांत उजळ माथ्यानें वावरत होता, पण मी !

मी मात्र त्याच समाजाच्या दृष्टीनें समाजांतून उठून गेलेली स्त्री म्हणून यापुढें ओळखली जाणार होतें ! काय काय भोग पुढील आयुष्यांत मला भोगावे लागणार, याविषयींचा विचार करून माझें डोकें भणाणून गेलें होतें. खरंच ! मी कां नाहीं लगेच मेलें त्यांच्या मरणानंतर ! सासूबाई म्हणाल्या त्यांत काय खोटं होतं ?

मला आतां कायमचेंच माहेरीं धाडण्यांत आलें. माझ्याशीं कोणीच कांहीं बोलेनात. दादा, वहिनी, आजी आणि बाबा देखील माझ्याशीं फटकून वागत. कोणाच्याच मनांत पूर्वीप्रमाणं माझ्याबद्दल सहानुभूतीहि दिसत नव्हती. दोनदां जेवावें नि खोलींत पडून राहावें या पलीकडे मला कांहींच करणें शक्य नाहींसें झालें. सगळ्यांच्याच चेहेऱ्यावर माझ्याविषयीं तिरस्कार व कठोरपणा दिसूं लागला. आई मात्र माझ्यासमोर आली कीं डोळ्यांत पाणी आणी. पण कांहीं बोलत मात्र नसे.

कांहीं आजार नसतांहि मला नानाप्रकारचीं औषधें देण्यांत आलीं. तीं कां हें आतां मला कळतें पण त्यावेळीं त्याची कल्पना नव्हती. आधींच ओकून ओकून हैराण झालेला माझा जीव या जहाल औषधांनीं अधिकच हैराण होऊन जाई !

आमच्या वडिलांचे स्नेही डॉ. शिर्के एक दिवस रात्रीं आमच्या घरीं आले नि मला तपासून गेले. माझ्या उदरांत पांच महिन्यांचा गर्भ वाढत होता ! आतां गर्भपाताचें तरी पातक नका करूं असा त्यांनीं सल्ला दिला. पंढरपूरच्या अनाथालयांत माझी सोय करून ठेवण्याचेंहि आश्वासन त्यांनीं दिलें. झालें !

सर्वांचा निरुपाय झाला. आतां पुढें काय ? या विचारानें आजोबा नि बाबा यांचीं डोकीं सुन्न झालीं !

हजार बाराशें वस्तीच्या आमच्या लहानशा खेड्यांत ही बातमी पसरायला कितीसा वेळ लागणार ? घरोघर कुजबूज सुरू झालेली आमच्या घरांतील माणसांच्या कानांवर रोजच्यारोज नवनव्या स्वरूपांत येऊं लागली. त्या सगळ्यांना तर असें वाटत होतें कीं, माझ्याबद्दल कोणत्याहि प्रकारचा चकार शब्दहि आपल्या कानांवर पडूं नये. माझें अशुभ दर्शनहि कोणाला नको होतें ! सकाळपासून संध्याकाळपर्यंत स्वयंपाकघरालगतच्या एकाच काळोखाच्या खोलींत, आजारी म्हणून मी दिवस कंठूं लागलें.

शेजारणी पाजारणी माझ्या समाचाराला (?) येऊं लागल्या. वर्षांवर्षांत आमच्या घराची कधीं पाहिरीही न चढणाऱ्या बायकांनाहि आतां माझ्याबद्दलच्या मायेचा इतका पुळका आला कीं, त्यांचीहि येरझार आमच्या घरीं सुरू झाली. रोज कुणी ना कुणी समाचाराला येऊं लागल्या. मीं त्यांच्याशीं बोलावें, बसावें असें त्यांना मनापासून वाटे, आणि त्या प्रत्यक्ष माझ्यांशीं बोलण्याचा प्रयत्न करीत; पोटांतला हेतु हा कीं, कोणत्या प्रकारचा आजार आहे याचा अंदाज घ्यावा. परन्तु मीं एक शब्द कोणाशीं बोलायचा नाहीं आणि डोक्यावरचें पांघरूण काढून वर डोकेंहि करायचें नाहीं असा निश्चय केला होता. मनांतून मात्र मला इतका संताप येई कीं, वाटे उठावें नि एकेकीच्या चांगल्या श्रीमुखांत लगावून विचारावें, कीं तुम्ही अगदीं धुतल्या तांदुळासारख्या स्वच्छ, निर्मळ आहांत का ? माझ्या पापानें मूर्त स्वरूप धारण केलें. म्हणून मी घोर पापी, आणि चोरून मारून पापें करतात त्या पवित्र ! समाजाला पडद्याआडचें पातक खपतें अं ? असले एक ना दोन, अनेक विचार माझ्या डोक्यांत थैमान घालीत. पण या

माझ्या संतापाचा काय उपयोग होता ? माझें तोंड बंद ठेवणें भागच होतें मला. कां ? तर समाजाच्या दृष्टीनें मी एक पतित विधवा होतें.

दिवसांमागून दिवस चालले होते. माझ्या कृतकर्माबद्दल मी रात्रंदिवस पश्चात्तापानें होरपळत होतें, तरी माझ्याबद्दल सहानुभूति बाळगणारें घरांत कोणीच नव्हतें. इतकेंच नाहीं तर सर्वांकडून मला शिव्याशापच मिळत होते. केव्हां एकदां ही ब्याद घरांतून जाईल, असें सगळ्यांना झालें होतें. पंढरपुरास आधींपासून ठेवून घेईनात म्हणून मी घरांत होतें इतकेंच. माझे दिवस भरल्यामुळें माझी झालेली शारीरिक अवस्था नि दुःखामुळें आलेलें मानसिक दौर्बल्य पाहून आईला मात्र दारुण दुःख होत होतें. ती बोलून कांहींच दाखवीत नसे. परन्तु पुष्कळ वेळां एकटीच असतांना तिच्या डोळ्यांतून टिपें गळतांना मला दिसत.

शेवटीं एकदां माझी रवानगी पंढरपूरच्या अनाथालयांत करण्यांत आली. माझे एक चुलतमामा माझ्याबरोबर आले होते. माझी व्यवस्था लावून दिल्यावर ते घरीं परत जावयास निघाले. माझ्या हृदयांत कालवाकालव सुरू झाली, डोळे पाण्याने भरून आले. मला हुंदका आवरेना. " मामा SSS, " एवढेच शब्द कसेबसे माझ्या तोंडून बाहेर पडले.

त्यांनीं माझ्या पाठीवरून हात फिरविला आणि म्हणाले, "पोरी, घाबरूं नकोस, हेही दिवस जातील. धीरानं दिवस काढ. मी तुझा पाठिराखा आहें असें समज." एवढेंच सद्गदित कंठानें बोलून त्यांनीं माझा निरोप घेतला.

मामा निघून गेले. माझ्या निराळ्या आयुष्यक्रमाला सुरुवात झाली. इथं शेजाऱ्या पाजाऱ्यांचा तरी त्रास नव्हता, म्हणून त्यांतल्या त्यांत मला

हायसें वाटलें. मला अनाथालयांत जाऊन पंधरा दिवस होतात तोंच तो दुर्दैवी दिवस उगवला. माझी सुटका झाली. पोरगा जन्माला आला. माझ्या पोटांत धस्स झालें, उरांत धडकी भरली. या पोराला समाजांत कोण विचारणार? उद्यां तो मोठा झाला म्हणजे माझ्यासारख्या पापिणीच्या पोटीं जन्मल्यामुळें तो माझा तिरस्कार करील, या विचारानें मला बेचैन केलें. येऊं नयेत ते विचार मनांत येऊन गेले. हें पाप जन्मतांक्षणींच नाहींसें होतें तर......

दोन महिने झाले तरी माझी वास्तपुस्त कोणी करीत नाहीं, तेव्हां आतां पुढें काय करावें हा विचार मला चैन पडूं देईना; काम करावें नि पोटाला खावें असेंच माझें इथलें जीवित होतें. इथल्या सगळ्याच बायका पतित नि पापी! त्यांचीं मूर्तिमंत पापें – अर्भकें – माझ्या दृष्टीपुढें दिसत होतीं. त्यांच्यापैकींच मी एक होतें. आम्हांला समाजांत तोंड काढायला जागा नव्हती. जीवित मातीमोल झालेलें. आम्ही पतित! वांकडें पाऊल पडलेल्या. एकदां झालेल्या चुकीचे परिणाम जन्मभर भोगावे लागणार. आमच्या तोंडाला सदाच काळिमा. उजळा कधींच मिळणार नाहीं. आमचा उद्धार करण्याची संधि समाजानें आम्हांला कां देऊं नये? स्त्रीचें पाप दिसतें म्हणून? याचकरितां आम्हांला ही जबर शिक्षा? पण स्त्रियांकडून पाप करविणारे पुरुषच ना असतात? त्यांना जगांतून नाहींसे करावयास हवेत. असले हजारों बंडखोर विचार माझ्या मनांत थैमान घालीत होते. पण बंड करण्याचें सामर्थ्य कुठें होतें माझ्या अंगीं?

असेच आणखी दहापंधरा दिवस गेल्यावर एक दिवस सकाळीं अनाथालयाच्या चालकांनीं मला कचेरींत बोलावलें, आणि माझे मामा मला न्यायला येणार असल्याचें सांगितलें. तें ऐकून माझ्या पोटांत धस्स झालें, हृदयांत

धडकी भरली. यापुढें माझें काय व्हायचें ? या विचारांनीं डोकं भणाणून गेलें. माझे डोळे पाणावलेले पाहून ते म्हणाले, "मुली, घाबरूं नकोस; झालं तें होऊन गेलं, पुन्हां असली चूक करूं नकोस. मन खंबीर ठेव. शील हेंच स्त्रीचें भूषण आहे, हें लक्षांत ठेव. तुझी गेलेली प्रतिष्ठा मिळविण्याची संधि तुझे मामा तुला आणून देणार आहेत. चार अक्षरं शिकलीस तर मानानं पोट भरशील. हिंगण्याच्या आश्रमांत तुला ठेवणार आहेत ते. तेथें तुझ्या वयाच्या प्रौढ मुलींच्या शिकण्याची सोय आहे. संध्याकाळीं तुझे मामा तुला न्यावयास येतील तेव्हां निघण्याची तयारी ठेव."

मी माझ्या खोलींत आलें नि सुन्न मनानें पाळण्यांत निजलेल्या अर्भकाकडे पहात राहिलें; मातेचें हृदय वात्सल्यानें ओथंबलेलें असतें असें म्हणतात. ती आपल्या बालकाःकरितां प्राण देण्यासहि तयार असते. परंतु शील कलंकित करणाऱ्या आगंतुक मातृपद प्राप्त झालेल्या मातेचें अंतःकरण मात्र दगडाहून देखील कठोर बनतें अं ? तिला आपल्या अर्भकापेक्षां अब्रूची नि शीलाची चाड अधिक असते म्हणूनच तिला इतकें कठोर बनावें लागतें ! तसल्याच कठोरपणानें मी आज माझ्या बाळास अनाथालयांत सोडून जाणार होतें. वात्सल्यप्रेमापेक्षां शील श्रेष्ठ आहे. तें रक्षण करण्यासाठींच मी हें कठोर वर्तन करणार आहें, अशी समजूत मीं माझ्या भांबावलेल्या मनाची केली. मी माझ्या विचारांच्या तंद्रींत आणखी कितीतरी वेळ बसलें असतें, पण ही माझी तंद्री जेवण्याच्या सूचनेनें भंगली, तेव्हां मी घाईघाईनें जेवणघरांत गेलें.

ठरल्याप्रमाणें माझे मामा त्या दिवशीं संध्याकाळीं आले. आम्ही रात्रीच्या गाडीनें निघून पुण्यास येऊन पोहोंचलों; नि स्टेशनवरून थेट हिंगणें गांठलें. संस्थेच्या नियमाप्रमाणें तिथें रहाण्याची माझी सगळी व्यवस्था

झाली. मामांनीं माझें पालकत्व पत्करलें. तिथली राहण्याची पद्धत, दिनचर्या, शिस्त नि व्यवस्था पाहून त्यांना समाधान वाटलें. घरीं परत जातांना त्यांनीं इतकेंच सांगितलें "पोरी, तुझा नवा जन्म झाला आहे. गतायुष्यावर पडदा टाक. झाल्या गोष्टीचा उच्चारहि कोणाजवळ करूं नकोस. समजलीस ? इथें तूं नवीन जगांत आली आहेस."

आणि खरेंच; मी एका अगदीं अपरिचित अशा नवीन जगांतच आलें होतें. त्या कामाच्या पाळ्या, त्या जेवण्याच्या घंटा, त्या प्रार्थना, तो अभ्यास, त्या वादविवादाच्या सभा, तें हसणं खिदाळणं, फिरायला जाणं, तो मोकळेपणा, हें सगळेंच मला इथें नवीन होतें. इथें कोणी माझ्याकडे बघून कुजबुजणारें नव्हतें, कोणी माझा राग, तिरस्कार करणारें नव्हतें. उलट मी आश्रमांत नवीनच असल्यामुळें सगळ्या मुली माझ्याशीं प्रेमळपणानें नि बहिणीप्रमाणें वागत होत्या. वरिष्ठहि माझ्या हुषारीचें नि कामकाजाचें कौतुक करीत होते. यामुळें मला या घरगुती वातावरण असलेल्या आश्रमाविषयीं, मुलींविषयीं, शिक्षकवर्गाविषयीं नि चालकवर्गाविषयीं आपलेपणा वाटूं लागला.

मला पुष्कळ मैत्रिणी मिळाल्या. शालेय जीवनांत, त्यांतून वसतिगृह असलेल्या शालेय जीवनांत किती मजा असते ! अभ्यास, परीक्षा, सभा-संमेलनें, समारंभ, सहली, या गोष्टींत आपला वेळ कुठें नि कसा जातो तें समजतहि नाहीं. विटलेल्या माझ्या नीरस जीवनाला देखील, या नव्या आयुष्यक्रमामुळें, ताजेपणा नि टवटवी आल्यासारखी मला वाटूं लागली. गतायुष्याचा चित्रपट जणूं गुंडाळला जाऊं लागला. येथील जीवनाशीं मी समरस होऊं लागलें. मन अभ्यासाकडे लागूं लागलें. मनांत महत्त्वाकांक्षांचा उद्भव झाला. आयुष्य जगण्यांत मौज वाटूं लागली. पांच दहा वर्षांत आपण आपल्या पायांवर उभ्या राहूं असा आत्मविश्वास वाटूं लागला.

अभ्यासांतली झपाट्यानें होत असलेली प्रगति पाहून आमच्या मुख्याध्यापिकांना माझें कौतुक वाटूं लागलें. माझ्या मामांनाहि आनंद वाटूं लागला. घरचीं माणसें देखील कौतुक करीत असल्याचें मामा मला भेटायला येत तेव्हां सांगत. अशा रीतीनें आश्रमांतलें माझें शिक्षण संपून मी मॅट्रिक होईपर्यंतचा माझा वसतिगृहांतील काळ केव्हांच संपला.

त्या सातआठ वर्षांत मी गतायुष्य पार विसरलें होतें. मी मॅट्रिक झालें तर कॉलेजचें शिक्षण घेण्याची माझी महत्त्वाकांक्षा होती, ती कशी पूर्ण करावी, या विचारांत मीं परिक्षेनंतरचा वेळ घालविला. परिक्षेच्या निकालाचा दिवस जवळ जवळ येऊं लागला, तसतसें माझें मन अधीर नि अस्वस्थ झालें ! शेवटीं तो महत्त्वाचा दिवस उजाडला. मी चांगल्या रीतीनें पास झालें.

आतां मात्र मीं कॉलेजांत जायचें निश्चित केलें नि माझ्या एका मैत्रिणीच्या आग्रहावरून पुढचें शिक्षण घेण्यासाठीं तिच्याबरोबर तिच्याच घरीं राहाण्यासाठीं नागपूरला गेलें. तेथील शिक्षणक्रम पुरा करीत असतां आपण पुढें काय करावें यासंबंधींचे विचार आतां वरचेवर माझ्या मनांत येऊं लागले. समाजसेवा करावी असें मला वाटत होतें, तर माझ्या मैत्रिणींना ' सुखं च मे शयनं च मे ' या प्रकारचा चैनीचा आयुष्यक्रम आवडत होता. आमचे या विषयावर कडाक्याचे वादविवाद होत असत. त्या मला या माझ्या वृत्तीमुळें ' सेविकाबाई ' या टोपण नांवानें हांक मारीत. आश्रमांत राहिल्यापासून मीं माझ्या पुढील आयुष्यांतलें ध्येय निश्चित केलें होतें. पुरुषांनीं स्त्रियांच्या उद्धारासाठीं समाजसेवेचें व्रत घ्यावें नि आम्हीं स्त्रियांनीं आमच्या भगिनींना अज्ञानांतच राहूं देऊन चैनीनें जीवित घालवावें, ही कल्पनाच मला कशीशी वाटते. आश्रमांत असतांनाच ही माझी मनोवृत्ति तेथील वरिष्ठांच्या दृष्टोत्पत्तीस आलेली होती, त्यांनीं त्यामुळें माझें कौतुक

करून आपल्या या ध्येयापासून न ढळण्याचा उपदेश हिंगणें सोडतांना मला केला होता. माझ्यावर त्यांचा दांडगा विश्वास होता. मीहि पण या त्यांच्या विश्वासाला पात्र आहे असेंच वागण्याचें ठरविलें होतें.

माझीं नागपूर कॉलेजच्या शिक्षणाचीं वर्षें संपलीं. त्या विश्वविद्यालयाची बी. ए. ची पदवी घेऊन मी बाहेर पडलें. पहिल्या क्लासमध्यें येऊन मीं उत्तम यश संपादन केलें. माझी संस्कृत विषयांतील पारंगतता पाहून माझी तिथल्या मुलींच्या शाळेंत शिक्षिका म्हणून नेमणूकहि झाली; आणि उपजीविकेचें साधन म्हणून मीं तिचा स्वीकारहि केला. कारण नागपुरांत राहूनच आसपासच्या खेड्यापाड्यांतल्या स्त्रियांना साक्षर करावें नी त्यांचें जीवन सुधारावें असें मीं ठरविलें. अशा रीतीनें आतां माझें कार्यक्षेत्र नागपूर झालें.

बारा तेरा वर्षांच्या अवधींत माझ्या जीवनांत केवढा मोठा फरक पडला! आतां मी एक अव्वल दर्जाची समाजसेविका आणि कार्यकर्ती सुशिक्षित स्त्री म्हणून महाराष्ट्रांत ओळखली जाऊं लागलें. माझ्या घरच्या माणसांनाहि आतां माझ्याबद्दल मोठा अभिमान वाटतो; तीं मला मोठ्या प्रेमानें घरीं बोलावतात, परन्तु मी मात्र त्या माझ्या खेड्यांत जात नाहीं. हें माझें यश पाहून माझ्या आईला किती आनंद झाला असता? पण तें माझ्या नशिबीं नव्हतें. मी कॉलेजमध्यें असतांच तिचा अंत झाला. मामा मात्र माझें कौतुक करायला वरचेवर माझ्याकडे येत असतात. आणि बोलण्याच्या भरांत आले कीं म्हणत असतात, "सीतेचें अग्निदिव्यच तूं केलंस, तुझा कायापालट झाला आहे."

# १३

## बिचारी शरयू

हिंगण्याला शिकायला येऊन पांच वर्षें झालीं होतीं, तरी शरयूचा नवखेपणा कमी झाला नव्हता. ती तिथें आली त्या दिवशीं तिच्या चेहऱ्यावर जो परकेपणा आणि संकोच दिसत होता, तो तसाच अजूनही कायम होता. तिचें वय जरी त्यावेळीं चौदा वर्षांचें होतें, तरी तिच्या चेहेऱ्यावर औदासीन्य, चिंता नि गांभीर्य दिसत असल्यामुळें तिच्याकडे पाहणाराला तिच्या मनावर कसला तरी जबर आघात झाला असावा असेंच वाटत होतें. तिची दृष्टि कावरीबावरी आणि करुणाजनक होती. हीच तिची वृत्ति आजहि कायम होती.

तिच्या वयाच्या मुलींमध्यें दिसून येणारा आनंद, उल्हास, नि खेळाडूपणा तिच्या ठिकाणीं चुकूनहि आतांपर्यंत कधीं दृष्टीस पडला नाहीं. नटणें मुरडणें तर तिला माहीतच नव्हतें. एखाद्या आजीबाईसारखी ती जगाला कंटाळलेली दिसायची सदा. या तिच्या चमत्कारिक वागणुकीमुळें तिच्या-

बद्दल मुलींना आपलेपणा नि सहानभूति वाटत नसे. 'आहे आपलें एक बावळट, अर्धवट आणि वेडसर ध्यान झालं,' असेच उद्गार त्या एकमेकीं-जवळ काढायच्या.

पांच वर्षांत पांच मुलींबरोबर सुद्धां तिची मैत्री जमलेली नव्हती. तिच्या वर्गातल्या माली, लिली तितक्याच बोलभांड आणि खमक्या असल्यामुळें त्यांच्याशीं तिला बोलावेंच लागत होतें, म्हणून ती त्यांच्याशीं तेवढी बोलत बसे; नाहींतर ती कोणाशीं गप्पासप्पा करतांना दिसली नाहीं, कीं कधीं कोणाबरोबर फिरायला जातांना दिसली नाहीं. आपला अभ्यास बरा कीं काम बरें, अशा वृत्तीनेंच ती वागे. ती कधीं मुलींच्या घोळक्यांत बसलेली आढळायची नाहीं. तर कुठें तरी वाचनालयाच्या एखाद्या कोपऱ्यांत मासिकें, वर्तमानपत्रें वाचीत असायची, किंवा आपल्या वर्गांत जाऊन एखाद्या कोपऱ्यांतल्या बांकावर अभ्यास करीत बसलेली आढळायची. मेट्रन बाईचें तिच्याशीं कांहीं काम असलें, तर त्या म्हणायच्या सुद्धां चेष्टेनें कीं, "चुकला फकीर मशिदींत असेल. जा, बघा, शोधा तिथें तिला." वर्गांतहि ती कधीं कोणाशीं मोकळेपणानें बोलत नसे. तिच्याकडून प्रश्नांचीं उत्तरें काढून घेणेंहि कित्येक वेळां शिक्षकांना मोठें मुष्किलीचें काम होऊन बसे. तिला रागें भरण्याची तर सोयच नव्हती. जरा एखाद्या वेळेस ते एखादा रागाचा शब्द बोलले तर ती मुळूमुळू रडायला लागे! तिला आपलें सांगणें समजलें कीं नाहीं हेंहि शिक्षकांना समजायला मार्ग नसे, कारण ती निर्विकार चेहेऱ्यानें कुठें तरी बघत असायची. आपल्याकडे हिचें लक्षच नाहीं असें त्यांना वाटायचें; तथापि कोणीच तिला रागावायला धजायचे नाहींत. या तिच्या स्वभावामुळें सगळ्यांचेंच तिच्याकडे दुर्लक्ष व्हायचें.

शरयू नेभळट आणि बावळट दिसली, तरी वेडी नाहीं; तर उलट हुशार

आणि बुद्धिमान् आहे, अशी शिक्षकांची चार सहा महिन्यांतच खात्री झाली. वर्गातलें निबंधलेखन आणि इतर लेखी काम दुसऱ्या मुलींच्यापेक्षां शरयूचेंच चोख आणि व्यवस्थित असायचें. तिचे विचारही चांगले असायचे; निबंध-लेखनांत तिचा हातखंडा होता. ही तिची अभ्यासांतली प्रगति पाहून तिच्या वर्गातली, पहिला नंबर न सोडणारी वीणा मनांतल्या मनांत चुरचुरत होती. कारण शरयूसारखी तोंडावरची माशीहि न हालणारी बावळट मुलगी आपल्या वर जाईल, अशी कल्पनाहि तिला शिवली नव्हती.

शरयूच्या वेशामुळें तर तिच्या बावळटपणांत भरच पडली होती. तिचे केस धड विंचरलेले नसायचे. ती इतर मुलींप्रमाणें निरनिराळ्या केशरचना कधींच करायची नाहीं. आल्या दिवसापासून तों आतांपर्यंत आपला एक धर्तीचा अंबाडा कायम होता. तसेंच कपड्यालत्त्याचें; सभासम्मेलनें असोत, कुठें सहली-सिनेमाला जायचें असो, तिचा आपला नेहमींचाच पोषाख. मैत्रिणीनें आग्रह केलाच, तर नेसे नवें लुगडें मोठ्या नाखुषीनें. तिनें कधीं वादविवाद सभेंत भाग घेतला नाहीं, कीं कधीं संमेलनाच्या संभाषणें नाट्यप्रवेशांत भाग घेतला नाहीं. ती दिसायला सुरेख असल्यामुळें मुली तिला नाटकांतल्या एखाद्या मुख्य भूमिकेचें काम करायला खूप आग्रह करीत, पण तिनें त्या आग्रहाला कधीं दाद दिली नाहीं. फारच आग्रह झाला तर शेवटचें रडण्याचें तिचें अस्त्र जय्यत तयार असायचें. तिच्या तुसड्या आणि हेकेखोर स्वभावामुळें कोणी मुली तिच्या फारशा वाटेला जात नसत. कांहीं मुलींनीं तर तिचें नांव 'रडतोंडीचा घाट' असें ठेवलें होतें.

"असा काय तिच्यावर येवढा दुःखाचा डोंगर कोसळला आहे ग?" असें एकीनें विचारावें. "कोणाला ठाऊक बाई, ती बोलेल, सांगेल तर समजेल ना? मीं परोपरीनें विचारून पाहिलें, पण रामा, शिवा, गोविंदा," असें

दुसरीनें उत्तर द्यावें. तिसरीनें म्हणावें, " सदा बिचारीच्या कपाळाला सतराशें साठ आंठ्या, आणि तोंड पहावें तर नुकताच बाईनीं तिला क्विनाइनचा डोस दिला आहे जसा कांहीं. काय झालं आहे कोणास माहित असें वागायला ? " शरयूची वृत्ति अशी कां व्हावी, याचें कारण मुलींना काय माहीत ?

* * * *

तिचें लग्न होऊन सहा महिने लोटले होते. लग्नानंतर ती दोन तीनदां सासरीं जाऊन आलेली होती. चार भावांत एकच बहीण असल्यामुळें ती मामा-मामीची फारच लाडकी होती, आणि आईवडिलांच्या मागें त्यांनीं तिला आई-बापांच्या प्रेमानेंच वागवलें होतें; त्यामुळें तिला त्यांची कधीं आठवणहि होत नसे. त्यांनीं तिला ठिकाणही चांगलें पाहून दिलें होतें. सासूसासरा, नणंदा, सगळीं माणसें चांगलीं असून तिला तीं माहेरच्या माणसांप्रमाणेंच वागवीत असत. तिचा नवरा माधव मोठा हुशार नि तरतरीत होता. तो सांगलीच्या कॉलेजमध्यें शिकत होता. तिच्या सासरची माहेरची दोन्हींकडची मंडळी हौशी होती. त्यामुळें तिचें लग्नानंतरचे वर्षपर्यंतचे सगळे सण व्हायचे असें ठरलें होतें. शरयूची पहिली मंगळागौर तिच्या सासरीं वांईला व्हायची होती. साताऱ्याहून तिची मामामामी वगैरे मंडळीहि येणार होती. माधवलाहि कॉलेजमधून चार दिवसांची सुटी घेऊन बोलावण्यांत आलें होतें. पहिली मंगळागौर 'जोड्यानें' पुजायची, असा त्याच्या आईचा – जानकीबाईचा – आग्रह चालला होता.

आंगणांत चौघडा झडत होता, त्याच्या तालांत सगळी लहान मोठी मंडळी नेमलेलीं कामें करीत होती. मुलें वाजंत्र्यांच्या भोंवतीं घोळका करून बसलीं होतीं. नटल्याथटलेल्या वशेळ्या मुली जमूं लागल्या होत्या. शरयूहि न्हाऊन

धुऊन दागदागिने घालून बसली होती. तिच्या मैत्रिणींनीं तिची थट्टामस्करी चालविली होती. त्या थट्टेचा लटक्या रागानें ती प्रतिकार करीत होती. पूजेची तयारी जोरांत चालू होती. जानकीबाई माधवला लवकर आंघोळ करून तयार होण्याबद्दल सांगत होत्या. परंतु " हा आत्तां अर्ध्या तासाच्या आंत आलोंच कृष्णाबाईचं स्नान करून. हा विष्ण्या लागला आहे माझ्यामागें पोहायला शिकव म्हणून. देतों चांगली एक सणसणीत डुब्बी त्याला, म्हणजे नांव नाहीं काढायचा पुन्हा पोहायचं! " असें म्हणून कपडे घेऊन दोन चार मुलांना घेऊन तो घाटावर जायला निघाला.

इकडे पूजेची सगळी तयारी करून मुली तयार होऊन भटजींची वाट पाहात होत्या. भटजी आले. ते येऊन तास दीड तास झाला तरी माधवचा पत्ता नाहीं. शरयूचे सासरे रामभाऊ बाहेरून परत आले, त्यांना हें समजलें, तेव्हां त्यांनीं गणपत गड्याला घाटावर जाऊन माधवला बोलवून आणण्यास सांगितलें, आणि " काय गाढव पोरं आहेत हीं! बसलीं असतील डुंबत पाण्यांत. " असें बडबडत ते स्नानाला निघून गेले. गणपत डोक्यावर टोपी ठेवून दाराबाहेर पडला, इतक्यांत समोरून ओल्या चड्डीनेंच घाबऱ्या घाबऱ्या धांवत येत असलेला विष्णू त्याच्या दृष्टीस पडला. भीतीनें त्याची अगदीं गाळण उडाली होती, नि बोबडी वळली होती. त्यामुळें तो काय सांगतो आहे हेंहि गणपतला चटकन् समजलें नाहीं. " दादा ऽऽऽ गे ऽऽऽ ला ऽऽऽ सां ऽ प ऽ डत नाहीं, " एवढे शब्द कसेबसे अडखळत अडखळत उच्चारून तो मटकन् खालीं बसला. ते शब्द कानीं पडतांच गणपतनें नदीकडे धूम ठोकली. रामभाऊही अंग पुसायच्या नेसत्या पंचानेंच त्याच्यामागून धांवत सुटले, व धांवत असतांना वाटेंत जो भेटेल त्याला घांटावर येण्यास सांगत होते. ते नदीवर येऊन पोंचले, तों गणपत आपल्या दोन तीन दोस्तांच्या मदतीनें माधवला पाण्यांत शोधण्याचें काम करीत असलेला

त्यांना दिसला. माधव कसा बुडाला, काय झालें हेंही विचारायला त्यावेळीं कोणाला सुचणें शक्य नव्हतें. पोहायला गेलेल्या मुलांपैकीं एकानें रामभाऊंना आपण होऊन सांगितलें, " एक गुराख्याचा पोरगा भोंवऱ्यांत सांपडत होता, त्याची किंकाळी ऐकून दादा तिकडे त्याला वांचवायला म्हणून गेला. तो भोंवऱ्याजवळ गेला तो दिसलाच नाहीं पुन्हां आम्हांला. आम्हीं पुष्कळ हांका मारल्या, पण दादाही नाहीं नि तो पोरगाही नाहीं. " हें त्या पोराचें बोलणें ऐकल्यामुळें रामभाऊंची तर कंबरच खचली. त्यांचें धैर्य गळून गेलें आणि तिथेंच ते कपाळाला हात लावून बसले.

ही वातमी हां हां म्हणतां गावांत सगळीकडे पोंचली. रामभाऊंचे शेजारी पाजारी आणि मित्रमंडळी घाटावर जमली. पाणबुडे लोक बोलावून माधवला शोधण्याचें काम चालू होतें. शरयूच्या घरांत तर आकांतच उसळला होता. मंगळागौरीनिमित्त जमलेलीं सगळीं माणसें जागच्याजागीं खिळून बसलीं. सगळीं लहान मुलें भेदरून गुपचूप, त्यांच्या तोंडाकडे पहात बसलीं. अर्धवट तयार झालेला सैंपाक तसाच टाकून बायका अश्रु ढाळीत जानकीबाईच्या शेजारीं येऊन बसल्या. जानकीबाई गुडघ्यांत मान घालून ज्या भिंतीशीं बसल्या होत्या त्या हालल्याच नाहींत! सगळी पूजेची तयारी जागच्या जागींच राहिली. सगळ्या वशेळ्या आणि शरयूच्या मैत्रिणी चिमणीएवढीं तोंडें करून तिच्याभोंवतीं गोळा होऊन तिला मध्यें घेऊन बसल्या. वाजन्त्र्यांनीं, भटजींनीं आणि इतर जमलेल्या शेजारच्या मंडळींनीं हळूं हळूं काढता पाय घेतला. घटकेपूर्वीं ज्या घराला नंदनवनाचें, आनंदीआनंदाचें स्वरूप आलें होतें, तें एकदम पालटून त्या जागीं भयंकर भीषणता, औदासीन्य आणि दुःख यांचें साम्राज्य पसरलें! कोणाला कोणाकडे बघवेनासें झालें.

दुपारचे दोन वाजेपर्यंत खटपट केल्यावर माधवचें प्रेत सांपडलें. त्याच्या

गळ्याला मिठी मारलेलें त्या गुराख्याच्या पोराचेंही प्रेत होतें. डॉक्टर, वैद्य आणले पण इतके तास मध्यें गेल्यावर त्यांचा काय उपयोग होणार होता! झालें, इतका वेळपर्यंत कोंडून धरलेला रामभाऊंचा दुःखाचा आवेग त्यांना असह्य झाला. तो भयप्रद देखावा पाहून त्यांची शुद्धीच नष्ट झाली. त्यांना गाडींत घालूनच घरीं आणावें लागलें. अशा वेळीं कोण कोणाचें नि कसें समाधान करणार?

या अनपेक्षित प्रकारानें शरयूच्या मनाचीहि स्थिति मोठी विलक्षण झाली होती. ती भांबावून, भकास चेहऱ्यानें सर्वांच्या तोंडाकडे पहात होती. दोन्ही गालांवरून अश्रु ओघळत होते. हळू हळू तिचे सगळे दागिने आणि सौभाग्यालंकार उतरले गेले. कपाळाचें कुंकू पुसलें गेलें. तिनें तें सगळें निमूटपणें करूं दिलें. "पोरीचं नशीब फुटलं, जन्म फुकट गेला." अशा उद्गारांनीं तिच्यापुढें पुढील आयुष्याचें चित्र उभें केलें होतें. आपण आतां विधवा झालों, आतां आपण नटणें, मुरडणें, हंसणें, खिदळणें, मजा करणें, वगैरे गोष्टींना सर्वस्वीं मुकलों, सगळा जन्म आतां परावलंबनांत जाणार, या जाणिवेनें ती हताश झाल्यासारखी दिसूं लागली.

लवकरच शरयू माहेरीं आली. आतां आपलें पुढें काय होणार याचा विचार ती मनांतल्या मनांत सारखा करीत होती. तिचें पांढरें कपाळ आणि भकास चेहरा पाहून मामा-मामींनीं डोळ्यांत पाणी आणावें, त्यांच्या डोळ्यांतलें पाणी पाहून शरयूनें वाईट तोंड करून रडूं लागावें, असें सारखें चाललें होतें. शरयूच्या कोवळ्या मनावर या विलक्षण परिस्थितीचा परिणाम झाल्यामुळेंच तिची पूर्वीची वृत्ति पार बदलली होती. ती आश्रमांत शिकायला आली तरी कायम होती.

* * * *

शरयू कर्वे महिलाविद्यापीठाची प्रवेशपरीक्षा पास होऊन कॉलेजचें शिक्षण घ्यायला रेसिडेन्सींत जाऊन राहिल्यापासून मात्र तिच्या वृत्तींत बदल होऊं लागला. शाळेच्या वसतिगृहापेक्षां कॉलेजच्या वसतिगृहांतलें वातावरण अधिक मोकळें आणि स्वतंत्र असतें म्हणून म्हणा, किंवा तिच्यावरच्या प्रसंगाची तीव्रता कमी करण्याचें काम आश्रमांतल्या सात वर्षांतल्या जीवनक्रमांत तिला मिळालेल्या शिक्षणानें आणि शिकवणीनें केलें म्हणून म्हणा, तिच्या राहाणींत, पोशाखांत, बोलण्याचालण्यांत नि वागण्यांत कॉलेजमध्यें आल्यापासून चांगलाच फरक पडला. " आतां आमची शरी माणसाळली बरं का इथें येऊन " असें तिच्या मैत्रिणी माली, लिली म्हणूं लागल्या. कॉलेजमधल्या सगळ्या मुलींचा थाटमाट नि टापटिपीचा पोशाख पाहून शरयूनेंही त्यांचें अनुकरण केलें. खाणेंपिणें, मजा मारणें, टेनिस-बॅडमिंटन् खेळणें, कादंबऱ्या वाचणें, सिनेमा पाहणें, या कार्यक्रमांत इतर मुलींप्रमाणें तीही भाग घेऊं लागली. आयुष्यांत ' राम ' आहे, हें तिच्या मैत्रिणींचें म्हणणें तिला आतां पटूं लागलें. तिच्या मनावरचें दुःखाचें नि निराशेचें दडपण कालांतरानें कमी होऊं लागल्यामुळें आतां ती जरा निराळ्या प्रकारें विचार करूं लागली. तिचें मेलेलें मन जणूं पुन्हां जिवंत झालें. आपणहि जगांत कांहीं तरी करूं आणि नांव मिळवूं, अशी महत्त्वाकांक्षा तिच्या मनांत निर्माण होऊं लागली. मनुष्य म्हणून सुखी होण्याचा हक्क आपल्यालाही कां असूं नये ? अशा प्रकारचे नवीन विचार तिच्या मनांत येऊं लागले होते. आपण जी. ए. व पी. ए. होऊन प्रोफेसर म्हणून कॉलेजांत काम करूं या ईर्षेनें ती अभ्यासाला लागली.

कॉलेजमधली तिची जिवाभावाची मैत्रीण इंदिरा इनामदार म्हणून होती. ती शरयूच्या वर्गांत असून दोघीजणी एकाच वर्षीं कॉलेजला आल्या होत्या. इंदिरेचा नवरा इंग्लंडला गेला होता. म्हणून त्यानें तिला कॉलेजच्या रेसिडेन्सींत पुढच्या शिक्षणाकरितां ठेवली होती. दोन वर्षांनीं तो एम्. डी.

होऊन परत आला आणि पुण्यांतच दवाखाना काढायच्या धांदलींत तो होता. इंदिरा आतां गावांत राहूनच कॉलेजला येत होती. शरयू तिच्याकडे वरच्यावर जात येत असे. त्यामुळें डॉक्टरांचा आणि तिचा परिचय वाढला होता. हें त्या दोघींचें शेवटचें वर्ष होतें त्यामुळें दोघींनींही क्लासची तयारी चालवली होती. इंदिरेचे यजमान परत आल्यामुळें त्यांच्याबरोबर इकडे तिकडे हिंडण्यांत तिचे दोन महिने फुकट गेले होते, तेव्हां दुसऱ्या सहामाहींत रेसिडेन्सींत राहून अभ्यास करायचा तिचा बेत होता. या बेताप्रमाणें ती सुटी संपवून रेसिडेन्सींत राहायला आली होती. दोघींनीं अभ्यासाला सुरुवात करून महिना लोटला असेल नसेल तोंच इंदिरा तापानें आजारी पडून घरीं गेली.

आठ दिवस झाले, पंधरा दिवस झाले, तरी ताप हटेना. अखेर तो ताप मुदतीचा ठरला ! शरयू चार दोन दिवसांनीं तिच्याकडे खेप टाकीत असे. तिची शुश्रूषा करायला खास नर्स ठेवली होती. इतरही योग्य ती सर्व व्यवस्था होत होती. स्वतः यजमान डॉक्टर आणि तेही साधेसुधे एम्. बी. बी. एस्. नाहीं, तर इंग्लंडचे एम्. डी. मग रोग्याची हयगय होण्याचें नांवच नको. इतकें असूनही दोन महिने झाले तरी तिचा ताप हटेना. दोन वेळ नॉर्मलवर येऊन पुन्हां तो चढूंच लागला होता. शेवटीं त्याचें रूपांतर क्षयामध्यें झाल्याचीं लक्षणें दिसूं लागलीं.

तिच्या इच्छेवरून शरयू कांहीं दिवस तिच्याकडेच राहायला गेली होती. इंदिरेची शुश्रूषा जरी तिला करावी लागत नव्हती तरी सारखें तिच्याजवळ राहून बारीक सारीक गोष्टी तीच करी. दिवसेंदिवस होणारी तिची अवस्था, आणि तिला येणारी क्षीणता बघून शरयूचें मन अभ्यासाकडे तितकेंसें लागणें शक्य नव्हतें. ती सारखी इंदिरेजवळ बसून असायची आणि तिचें मन रिझविण्याचा प्रयत्न करायची. परीक्षेला पंधरा दिवस उरले तेव्हां

मात्र शरयू रेसिडेन्सींत राहायला गेली, ती परीक्षा संपेपर्यंत तिथेंच होती परीक्षा संपतांच ती घरीं न जातां प्रथम इंदिरेकडे गेली. सगळी सुटी तिथेंच घालविण्याचा आपला बेत तिनें मामांना कळवला होता.

शेंकडों उपाय करूनहि इंदिरेचा आजार कमी न होतां उलट वाढतच चालला. कोणतीच उपाययोजना लागू पडेना. रोगाचें पाऊल मागें हटेना. ती सर्वतोपरी परस्वाधीन होत चालली होती. तिला बोलण्याचीही शक्ति उरली नव्हती. तिच्या नजरेवरून आणि ओठांच्या हालचालीवरूनच तिला काय हवें आणि काय नको हें समजून घ्यावें लागत होतें. ही तिची स्थिति पाहून डॉक्टरही निराश होऊं लागलेले शरयूच्या लक्षांत येऊं लागलें.

एक दिवस सकाळीं शरयू आणि डॉक्टर इंदिरेजवळ बसले असतांना तिनें त्या दोघांकडे सारखी नजर लावली. तें पाहून शरयूनें विचारलें, ‘काय हवें तुला इंदू?’ त्यावर तिनें फक्त शरयूचा हात आपल्या हातीं घेऊन दाबल्यासारखा केला आणि अर्थपूर्ण नजरेनें डॉक्टरांकडे पाहिलें. शरयूला कसेसेंच झालें. ती स्नानाला जाण्याच्या निमित्तानें तिथून उठली. डॉक्टरही आपल्या कामाला लागले. यानंतर पंधरा दिवसांनींच इंदिरेनें इहलोकची यात्रा संपवली.

शरयूच्या परीक्षेचा निकाल प्रसिद्ध झाला. क्लास तर बाजूलाच राहिला उलट तिला डच्चूच मिळाला. परंतु मैत्रिणीच्या दुःखापुढें तिला नापासाचें कांहींच वाटलें नाहीं. ती पुन्हां कॉलेजमध्यें येऊन दाखल झाली. इंदिरा नसली तरी डॉक्टरांनीं पूर्वीचा घरोबा कायम राखला होता. ते तिला शनिवार, रविवार घरीं बोलावीत. ती एखाद्या शनिवारीं त्यांच्याकडे गेली नाहीं तर ते कोणाबरोबर तरी चिठ्ठी पाठवीत, किंवा एखाद्या वेळीं स्वतःही खेप टाकीत. इंदिरेच्या त्या दिवसाच्या नजरेनें आणि तिचा हात आपल्या

हातांत घेऊन दाबण्यानें शरयूच्या मनांत विद्युत्वेगानें चमकून गेलेला विचार डॉक्टरांच्या या सहानुभूतीच्या वागण्यानें पुन्हां जागृत झाला. तिच्या हृदयांतील सुप्त भावना पालवल्यासारख्या झाल्या. डॉक्टरांच्या सहवासांत तिला एक प्रकारचा अननुभूत आनंद वाटूं लागला. ती कांहीं तरी निमित्त काढून त्यांच्याकडे वरच्यावर जाऊं लागली. डॉक्टरांच्याकडे असलेला हा तिच्या मनाचा ओढा पाहून मुली तिच्याकडे साशंक वृत्तीनें पाहूं लागल्या. तिच्या रेक्टरबाईंनाही तसाच संशय यायला लागला. त्यांनीं तर एकदां तिला स्पष्ट विचारलेंही. त्यावर तिनें साधारण गुळमुळीत उत्तर देऊन आपले विचार व्यक्त केले. तेव्हां त्यांनीं तिला जपून पुढें पाऊल टाकण्याबद्दल इषारा दिला.

शरयूची परीक्षा संपून ती घरीं गेली. जातांना तिनें डॉक्टरांना पत्र लिहिण्याबद्दल सांगितलें होतें. त्यांनींही तें कबूल केलें होतें. ती घरीं जाऊन पंधरा दिवस झाले तरी डॉक्टरांचें पत्र नाहीं! कां कोणाला ठाऊक, पण तिचें मन अतिशय अस्वस्थ झालें. ती मोठ्या आशेनें आणि आतुरतेनें डॉक्टरांच्या पत्राची वाट पहात होती. तें पत्र एक दिवस येऊन ठेपलें! तिनें तें हातीं पडतांच घाईघाईनें उघडलें आणि त्यांतील मजकुरावरून तिची नजर फिरतांच तें तिच्या हातून गळून पडलें. तें डॉक्टरांच्या लग्नाचें निमंत्रण होतें, आणि शरयूला त्यांनीं आग्रहपूर्वक बोलावलें होतें. शरयूचे डोळे पाण्यानें भरून झरूं लागले. तें तिला आवरेनासें झालें. ती आपल्या खोलींत जाऊन दार लावून घेऊन जी अंथरुणावर पडली, ती दोन दिवस वर उठलीच नाहीं. कारण विचारतां आपलें डोकें अनिवार दुखत असून उठण्याची आपल्यांत मुळींच शक्ति नाहीं, असें तिनें सांगितलें.

इंदिरेच्या मृत्यूपासून तिनें आपल्या हृदयांत डॉक्टरांची मूर्ति स्थापून

तिच्यावर प्रेमपूजा बांधली होती. आपल्या मनांत त्यांच्याविषयीं जी भावना वसत आहे, तीच भावना आपणांविषयीं त्यांच्या मनांत वसत आहे, अशी तिची खात्री होती. ते कधीं तरी आपणांस मागणी घालतील या कल्पनेनें ती हल्लीं भावी आयुष्याचा विचार करीत होती. परंतु आजच्या डॉक्टरांच्या या पत्रानें तिला एकदम निराशेच्या खोल दरींत पडल्याप्रमाणें वाटलें. तिच्या आयुष्यांत हा दुसरा जबर धक्का तिच्या मनाला बसला! आपल्या मनांतलें गुपित ती कोणाला सांगणार? ती मनांतल्या मनांत दुःखानें झुरत होती. तिच्या मामामामींना ती आजारी आहे असें वाटून त्यांनीं तिला औषधोपचार चालू केले.

* * * *

सुट्टी संपतांच पी. ए. चा अभ्यास करावा आणि थोडेसें शाळेंत शिकविण्याचेंहि काम करावें म्हणून ती पुण्याला येऊन स्वतंत्र खोली घेऊन राहिली. आतां तिनें डॉक्टरांच्याकडे जाणें अजिबात सोडून दिलें. शाळेंतल्या कामांत आणि अभ्यासांत तिचा बहुतेक सगळा वेळ जात होता. पुन्हां ती पूर्वीप्रमाणें उदास दिसूं लागली. शाळेंतल्या शिक्षकशिक्षिकांशीं ती कामापुरतें बोले चाले. चार सहा महिन्यांनीं ती शाळेच्या कामांत रमल्यासारखी दिसूं लागली. ती कांहीं तरी कामांत निमग्न राहूं लागली. पी. ए. करितां तिनें मराठी नाट्यकला आणि नाटककार हा विषय घेऊन त्यावर प्रबंध लिहिण्याचें ठरविलें होतें. त्याकरितां तिला मराठीचे प्राध्यापक मंगळवेढेकर यांच्याकडे जावें लागे. त्यांच्या हाताखालींच ती अभ्यास करीत होती. एक दीड वर्षांत तिनें अभ्यास पुरा करून प्रबंध लिहायला सुरुवात केली होती. तितक्यांत प्रा. मंगळवेढेकर यांना किंग्ज कमिशन मिळालें. लढाईचें शिक्षण घ्यायला नांवें नोंदवलेल्या, सैन्यांतील मुलांना शिकविण्या-

च्या कामावर त्यांची नेमणूक झाली. त्यांना कामावर रुजू होण्याचा हुकूम केव्हां येईल त्याचा नियम नव्हता. म्हणून ते जायच्या आंतच आपला प्रबंध पुरा करावा असें ठरवून तिनें शाळेचें काम सोडून दिलें. आतां ती रोज चार चार पांच पांच तास काम करूं लागली होती. दिवसाचे दोन तीन तास तरी तिचे मंगळवेढेकरांकडे जात असत. तिचें मधल्या वेळचें चहापाणी देखील त्यांच्याच खोलीवर होत असे.

मंगळवेढेकर हे अविवाहित असून एकटेच राहात होते. त्यांचें जेवणखाण खाणावळींत होई. शरयूचा आणि त्यांचा परिचय आतांशा वाढल्यामुळें ती त्यांना आपल्या खोलीवर कधीं कधीं जेवायला बोलावीत असे. कारण ती हातांनींच आपलें जेवण तयार करीत असे; त्यांनाहि खाणावळीच्या अन्नाचा कंटाळा येई. त्यामुळें ते तिचें बोलावणें कधीं नाकारीत नसत. ते शरयूकडे जेवायला आले कीं तिचा प्रबंध तपासण्याचें काम तिथेंच चाले. अशा रीतीनें त्या दोघांमधील परकेपणा हळूं हळूं पार नाहींसा होत जाऊन त्यांच्या परिचयाचें रूपांतर गाढ मैत्रींत होत होतें, हें त्यांचें त्यांनाही कळलें नाहीं.

या परिचयाचें आणि मैत्रीचें रूपांतर प्रेमांत होऊन अखेर त्यांनीं लढाईवर जाण्याचा हुकूम येण्यापूर्वीच विवाहबद्ध होण्याचें ठरविलें. शरयूचा प्रबंध पुरा होऊन परीक्षकांकडे पाठविला गेला. आणि पुढें आठ दिवसांनींच त्यांचा विवाह नोंदविला गेला. शरयूनें आपला विवाह झाल्याचें मामामामींना कळवून त्यांचा आशीर्वाद मागितला, पण या वार्तेनें तीं दोघें अगदीं चकितच झालीं ! त्यांना शरयूचा अतिशय राग आला. अखेर पोरटी कुळबुडवीच निघाली, असें त्यांना वाटलें. मामांनीं खरमरीत उत्तर लिहिलें, ‘ तुला हे चाळे करायचे होते म्हणून पुण्याला गेलीस होय ? मानानें तुला पोट भरतां यावें म्हणून विद्या शिकवून स्वावलंबी केली. ती यासाठींच कां ? मग आधींच कां नाहीं गेलीस कोणाचा हात धरून ? आमचे पैसे तरी वांचले असते !

आशीर्वाद द्या म्हणे. असल्या कुळबुडव्यांना तो कधींही मिळायचा नाहीं. तुझ्या नशिबांत संसारसुख नव्हतंच तें मिळणार नाहीं आणि मिळालंसं वाटलं तरी तें टिकणार नाहीं, समजलीस ?'

* * * *

विवाहानंतर तीं दोघें मुंबईला गेलीं. लढाईवर निघण्याचा हुकूम येईपर्यंत त्यांचा तिथेंच राहाण्याचा बेत होता. शरयू आत्यंतिक सुखाच्या हिंदोळ्यावर बसून मनमुराद झोंके घेत होती. तिच्या आतांपर्यंतच्या सगळ्या हयातींत असल्या स्वर्गीय सुखाचा आनंद तिला आतांच प्रथम लुटायला मिळत होता.

अनपेक्षित दुःख-प्रसंगानें माणसाच्या मनाला धक्का बसून तो वेडा होतो. तसा अनपेक्षित हर्षातिरेकाचा परिणामही मेंदूवर होतो, असें म्हणतात. तसेंच शरयूच्या बाबतींत घडलें. जें आपल्याला यापुढें कधींच मिळणार नाहीं असें तिला वाटत होतें, तें वैवाहिक जीवन प्राप्त झाल्यामुळें तिच्या आनंदाला सीमाच नव्हती. तिच्या वागण्यांत नि बोलण्याचालण्यांत एकदम फरक झाला. हर्षातिरेकाच्या भरांत तिला कोठें कसें वागावें आणि काय बोलावें याचेंहि भान राहीनासें झालें. तिचें नवऱ्याशीं लाडिक बोलणें वागणें कोठेंहि चालायचें. " अग हें काय तुझं भलत्या ठिकाणीं भलतं वागणं ? आपण दोघंच नाहीं इथें. आजूबाजूला लोक आहेत. " असें प्राध्यापकांनीं म्हटलें तर, ती आणखीच विचित्र हातवारे करून म्हणे, " मग, मी नवऱ्याशींच वागतें आहे ना असं ? पाहूं नये त्यांनीं आमच्याकडे. तुम्ही माझे आहांना ? " असें म्हणून, ती त्यांना निरुत्तर करी.

आपण पतीपासून क्षणभरहि दूर होऊं नये असें शरयूला वाटे. चोव्वीस तास त्यांनीं आपल्या सान्निध्यांत घालवावे अशी तिची उत्कट इच्छा. न जाणो

हें आपलें सुखाचें निधान कोणीं हिरावून नेलें तर, या धास्तीनें ती त्यांना कुठें एकटे जाऊं द्यावयास तयार नसे. ते बाहेर जाऊं लागले तर एखाद्या लहान पोरीसारखा हट्ट धरून ती त्यांच्या गळ्याला घट्ट मिठी मारून बसे. तिचा हट्ट पुरवून त्यांनीं जावयाचें थांबविलें कीं विजयी मुद्रेनें ती त्यांच्याकडे पाहून म्हणे, "कसं पण एका माणसाला पकडून ठेवलं ?" आणि खोलीभर नाचत सुटे. तिचें न ऐकतां ते बाहेर गेले तर ते येईपर्यंत ती रडत बसे.

हें तिचें वागणें मंगळवेढेकरांना चमत्कारिक वाटे. तिला हर्षवायु तर झाला नाहीं ना, असा प्रश्नहि त्यांच्या मनापुढें उभा राही. आपली निवड चुकली कीं काय या विचारानें ते केव्हां केव्हां फार अस्वस्थ होत.

लग्न होऊन चार पांच महिने झाले तरी शरयूच्या या चमत्कारिक वागण्यांत फरक पडला नाहीं. आतां ती त्यांना लढाईवर जाऊं द्यायलाच तयार नव्हती. "तुम्ही नकाच जाऊं गडे" हेंच टुमणें सांजसकाळ त्यांच्यामागें तिनें लावलें. दर वेळीं "हुकूम तर येऊं दे, मग पाहूं" असें सांगून ते तिची समजूत घालीत.

अखेर लवकरच प्रोफेसरांना निघण्याचा हुकूम आला. त्यांनीं शरयूची कशी-बशी समजूत घातली. तिची राहण्याची सोय आपल्या आत्याकडे केली. आणि वरच्यावर पत्रें पाठविण्याचें वचन देऊन त्यांनीं शरयूचा निरोप घेतला.

शरयूला पतिविरह असह्य झाला. ते आतां परत येणार नाहींत असेंच तिच्या मनानें घेतलें. त्यांचीं पत्रें तिला येत, पण त्यांना तिच्याकडून जाणारीं उत्तरें कांहींच्या बाहींच लिहिलेलीं असत. एखाद्या पत्रांत तर 'तुम्ही लवकर या असाच मजकूर पानभर लिहिलेला असे. पहिल्या पहिल्यानें मंगळवेढेकरांनीं तिला लांबलचक उत्तरें लिहून तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ ! म्हणून शेवटीं त्यांनीं पत्रें लिहिणेंच बंद केलें.

नवऱ्याचीं पत्रें येईनाशीं झाल्यामुळें तर शरयू अगदीं वेड्यासारखी झाली. आत्याबाईशींही ती धड बोलेना. ती नेहमींच कसल्या तरी तंद्रींत असल्यासारखी वागे. एखाद्या वेळीं ती आढ्याकडे दृष्टि लावून तासांचे तास बिछान्यांत पडे. तिच्या सगळ्या क्रिया निर्जीव यंत्राप्रमाणें चालत. आंग धुवायला ऊठ म्हटलें कीं तिनें उठावें. जेवायला चला म्हटलें कीं चलावें. एखाद्या दिवशीं ती सारखी बोलत राही. तर एकेक दिवस विचारलेल्या प्रश्नाचें उत्तरहि न देतां निर्विकार चेहेऱ्यानें कुठें तरी पहात बसे. कधीं झक् पक् पोशाख करून फिरायला जाई, तर कधीं विटकें जुनेर नेसून विस्कटलेल्या केसांनींच बाहेर पडे. कधीं मोठा कुंकवाचा टिळा लावी, तर कधीं पांढऱ्या कपाळानेंच हिंडे. कधीं दिवस-रात्र झोंपून काढी, तर कधीं सारखें वाचीत राही. कधीं कोणी कांहीं बोललें तरी हंसे व कधीं कांहीं तरी निमित्तानें रडायलाच लागे.

हे तिचे चाळे पाहून आत्याबाईंना तिचें डोकें फिरलें असेंच वाटलें. त्यांनीं सर्व हकीगतीचें सविस्तर पत्र मंगळवेढेकरांना लिहून शेवटीं “ ती तुझ्यासाठींच वेडी झाली आहे असें माझें ठाम मत आहे, तेव्हां तूं ताबडतोब निघून ये. ” असें कळविलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तिच्या असहाय्य आणि केविलवाण्या स्थितीची त्यांना कींव न येतां त्यांच्या मनांत तिच्याबद्दल तिरस्कारच उत्पन्न झाला. त्यांना नोकरी सोडणें शक्यच नव्हतें. ‘ आपण परत आलों तरी आतां शरयूबरोबर संसार करणार नाहीं ’ असेंच उलट त्यांनीं आत्याबाईंना कळविलें.

दुर्दैव शरयूचें ! बिचारी सुखामागें धांवली पण तें सुख मृगजळच ठरलें !